शनिवार । १५ मे १९८२ । दीड रुपया

# माणूस


■ इंकाँत अंतर्गत धुसफुस
■ सामंतांना पाठिंबा फक्त कामगारांचा
■ भाजप मजबूत स्थिती

# ठाणे

## लोकसभा मतदार संघ निवडणूक

खास वार्तापत्र

पृष्ठ . . . ४



भाजपचे
श्री. जगन्नाथ पाटील

याशिवाय . . . सबला . . . . अखेर . . . . पृष्ठ . . . २६

एका मानसोपचारतज्ज्ञाची मुलाखत . . . . पृष्ठ . . . १८

# अवचित अतिथी

श्री. ग. मा.

'लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी' या गांधीखुनावरील सत्यकथनात्मक पुस्तकाचे लेखक श्री. पु. ल. इनामदार यांचे ग्वाल्हेर येथे गेल्या महिन्याच्या १६ तारखेला दुःखद निधन झाले.

सहासात महिन्यापूर्वीच ते पुण्याला आले असताना त्याची भेट झाली होती. पण शेवट इतका जवळ आला असेल अशी कल्पना आली नाही. न सांगता सवरता घरातल्याच एखाद्या वडिलधाऱ्याने निघून जावे तशी चुटपूट त्यामुळेच इनामदारांच्या जाण्याने लागून राहिली आहे!

या भेटीनंतर त्यांनी पुस्तकावर आलेल्या निवडक अभिप्रायांचे संकलन पाठवून दिले. ते 'माणूस' मध्ये प्रसिद्धही झाले. त्यानंतर त्यांचे मला एक पोचपत्र आले. ते शेवटचे ठरावे हे दुर्दैव!

का कुणास ठाऊक मला हे पत्र जपून ठेवावेसे वाटले. इनामदारांची सगळी व्यक्तिवैशिष्टये त्या कार्डावर लिहिलेल्या लहानशा पत्रात व्यक्त झाली होती, हे कदाचित यामागचे कारण असावे.

मला त्यांचे आलेले हे शेवटचे पत्र म्हणून जसेच्या तसे देतो.

पु. ल. इनामदार । श्री । नया बाजार, लष्कर
ॲडव्होकेट ग्वालियर ४७४००९
दि. ५-२-८२

सप्रेम नमस्कार वि.

आपणाकडून ३० जानेवारीचे २ अंक व एक ५ पानी कात्रण, तसेच 'क्षणचित्रे' यांचे उर्वरित लेख-५- इत्यादी पावलेत. तसेच शेष अभिप्रायांचे उतारेही पावले. हे सर्व परत पाठवल्याबद्दल आभारी आहे.

आपण ३०-१-८२ च्या अंकात छापलेला मजकूरही पाहिला. त्याची मुद्रिते पुष्कळच शुद्ध छापली आहेत. अपवाद पान नं. १७ वर 'वर्म स्वगौरवामध्ये' ऐवजी 'वर्चस्व गौरवामध्ये' असे छापले आहेत. तसेच पान नं. २० मध्ये 'प्रसाद पालीजिये' ऐवजी 'प्रशाद लीजिये' असे छापले आहे. उर्दूमध्ये 'पालीजिये' हा वाक्-प्रचार आदरयुक्त आहे. असो. या सगळ्या छपाईबद्दल हार्दिक धन्यवाद.

हे लिखाण वाचून 'माणूस'च्या वाचकांच्या प्रतिक्रिया काय व कशा होतात हे कळण्यास उत्सुक आहे. आपणाकडे येतील त्या मला कळविण्याची कृपा करावी अशी विनंती.

माझा विचार स्वत: एप्रिल-मेपर्यंत येथेच राहण्याचा आहे. वारंवार पुण्यामुंबईचा प्रवास व दगदग करण्याची माझी स्थिती नाही.

'कहाणी'च्या विक्रीची प्रगती सवडीने मला कळविण्याची कृपा करावी.

आपल्याकडील क्षेमकुशल कळवीत जावे.

श्रीमती सुमतीबाई देवस्थळे याच्या निधनाचे दुःखद वर्तमान कळून फार वाईट वाटले. त्यांच्या व माझ्या स्वभावप्रकृतीबद्दल आपण बोलून दाखविलेले साम्य आठवून मला अधिकच एकाकी वाटले. मृत्यु हा 'अवचित अतिथी' आहे हेच खरे. बोलावून येत नाही याची खंत वाटते. श्रीमती सुमतीबाईंच्या आत्म्यास चिरंतन शाती व सद्गती मिळो हीच प्रार्थना.

कळावे लोभ असावा ही वि.

आपला स्नेहाकांक्षी
-सही-

¤

नेमकेपणा, टापटीप, शरीरप्रकृतीची दुर्बलता, सश्रद्धता, कमालीचे सौजन्य, हळवेपणा- पत्रातून आपल्याला जाणवतात तसेच इनामदार प्रत्यक्षातही होते.

¤

त्यांची पहिली भेट मला अजूनही आठवते रामदास भटकळ आणि मी त्यांच्या वांद्र्याच्या घरी एका संध्याकाळी गेलो होतो. अगोदर फोन करून कळवलेले असल्याने त्यांनी पुस्तकाचे हस्तलिखित दुसऱ्या कुणाकडे होते ते मागवून घेतलेले होते. थोडी इकडची तिकडची बोलणी झाल्यावर त्यांनी आतल्या खोलीतून हस्तलिखित आणले. टी-शर्ट


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे
अंक : पन्नासावा
१५ मे १९८२
किंमत : दीड रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

ठेवण्याची लाबट चौकोनी बॉक्स असते— तिच्यात हे सगळे बाड व्यवस्थित लावून ठेवलेले होते. बॉक्सचे झाकण उघडल्यावर प्रथमच दिसले ते गांधीजीचे एक गंधाच्या खुणा वगैरे असलेले जुने छायाचित्र. आम्हा दोघानाही आश्चर्याचा पहिला धक्का बसला. इनामदार गांधीवादी असावेत असे प्रथम-दर्शनावरून काही वाटले नव्हते. खादीचा झब्बा असला तरी धोतर तलम होते. गांधी-खुनातील एक आरोपी परचुरे याचे इनाम-दार वकील. परचुऱ्यांना शेवटी त्यांनी आपले वकिली कौशल्य व ज्ञान पणास लावून सोडवले एवढीच तोवरची आमची माहिती. म्हणजे इनामदार ग्वाल्हेरातील हिंदुसभावादी नेते असावेत अशी कल्पना. जसे इकडे भोपटकर वगैरे होते तसे. पण मग हस्तलिखितात हे गांधीजीचे, गंधाच्या खुणा वगैरे असलेले चित्र कसे ?

इनामदारानी आम्हाला फार काळ संभ्रमात ठेवले नाही. आपण तीस वर्षे गांधीजीचे भक्त होतो असे त्यानी सांगून टाकले.

' मग तुम्ही परचुऱ्याचे—ग्वाल्हेरातील एका हिंदुसभानेत्याचे वकीलपत्र कसे घेतले ?' पुढचा उघडच प्रश्न.

"चार दिवस माझे फार अस्वस्थतेत गेले. काही ठरत नव्हते. ग्वाल्हेरातील वातावरण त्या वेळी महाराष्ट्रातल्यासारखेच होते. परचुरेकुटुंब वाळीत टाकले गेले होते. परचुऱ्यांना न्याय मिळण्याची शक्यता नव्हती आणि त्यांच्यावर अन्याय होतो आहे, त्यांचा छळ चालू आहे, हे तर मला दिसत होते. अशा वेळी वकील म्हणून माझे कर्तव्य काय ? गांधीजी असते तर त्यांनी मला कोणता सल्ला दिला असता ? ' तुला जे सत्य वाटते आहे त्या बाजूने उभा राहा' असेच गांधीजी म्हणाले असते ! असा माझ्या मनाचा कौल झाला आणि मी परचुऱ्यांच्या पाठीशी उभा राहिलो. शिवाय माझा ज्योतिषावरही थोडा विश्वास आहे. तोही कौल मी घेतला. घरच्या मंडळीची संमती अर्थात होतीच "......

मग गप्पा खूपच रंगत गेल्या. हस्तलिखित घेऊन आम्ही बाहेर पडलो, तेव्हा रात्र झाली होती.

मी कार्यक्रम बदलून वांद्र्याच्याच एका हॉटेलात त्या रात्री मुक्काम केला आणि रात्रभरात सगळे हस्तलिखित वाचून काढले.

सकाळी इनामदारांना फोन करून लिखाण उत्तम असल्याचे कळवले. इतक्या तडकाफडकी माझा फोन गेला म्हणून त्यानाही थोडे आश्चर्य वाटलेच.

दिवस आणीबाणीचे होते. ' माणूस '-मधून लिखाण प्रसिद्ध होण्यात अडचणी होत्या, मजकूर सेन्सॉरकडे पाठवावा लागणार होता, हे मी त्याना सांगितले.

पण सुमारे तीन-चतुर्थांश हस्तलिखित सेन्सॉरकडून कुठलीही काटछाट न होता ' माणूस 'मधून क्रमशः प्रसिद्ध झाले. पुढे मात्र काटछाट होऊ लागली. कारण त्या वेळी जॉर्ज फर्नांडिसावरचा बडोदा डायनामिट खटला रंगवण्याचा सरकारकडून आटापिटा सुरू होता. त्या बातम्या वृत्तपत्रांतून आदळत होत्या तशीच रंगवारंगवी गांधी-खून खटल्यात झालेली होती. गांधी-खून हा एक व्यापक देशव्यापी कट होता हे सरकारला दाखवायचे होते. बडोदा डायनामिट केसही अशाच पद्धतीने उभी केली-रंगवली जात होती. इनामदारांच्या लिखाणामुळे हे साम्य चटकन ध्यानात येते होते. म्हणून जसजसा हा भाग वाढू लागला तसतशी मजकुरातली काटछाट वाढली. मी इनामदारांना कळवले की, काटछाट वाचवायची असेल तर चटकन पुस्तकच काढले पाहिजे ! त्यांनाही हे पटले व ' माणूस'-मधील लेखमाला संपतासंपता मूळ स्वरूपात सगळे हस्तलिखित एकदम पुस्तकरूपानेच बाहेर आले !

¤

लेखमालेवर आणि पुस्तकावर अभिप्राय खूपच चांगले आले. इनामदार या प्रतिसादावर संतुष्ट होते. ते म्हणायचे की, वाचकांची पत्रे म्हणजे टॉनिकच ! एक पत्र आले म्हणजे चार दिवस बरे जातात, थोडा हुरूप वाटतो.

पण हा प्रतिसाद जाणत्यांकडूनच फक्त होता. कट्टर गांधीभक्त किंवा कट्टर गोडसेवादी मंडळीकडून पुस्तकाची उपेक्षा झाली. कारण ते खरोखरच निर्मळ व द्वेषमुक्त बुद्धीने लिहिलेले होते. गोडसेवादी कट्टरांना ते आवडले नाही. कारण सावरकरांबद्दलचे एक-दोन कटु प्रसंग त्यात सांगितले आहेत. कट्टर गांधीवाद्यांनी पुस्तकाकडे दुर्लक्ष करणे स्वाभाविकच होते. कारण इनामदारांना नथुराम जसा प्रत्यक्षात दिसला, अनुभवास आला तसा त्यानी तो मांडला आहे. हे कट्टर गांधीवाद्याना कसे चालणार ? कट्टर मंडळी इकडची असोत की तिकडची. द्वेष, असहिष्णुता ही वैशिष्टये सारखीच.

त्यामुळे पुस्तक उचलले गेले नाही खप बेताचा झाला. तीन हजारांची आवृत्ती काढली होती. बाराशे-चौदाशे प्रती विकल्या गेल्या. सात-आठशे फुकट वाटल्या. बाकीच्या अजून आहेत.

दरम्यान ' कहाणी ' इंग्रजीतूनही प्रसिद्ध झाली. विक्री बेताची.

इनामदारांना हे अनपेक्षित होते. त्याचा थोडा हिरमोडही झाला असावा. पत्रातून किंवा समक्ष बोलवण्यातून हे जाणवायचे.

¤

पण असे असले तरी मला अजूनही वाटते की गांधीखून या विषयावर मराठीत तरी असे लिखाण अद्याप झालेले नाही. सत्य कथनात्मक तरीही शैलीपूर्ण

जशी त्यांची राहणी तशीच त्यांची शैली. निर्मळ आणि पारदर्शक.

ते नेहमी पांढरेशुभ्र कपडे वापरीत. तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्वही होते. अंतर्बाह्य सात्त्विक—निरामय.

एखाद्या सांजवातीसारखे, मंद शीतल प्रकाश देणारे.

ही सांजवात आता मालवली आहे !

¤

नमोस्तुते

¤

## ठाणे लोकसभा निवडणूक : खास वार्तापत्र

# तिरंगी लढत : भाजप मजबूत

मोहन शं. कुलकर्णी, घाटकोपर

येत्या १९ मे रोजी हिमाचलप्रदेश, हरियाना, प. बंगाल व केरळ या राज्यांत सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. याच्याच जोडीला देशाच्या काही भागात पोटनिवडणुकाही होत आहेत; पण महाराष्ट्रापुरते पहावयाचे झाल्यास सर्वांचे लक्ष आज ठाणा लोकसभा मतदारसंघाकडे लागले आहे.

भारतीय जनता पार्टीचे खासदार स्व. रामभाऊ म्हाळगी याच्या अकाली निधनाने ही जागा रिकामी झाली आहे. ठाण्याचा हा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला समजला जातो. आपल्या अविरत मेहनतीने लोकांच्या समस्या सोडवत, त्याच्या मनात विश्वासाचा व आशेचा भाव निर्माण करत रामभाऊंनी अवघ्या तीन-चार वर्षांत हा मतदारसंघ आपलासा करून सोडला !

ही तीन-चार वर्षे आठवताच लोकाचे मन १९७७ च्या 'त्या' दिवसात जाऊन पोहचते. रामभाऊ हे मूळचे पुण्याचे ! म्हणून पुण्याच्या रामभाऊंचे ठाण्यात काय काम ? या सवालाचे ओझे घेऊन रामभाऊ नवीन मैदानात उतरले होते. जनसंघाची कावीळ झालेल्या लोकानी प्रथमपासूनच अपशकुनी पवित्रा घेतला होता; रामभाऊ कशालाच डगमगणारे नव्हते. आत्मविश्वास जबरदस्त होता ! निवडणूक ही एक शर्यत असते असे नेहमी म्हणणाऱ्या रामभाऊंनी शर्यत जिकायच्याच हेतूने शर्यतीत भाग घेतला होता.

तो एक प्रसंग आजही आठवतो. रामभाऊंबाबत खूप काही सांगणारा ! ठाणे जिल्ह्यातील 'त्या' एका गावात गावकऱ्यांनी एकाही उमेदवाराला गावातच न येऊ देण्याची प्रतिज्ञा घेतली होती. रामभाऊंचा इतर भागात प्रचार-दौरा चालू असतानाच कार्यकर्त्यांनी ही बातमी रामभाऊंना कळवली. रामभाऊंनी पुढचे कार्यक्रम थांबवून तडक आपली जीपगाडी याच गावाकडे वळवली.

रामभाऊ आपल्याकडेच येताहेत, या बातमीने गावकरी आश्चर्यचकित होऊ लागले; पण इतक्यात रामभाऊंची गाडी वेशीपाशी येऊन धडकली होती. संतापलेल्या गावकऱ्यांनी आपल्या नेहमीच्या भाषेत आपली सर्व गाऱ्हाणी रामभाऊंच्या कानी घातली. दोन तास रामभाऊ गावकऱ्यांचे म्हणणे शांतचित्ताने ऐकत होते. दोन तासांच्या त्या स्तब्धतेनंतर रामभाऊंनी गावकऱ्यांना विचारले, 'तुमचे सर्व म्हणणे मी दोन तास ऐकून घेतले. आता तुम्ही मला दहा मिनिटे बोलू द्याल का ?' रामभाऊंचा हा प्रश्न सहज होता. लोकाना तो पटल्याने रामभाऊ काय सांगतात हे ते ऐकू लागले. रामभाऊंनी पहिलाच प्रश्न केला की, एखाद्या डॉक्टरकडील औषध घेऊनही जर तुम्हाला वर्षानुवर्षे गुण येत नसेल तर तुम्ही काय कराल ?

गावकऱ्यांनी तडक उत्तर दिले— 'तर मग आम्ही तो डॉक्टरच बदलू !' रामभाऊ याच उत्तराची वाट पहात होते. दोन तासाच्या त्यांच्या परिश्रमाला अखेर फळ मिळाले होते. रामभाऊंनी या गावकऱ्यांना डॉक्टर बदलण्याचे आवाहन केले. गावकऱ्यानी त्यांचीच नवीन डॉक्टर म्हणून नेमणूक केली. त्या निवडणुकीत रामभाऊ ७०,००० मतांनी विजयी झाले !

### शेवटचा तडाखा

१९७७ चा विजय साजरा करतं असतानाच पहाता पहाता १९८० साल येऊन धडकलं. देशातील जनतासरकार कोसळल्याने सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या होत्या. रामभाऊ ठाण्याच्या मैदानात पुन्हा उतरले होते. या वेळची परिस्थिती विलक्षण वेगळी होती. १९७७ ची 'जनतालाट' ओसरली होती. वारे इंदिरालाटेकडे वळले होते. जनतातील अनेक रथी–महारथी धडाधड कोसळत होते. कार्यकर्त्यांना एकामागून एक जबरदस्त धक्के बसत होते. सर्वांचे चेहरे काळवंडले होते. मने कोमेजली होती. आशा फक्त एकच होती 'रामभाऊंचे काय ?'

चारी बाजूंनी फोन खणखणत होते 'रामभाऊंचे काय झाले ?' एक हजारांनी मागे, दोन हजारानी मागे, चार हजारानी मागे पडण्याचाच लीड वाढत होता. इंदिरा काँग्रेसच्या छावणीत जल्लोष चालू होता. 'आपणच जिंकलो' या आनंदात नाचणे, हेटाळणी करणे इत्यादी नेहमीचे प्रकार सुरू होते.

पण रामभाऊ ? ते तर अगदी स्थितप्रज्ञ होते ! मतमोजणीची फेरी संपली की ते स्वतःच 'रामभाऊ आठ हजारांनी मागे' असे सर्वांना सांगत होते; पण जबरदस्त विश्वासाने ते हेही सांगत होते की, शेवटचा तडाखा आपलाच आहे.

आणि रामभाऊंचा हा आत्मविश्वास खरा ठरला. त्यांनी मनाशी मांडलेले गणित अगदी बरोबर ठरले. मागेपणाची लाट भरून काढत रामभाऊ केव्हा पुढे सरकले हे प्रतिपक्षाला समजण्याच्या आत रामभाऊ दहा हजारांनी विजयी झाल्याचं घोषितही करण्यात आलं ! हा विजय नेत्रदीपक होता. रामभाऊंचे स्वत्व जोपासणारा, सांगणारा होता ! म्हणूनच रामभाऊंचा हा विजय 'सत्वप्रवृत्त राजकारणाचा' होय असं याचं अनेकांनी वर्णन केलं.

रामभाऊंच्या निधनानं रिकाम्या झालेल्या या लोकसभेच्या जागेसाठी होत असणाऱ्या निवडणुकीच्या परिस्थितीबद्दल लिहिताना रामभाऊंच्या हा इतिहासाकडे डोळेझाक करून


चालणार नाही, म्हणूनच तो प्रारंभी येथे दिला. या जागेसाठी आता १९ मेला मतदान होत आहे. प्रत्येक राजकीय पक्ष निवडणुकीची जोरदार तयारी करत आहे.

ठाण्याच्या या लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा मतदारक्षेत्रे येतात. पैकी कल्याण, ठाणे, अंबरनाथ आणि उल्हासनगर ही शहरी; तर मुरबाड आणि बेलापूर ही ग्रामीण विधानसभा क्षेत्रे आहेत. या मतदारसंघात एकूण ९ लाख २० हजार मतदार आहेत. यापैकी ४ लाख मतदार हे रोज मुंबईकडे नोकरीधंद्यासाठी जाणारे आहेत.

अशा या भारतातील सर्वांत मोठ्या समजल्या जाणाऱ्या ठाण्याच्या लोकसभा-जागेसाठी एकूण १५ उमेदवार रिंगणात उभे आहेत; परंतु ज्यामध्ये लढत होईल असे असे नाव घेण्यासारखे येथे चारच पक्ष आहेत ! इंदिरा काँग्रेसने या ठिकाणी ॲड. प्रभाकर हेगडे यांची आणखी एकदा निवड केली आहे. जनता पक्षाने वयोवृद्ध नेते श्री. दत्ताजी ताम्हाणे यांना येथे उभे केले आहे. कामगार नेते आ. डॉ. दत्ता सामंत हे कामगार आघाडीतर्फे येथे प्रथमच खासदारकीची निवडणूक लढवत आहेत. तर रामभाऊंच्या खांद्याला खांदा लावून ज्यांनी आपली संघटना खेड्यापाड्यांत पोहचवली ते श्री. जगन्नाथ पाटील हे भारतीय जनता पार्टीतर्फे ही निवडणूक लढवीत आहेत.

या चारीही उमेदवारांबाबत सविस्तर चर्चा करण्यापूर्वी या मतदारसंघात आतापर्यंत कोणकोणाला किती मते पडून त्यांचे येथे अस्तित्व शिल्लक राहिले हे पाहू. १९७७ सालच्या लोकसभा निवडणुकीत रामभाऊ म्हाळगी हे येथून ७०,००० मतांनी विजयी झाले, त्यानंतरच्या १९८०च्या लोकसभा निवडणुकीत रामभाऊ म्हाळगी हे पुन्हा येथून १०,२७५ मतांनी विजयी झाले. या वेळी म्हाळगींना १,८५,०००, इं. कॉं. चे हेगडे यांना १,७५,०००, शिवसेनेला ४०,०००, तर अर्स काँग्रेसला ३०,००० मते मिळाली. म्हणजे येथे खरी लढत इं. काँग्रेस व रामभाऊ म्हाळगी यांच्यातच झाली.

त्यानंतर १९८० साली विधानसभेच्या ज्या निवडणुका झाल्या त्यातही हेच दिसून आले. एकूण निवडणुकीबाबत उदासीन असलेल्या येथील मतदारांनी इं. काँग्रेसला




स्वावलंबी
भारतासाठी
—अटलजी

१,८२,०२० मते दिली. शिवसेनेने या वेळी इं. कॉं. ला पाठिंबा दिला होता. भारतीय जनता पार्टीला १,३२,२०० मते मिळाली ! जनता पार्टीला १५००० तर शे. का. प. ला २२००० मते मिळाली. सहा जागेचा या विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन जागा जिंकल्या, तर इं. कॉं.ने चार जागा जिंकल्या. म्हणजे या वेळीही येथे दुहेरीच लढत रंगली.

### तरुण आणि तडफदार

वरील सर्व आकडेवारीवरून हे सिद्ध होते की, येथे खरी ताकद इं. कॉं. आणि भाजप यांच्यामध्येच आहे. याच हेतूने भारतीय जनता पार्टीने या जागेवर आपला हक्क सांगून येथे जगन्नाथ पाटील यांची उमेदवारी घोषित केली.

या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचे जे उमेदवार उभे आहेत त्यात जगन्नाथ पाटील हे सर्वांत तरुण म्हणजे ३५ वर्षांचे आहेत ! श्री. पाटील हे डोंबिवलीनजीकच्या आयरे गावचे राहणारे रहिवासी असून आतापर्यंत त्यांनी विविध ठिकाणी चांगली कामगिरी बजावली आहे. १९७४ साली पालिका निवडणुकीत झोपडपट्टी विभागातून विजयी झाल्यानंतर त्यांनी डोंबिवली पालिकेत विविध पदे भूषवली. १९७५ साली आणीबाणी घोषित झाल्यानंतर त्यावेळच्या नगराध्यक्ष व उपाध्यक्षांना मिसाखाली अटक झाली. जगन्नाथ पाटील यांनी हंगामी नगराध्यक्ष म्हणून धैर्याने कारभार चालवला व तुरुंगातून सुटका होताच नगराध्यक्षांकडे पुन्हा सूत्रे सुपूर्द केली. त्यानंतर १९७८ साली ते अंबरनाथ विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मतांनी विजयी झाले !

निवडून आल्यानंतर त्यांनी अनेक योजना कार्यान्वित केल्या. वागणी येथील पाणीपुरवठा योजना दहा वर्षांपासून धूळ खात पडली होती, ती त्यांनी कार्यान्वित केली. मुरबाडलाही पाण्याचे हाल होत असताना त्यांनी तेथेही प्रयत्न करून त्या योजनेच्या कामास गती आणली.

आमदारकीच्या काळात त्यांनी कामगारवर्गासाठी घातक असणाऱ्या 'ठेकेदार काम-

गार पद्धतीचा कायदा ' रद्द करण्याची मागणी केली. ठेकेदारपद्धतीवर (Contract Labour Act) काम करणाऱ्या कामगाराला कायम कामगाराचे सर्व फायदे मिळावेत अशी त्यांनी मागणी केली.

या ठाणे-बेलापूर पट्टीत रोज कोठे ना कोठे संप, टाळेबंदी इत्यादी प्रकार चालूच असतात. दहशतवादामुळे कोणी कारखानदार कारखाना बंद करतो, तर अन्यायाविरुद्ध बंड पुकारण्यासाठी कोणी कामगारनेता संपाचे हत्यार बाहेर काढतो; परंतु या सर्व ठिकाणी मध्यस्थी करून तडजोड करण्याचे काम शेवटी त्या त्या भागातील समाजप्रमुखासच करावे लागते.

गेल्या काही वर्षांत जगन्नाथ पाटीलांनी अशी बरीच कामे केली. सात हजार कामगार काम करीत असलेल्या येथील एन. आर. सी. कंपनीत गेल्या वर्षी खूप हाणामाऱ्या झाल्या. व्यवस्थापकावर संतापलेल्या डॉ. दत्ता सामंताच्या येथील कामगारांनी पर्सोनल मॅनेजरना त्यांच्या केबिनमध्ये गाठून, त्यांच्या अंगावरील कपडे फाडून, त्यांची पाचावर धारण बसवली. या वेळी कामगारानी पर्सोनल मॅनेजरला मारल्याने त्याला दवाखान्यात दाखल केले होते. त्याचा परिणाम असा झाला की, या प्रकारामुळे व्यवस्थापक कंपनीला कुलुप लावतात की काय, अशी भीती सात हजार कामगाराना वाटू लागली; पण वेळीच जगन्नाथ पाटील आणि आ. राम कापसे यांनी मध्यस्थी करून हे सर्व प्रकरण शांत केले. एन. आर. सी. मध्ये जगन्नाथ पाटलांनी जी कामगिरी बजावली त्याचं कौतुक डॉ. सामंताचेही काही कामगार करतात.

येथील धरमशी मोरारजी कंपनीतही इंटकच्या युनियनकडून कामगारावर वरचेवर हल्ले होत होते. जगन्नाथ पाटलांनी येथे लक्ष घालून येथील दहशतवाद तर थाबविलाच; परंतु पहाता पहाता येथील सातशे कामगाराचे ते नेतृत्वही करू लागले. अशा प्रकारे अंबरनाथ ऑर्डनन्स, पायोनिअर इडस्ट्रीज, मुकुंद आयर्न आदी कंपन्यात त्यानी वेळोवेळी स्वतःच्या ताकतीप्रमाणे मध्यस्थी केली आहे व कामगाराचे न्याय्य सवाल सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

म्हणूनच भाजपने त्याची या जागेसाठी निवड केली. जगन्नाथराव हे ग्रामीण भागातून आल्यामुळे आणि वयाच्या पंधरा वर्षापासून त्यानी राजकारणात काम केल्यामुळे लोकाशी त्याचा संपर्क असून, संघटनात्मक कामातही ते येथे यशस्वी ठरले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर भाजप, रामभाऊ म्हाळगीच्या स्मृती जागवत ही निवडणूक लढवीत असून, पाटील यशस्वी होतील या आत्मविश्वासावरच त्यांनी त्याची निवड केली आहे.

जगन्नाथ पाटलांच्या निवडणूक-प्रचाराचा शुभारंभ खासदार जगन्नाथराव जोशी यांच्या शुभहस्ते येथे नुकताच पार पडला. जगन्नाथराव जोशी यांच्या हस्ते प्रचाराचा शुभारंभ होणे ठाणेकर अगदी शुभ समजतात. १९७७ व १९८० या दोन्ही निवडणुकीच्या वेळी रामभाऊ म्हाळगीच्या निवडणूकप्रचाराचा शुभारंभ जोशी याच्याच हस्ते झाला आणि दोन्हीहीवेळी रामभाऊ विजयी झाले ! म्हणूनच यावेळीही पाटील विजयी होणार असा आत्मविश्वास येथील कार्यकर्त्यांना वाटतो. या पहिल्याच जाहीर सभेत " नादान राज्यकर्त्यांना पराभूत करा " असं आवाहन जगन्नाथरावानी येथील मतदारांना केले.

श्री जोशीच्याच जोडीला महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस श्री. प्रमोद महाजन याचेही यावेळी भाषण झाले. एक पट्टीचा वक्ता म्हणून प्रमोद महाजन आज महाराष्ट्रात परिचित होत आहेत. ज्यांनी एकदा प्रमोद महाजनाचं भाषण ऐकलं ते पुन्हा: त्याचं भाषण ऐकण्याचा मोका सोडत नाहीत हा आतापर्यंतचा अनेकाकडील अनुभव आहे. अशा या प्रमोद महाजनाचं भाषण यावेळी खूपच काही सागून गेलं. भाषणामुळे श्रोत्याची मने हेलावली. ते म्हणाले, "अश्रू पुसत वाटचाल करण्याची शिकवण म्हाळगीनी आम्हाला दिली. त्यामुळे म्हाळगीनी भूषविलेली ही जागा आम्ही ' विक्रमादित्याचे सिंहासन' समजतो !

म्हणूनच ही जागा भाजपच्या प्रतिष्ठेची बनून राहिली आहे. आतापर्यंत या मतदारसंघात दुहेरीच लढती रंगल्या आहेत; पण डॉ. दत्ता सामंताच्या आगमनाने यावेळी फार दिवसानतरहा इतिहास बदलला जाणार आहे.

गिरणीकामगारांचा प्रश्न सोडविण्याकामी सरकारने जी ताठर भूमिका घेतली व हा प्रश्न रेंगाळत ठेवला त्याचा निषेध म्हणून डॉ. सामंत ही खासदारकीची निवडणूक लढवीत आहेत. डॉ. सामंताचे नेतृत्व लढाऊ आहे. एक झुजार कामगारनेता म्हणून त्यानी कामगारक्षेत्रात ख्याती मिळवली आहे.

## सामंतांचे गणित

या वर्षी १८ जानेवारीपासून त्यांनी मुंबईतील सुती कापडउद्योगधंद्यात जो बेमुदत संप पुकारला, त्यानं त्यांच नेतृत्व महाराष्ट्राला परिचित झालं. हाच सवाल हाताशी धरून ते ही निवडणूक लढवत आहेत आणि यात आपण नक्की विजयी होणार असा आत्मविश्वास त्याच्या सर्वच कार्यकर्त्यांना वाटत आहे.

डॉ. सामंतांच्या निवडणूकयंत्रणेने एक गणित मांडले आहे. ठाण्याच्या या मतदारसंघात आपले एकूण २,५०,००० कामगार आहेत आणि त्यांचे कुटुंबीय धरून नक्की येथे तीन ते साडेतीन लाख मते आपल्याला पडतील असा त्यांचा दावा आहे. आपण पहिले, भाजप दुसरा व इं. कॉं. तिसऱ्या क्रमाकावर जाईल असे सागणारे त्याचे येथे अनेक कार्यकर्ते आहेत. कारण मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीनंही त्याना पाठींबा जाहीर केला आहे.

परंतु गेल्या काही वर्षांत डॉ. सामंतानी येथील कामगारांसाठी काय काय केले हे थोडे तपासून पहावयास हवे. १९७५-७६ मध्ये डॉ. सामंतांनी येथील मुकुंद आयर्न कंपनीमध्ये फार मोठा संप केला; परंतु मुकुंदचे विरेन शहा याच्यापुढे डॉक्टराचे फार काही चालले नाही. सीमेन्स इंडियामध्येही असेच झाले. वर्षभर काम बंद करूनही डॉ. सामंताना येथे मान्यता मिळाली नाही; पण याचा परिणाम असा झाला की, सीमेन्स व्यवस्थापकांनी आपल्या कळवे येथील कारखान्याचा विस्तार ताबडतोब थांबवून नासिक येथे कारखान्याची उभारणी केली. म्हणजे सुमारे हजार कामगाराना रोजगार देणारा हा प्रकल्प डॉ. सामंतांमुळे बाहेरगावी गेला. नोसिलमधील कामगाराना फारसे काही मिळालेच नाही. येथील मर्फी रेडिओ व मफतलाल इंजिनियरिंगमधील सुमारे पाच हजार कामगार तर गेल्या काही महिन्यापासून घरीच आहेत !

कामगारचळवळीद्वारे मिळविलेल्या नावलौकिक वर डॉ. सामत लोकसभा गाठू पहात आहेत; पण ते खूप कठीण आहे. कारण ज्या

कामगारांना डॉ. सामंतांनी काही तरी मिळवून दिले ते सहा–सहा महिने संप करून फार मोठे गमावल्यानंतरच ! म्हणूनच डॉ. सामंतांचे सभासद असणारे सर्वच कामगार आणि त्यांचे कुटुंबीय डॉ. सामंतानाच मत देतील असं म्हणणं बरोबर नाही. दुसरं असं की, ज्या ठाणे–बेलापूर पट्टीतील कारखान्यात डॉ. सामंत नेतृत्व करतात तेथील बरेचसे कामगार मुंबईतच रहाणारे आहेत. त्यामुळे अर्थातच ही मते डॉक्टरांना मिळू शकणार नाहीत.

डॉ सामंतांप्रमाणे या पट्टीत, राजा कुलकर्णी, वस्तूर, आर. जे. मेहता, खानोलकर आदी कामगार नेत्यांच्या संघटना येथील अनेक कारखान्यांत आहेत. त्यांनी डॉ. सामंतांना पाठिंबा अर्थातच दिलेला नाही.

निवडणूक ही एक विशिष्ट पद्धतीने चालविली जाणारी यत्रणा आहे. त्यामध्ये योजनापूर्वक सातत्याने काम करण्याची आवश्यकता आहे. या कोणत्याच चाकोरीत डॉ. सामंत बसणे कठीण ! मग एका महिन्याच्या मर्यादित काळात सहा विधानसभा मतदारसंघातून विखुरलेल्या लक्षावधी मतदारापर्यंत डॉ. सामंत कसे पोहचणार ?

डॉ. सामंतांप्रमाणे इंदिरा काँग्रेसचे अॅड. प्रभाकर हेगडे यांनाही ही निवडणूक एक आव्हान आहे. प्रभाकर हेगड्यांची उमेदवारी पक्षाने घोषित केलेली असली तरी येथील इं. कॉं. च्या कार्यकर्त्यांच्यातच त्याबद्दल नाराजी आहे. ठाणे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांच्याकडे होते. येथील प्रबल वर्तक गटाला ही व्यवस्था प्रारंभीपासून अमान्य होती. त्यातून हेगड्यांवर आपत्ती कोसळली. त्यांनी त्या गटाशी दिल्लीपर्यंत सामना दिला आणि पुन्हा अध्यक्षपद मिळवले. त्यामुळे वर्तक गटावर त्यांनी बाजी मारल्यामुळे येथे अंतर्गत कलह पूर्वीपासून खदखदत आहे. अशातच या जागेसाठी महिला उमेदवारी मिळावी म्हणून श्रीमती शकुंतला परांजपे यांनी येथे आवाज उठविला. हा आवाज बिनवजनाचा असल्यामुळे त्यांचे फार काही चालले नसले तरी हेगडे नकोत हे म्हणण्यास हा आवाज पुरेसा आहे हे नक्की !

### अपशकुन

आता जनता पक्षाच्या श्री. दत्ताजी ताम्हाणे यांच्या उमेदवारीचे काय व कसे वर्णन करायाचे ? एका शब्दातच सांगावयाचे झाल्यास भारतीय जनता पक्षाला अपशकुन करण्यासाठीच त्यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे !

१९८० च्या विधानसभेचे निकालच पहा! सहा विधानसभा मतदारसंघापैकी फक्त दोनच ठिकाणी जनता पक्षाने त्या वेळी निवडणूक लढवली आणि दोहीत त्यांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. फक्त त्यांना १५००० हजार मते पडली. असे असताना भाजपने या जागी आपला उमेदवार उभा करू नये असे जे जनता पार्टीचे लोक म्हणतात ते हास्यास्पद नव्हे काय ?

रामभाऊ म्हाळगीच्या निधनानतर ठाणे जिल्हा जनता पार्टीने एक पत्रक काढले होते. त्या पत्रकात म्हटले होते की, ठाण्याची ही जागा पहिल्यापासून 'जनता'ची असल्याने भाजपने आपला उमेदवार येथे उभा करू नये व ही जागा सातत्याने विरोधकांकडे राहिल्याने इंदिरा काँग्रेसनेही येथे निवडणूक लढवू नये ! जनता पार्टीच्या या पत्रकाच लोकानी मग 'करमणूक' म्हणूनच स्वागत केलं !

विरोधकांनी येथे एकच उमेदवार उभा रहावा व तो भाजपचाच असावा म्हणून अनेक प्रयत्न करूनही त्याला येथे यश आले नाही. प्ररंभीपासूनच जनता पक्षाने येथे विरोधी भूमिका घेतली. राजारामबापू पाटलांनी समेट म्हणून शेवटी अशी सूचना केली होती की, या वेळी भाजपने आपला उमेदवार उभा करावा; पण १९८५ ला ही जागा जनताला द्यावी; पण संघटनात्मकरीत्या सर्व खेड्यात पोहोचलेल्या भाजप कार्यकर्त्यांना हा विचार कसा रुचेल ? त्यांनी यावर प्रतिप्रश्न केला की, मधु दंडवतेंचा 'त्या' भागात जोर असताना, ती जागा पाच वर्षांसाठी आम्हास द्याल का ?

म्हणूनच जनता पक्षाच्या नादाला न लागता भाजपने स्वबलावर रिंगणात प्रवेश केला. जगन्नाथ पाटलाच्या जागेशी खूप गोष्टी आहेत. एक तर महागाईने जर्जर झालेले लोक इंदिरा सरकारवर नाराज आहेत. इं. कॉं. सत्तेवर आल्यापासून कायदासुव्यवस्था तर बिघडलीच; पण महागाई, बेकारी वाढून गरीब गरीबच राहिला. मात्र मंत्र्यांनी भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचे रूप देऊन राज्यात भ्रष्टाचार वाढवलाच. म्हणूनच इं. कॉंग्रेसवर नाराजी व्यक्त करण्याची लोकाना याद्वारे संधी मिळत आहे आणि अशातच देशातील विरोधी पक्ष कमकुवत बनत असतानाच स्वबलावर उभी असलेली भारतीय जनता पार्टी इं. कॉं. ला पर्याय म्हणून लोकासमोर येत आहे.

ज्या पक्षाने रामभाऊ म्हाळगीसारखे नेते निर्माण केले आणि या भागातील अनेक समस्या वेशीवर टांगल्या त्याच पक्षाला आणखी एकदा निवडून देण्याच्या मन.स्थितीत येथील मतदार आहेत. रामभाऊंनी मध्य रेल्वेने प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांच्या अडचणी लोकसभेपर्यंत मांडल्या, या भागात संध्याकाळी पोस्ट ऑफिस उघडण्यास सरकारला भाग पाडले म्हणून येथील जनता रामभाऊंची जाण कधीही विसरू शकत नाही. शेवटी शेवटी तर रामभाऊ हे भाजपचे न राहता ते संपूर्ण समाजाचे सेवक बनले होते !

रामभाऊंचे हे काम जगन्नाथ पाटलांना नक्कीच साथ देणारे आहे. त्याचबरोबर दोन आमदार, तीन नगराध्यक्ष, १०५ नगरसेवक, ५ जिल्हा परिषद सदस्य, ३ कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य आणि दहा हजार कार्यकर्त्यांचा संघ जगन्नाथ पाटलासाठी गेल्या महिन्यापासून कंबर कसून कामास लागला आहे. या मतदारसंघात असणाऱ्या ४७० खेड्यापैकी ३६० खेड्यांना आतापर्यंत जगन्नाथ पाटलांनी प्रत्यक्ष भेट दिली आहे. व्यक्तिश सभा घेऊन त्यांनी लोकाशी प्रत्यक्ष संपर्क साधल्याने लोक या तरुण उमेदवारावर व त्याच्या या कार्यावर खुष आहेत.

भाजपचा या भागातील जोर कबूल करून समाजवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी भाजपला येथे पाठिंबा दिला आहे. भाजपच्या या उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रत्यक्ष शरद पवारच आता अनेक सभेत भाषणे करून हा उमेदवार विजयी करण्याचे लोकांना आवाहन करणार आहेत. शरद पवारांप्रमाणे महाराष्ट्र मुस्लिम लीग आणि रिपब्लिकन खोब्रागडे गटानेही जगन्नाथ पाटिलांना आपला पाठींबा जाहीर केला आहे. हा पाठिंबा सक्रीय असल्याने वातावरण झपाट्याने बदलत आहे ◻

## अटलजी सभा....

भारतीय जनता पार्टीचे खास आकर्षण म्हणजे अटलजींची भाषणे ! ७ मेला खा. अटलबिहारी वाजपेयी यांनी सकाळी ८॥ ते रात्री १ पर्यंत या मतदारसंघातील सात गावी जाहीर भाषणे केली. प्रत्येक सभेला अलोट गर्दी होती. जनतेचा उत्साह अवर्णनीय होता. सभेची ही गर्दी, लोकांचा हा उत्साह पाहून १९७७ सालच्या 'त्या' दिवसाची आठवण येत होती. मला तो प्रसंग आठवतो ! आणीबाणी उठवून देशाला सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्याने जनतापार्टीच्या नेत्याना पाहण्यासाठी, त्यांचे भाषण ऐकण्यासाठी आम्ही तरुण त्या वेळी अगदी वेडे झालो होतो. कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर या गावी त्या वेळी रात्री ९ वाजता मोहन धारियांची एक जाहीर सभा होणार होती. आमचं राहतं गाव शिरोळ ! जयसिंगपूर शिरोळपासून ५ मैलांवर. तरीही एसटीने आम्ही काही तरुण या सभेसाठी रात्री ८ ला पोहचलो. आठचे नऊ झाले, नऊचे दहा, दहाचे अकरा झाले तरीही मोहन धारियांचा पत्ता नाही ! पण वातावरणात उत्साह इतका जबरदस्त होता की, कोणीही स्त्री-पुरुष जागचे हालले तर नाहीच पण उलट आजूबाजूच्या खेडेगावांतून हजारो लोक मिळेल त्या साधनाने, प्रसंगी चालत या सभेसाठी येत होते ! अखेर धारिया रात्री १ वाजता आले, ५ मिनिटे बोलले आणि निघूनही गेले; पण त्याने लोकांच्यातील उत्साह इतका वाढला की, दुसरे दिवशी अनेक खेडेगावात जनता पार्टीची नवीन शाखा सुरू झाली !

काल ठाण्यातही मी हेच पाहिले. दुपारी ४ पासून रात्री २ पर्यंत मी अटलजींच्या दौऱ्यामध्ये होतो. ठाण्याची सभा रात्री दहाला सुरू होणार होती; पण प्रत्यक्षात ती रात्री १२॥ ला सुरू झाली, तरीही सभेतील चिटपाखरू हाललं नाही ! बायका–पुरुष, लहानमुले याना केवळ एकच ध्यास होता अटलजींच्या दर्शनाचा ! त्यांच्या भाषणाचा!

मुरबाड, मोहने, अंबरनाथ, कल्याण, उल्हासनगर, डोंबिवली आणि ठाणे येथील प्रत्येक सभेत अटलजींनी मतदारांना इंदिरा काँग्रेसच्या या सैतानी भ्रष्ट सरकारला पराभूत करण्याचं आवाहन केलं. ज्या स्वावलंबी भारताचं स्वप्न आम्ही पाहिलं आणि ते साकार करण्यासाठी आम्ही झटलो तो भारत इंदिरा राज्यात आज भिकारी बनला आहे, याचं दुःख व्यक्त करून अटलजी म्हणाले, 'वॉशिंग्टनमध्ये हात पसरून ५००० कोटी डॉलर्स कर्ज भारतानं मिळवलं. आम्हीही जनता राजवटीत वॉशिंग्टनमध्ये गेलो होतो; पण ते कर्ज मागण्यासाठी नसून बरोबरीचे संबंध निर्माण करण्यासाठी ! जनता राज्यात आम्ही कोणाकडून भीक मागितली नाही; उलट अफगाणिस्तानला आणि बांगला देशाला आम्ही धान्यपुरवठा केला; पण तोच १९७८ मधील भारत आज १९८२ साली गहू, तेल, सिमेंट, स्टील, रबर इत्यादी अनेक वस्तू परदेशांतून आयात करत आहे आणि देशाची शान घालवत आहे !

पंतप्रधान इंदिरा गांधीच्या दोन वर्षांतील कारभाराचा या वेळी अटलजींनी आढावा घेतला आणि प्रत्येक क्षेत्रात इंदिरा गांधीना कसं अपयश आलं ते सांगितलं. मंगलसूत्राचा बाऊ करून निवडणुका जिंकणाऱ्या इंदिरा राज्यात अत्याचार, भ्रष्टाचार, बेकारी, गरिबी, महागाई वाढली हे त्यांनी उदाहरणांनी स्पष्ट केले. आमच्या राज्यात रेशनकार्ड विसरून गेलेल्या जनतेला इंदिरा राज्यात साखरेसाठी, गव्हासाठी, रॉकेलसाठी स्वतंत्र लाइन लावावी लागते हे विदारक सत्य त्यानी सांगितले !

आज संपूर्ण भारत धोक्यात आहे. पंजाबात आग लागली आहे तर आसाम गेल्या दोन वर्षांपासून जळत आहे. पण आमच्या गृहमंत्र्यांना प्रत्येक गोष्टीत एकच, म्हणजे 'विदेशी हात' दिसतो ! विदेशी हात असल्याचं ते सांगतात; पण प्रत्यक्षात ते तो कधीच दाखवत नाहीत. मीही दोन वर्षं परराष्ट्रमंत्री म्हणून काम पाहिलं आहे; पण मला तरी हा विदेशी हात कधी दिसला नाही. म्हणूनच माझं स्पष्ट मत आहे की, या सर्व गोष्टीत एकच हात आहे आणि तो म्हणजे...( हाताचा पंजा ही खूण दाखवत) याच हातानं या देशाला भिकारी बनवलं, तरुणाना बेकार बनवलं, देशात महागाई वाढवली म्हणूनच येणाऱ्या पोटनिवडणुकीद्वारे हा असंतोष प्रकट करा ! घमेंड चढलेल्या सरकारला जाग आणण्यासाठी भाजपला विजयी करा ! लोकसभेत विरोधकांचा आवाज बुलंद करा !

अटलजींच्या या एक दिवसाच्या दौऱ्याने वातावरणात एक उत्साह आला असून आता याच्यापुढील एक एक सभा रंगणार आहेत. अटलजींच्या नंतर आता शरद पवार भाजपच्या प्रचारासाठी या दौऱ्यावर येणार आहेत. खा.जॉर्ज फर्नांडिसही येणार असल्याचं अटलजींनीच सांगितलं.

## हशा–प्रचंड हशा....

गेल्या दोन वर्षांत तीन रेल्वेमंत्री झाले; पण रेल्वेच्या कारभारात सुधारणा होण्याऐवजी हा कारभार अधिकच बिघडला असे अटलजी म्हणाले. आज तिकिट काढून जर कोणी रेल्वेत बसेल तर रेल्वे त्याला अशा ठिकाणी पोहचवेल की, तेथून तो कधी परतणारच नाही ! (हशा) म्हणूनच आमच्या एका मित्राने सरकारला सूचना केली की, मंत्र्याना रेल्वेत बसवा। म्हणजे त्यामुळे एक तर रेल्वेचा कारभार तरी सुधारेल नाही तर मंत्र्यांची संख्या तरी कमी होईल ! (प्रचंड हशा.)

एका नवराबायकोचे घरी जोरदार भांडण झाले. त्रासलेला नवरा जीव देण्यासाठी रेल्वे-लाइनवर पडला; पण तासाचे दोन तास, दोन तासाचे तीन तास झाले तरी रेल्वे आली नाही. शेवटी कंटाळून तो घरी परतला. घरी परतल्यावर बायको. म्हणाली, 'जान देने गये थे न, क्या हो गया ?'

नवऱ्याने उत्तर दिले, 'मैं तो जान देने गया था लेकिन तीन घंटा रेलही नही आयी तो मैं क्या करूँ ?'

पत्नी म्हणाली, 'जान देना हो तो पटरिओपर ( रेल्वे-लाइन ) नही, रेलमे जा के बैठो ! (प्रचंड हशा ! )

आधीच संख्येने जास्त असलेल्या इंदिरा काँग्रेसला मत देण्यापेक्षा जगन्नाथ पाटलांना मत देऊन 'मेरी आवाजको ताकद दो !' असं अटलजी म्हणाले.

अंतुलेंच्या सिमेंटप्रकरणावर भाष्य करताना अटलजी म्हणाले, 'पहले अंतुलेने सिमेंटको खाया लेकिन बादमें सिमेंटनेही अंतुलेको खा लिया ! (प्रचंड हशा).'

आतापर्यंत भारत परदेशातून गहू, तेल, रबर, साखर, सिमेंट, पोलाद अशा अनेक

पृष्ठ ३५ वर

उत्तरमीमांसा : ५०

स. शि. भावे

# फॉकलंड बेटे आणि भारतीय सेनादल

फॉकलंड बेटांच्या प्रश्नात ब्रिटन आणि अमेरिका यांची मूळ साम्राज्यवादी वृत्ती आणि सिद्धसाधक धोरण चरचरीतपणे प्रकट झाले आहे तसेच रशिया व चीन यांचा मतलबीपणा देखील झकास दिसून आला आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर हे वारंवार दिसून आले आहे की, महासत्ताना जगात वर्चस्व-क्षेत्राची कल्पना फार आवडलेली आहे. अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स व चीन ही राष्ट्रे यूनोच्या सुरक्षामंडळाची कायम सभासद झाली तेव्हाच त्याना महासत्ता म्हणून अधिष्ठान मिळाले. या महासत्तांच्या वर्चस्व-क्षेत्राचा समतोल हा गेल्या तीस-चाळीस वर्षांतील आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वेधविषय होऊन राहिला आहे.

प्रत्येक महासत्तेने आपले म्हणून एक वर्चस्व-क्षेत्र निवडले आहे. त्यात दुसरी महासत्ता घुसते आहे की काय, अशी शंका आली की, दोन महासत्ता एकमेकींवर गुरगुरू लागतात; पण अशी घुसाघुसी नसेल तेथे त्या त्या महासत्तेला इतर महासत्ता खुशाल स्वतःचे वर्चस्व गाजवू देतात !

फॉकलंड बेटांच्या बाबतीत हेच झाले आहे. अर्जेंटिनाच्या शासकांना बहुधा असे वाटले असावे की, सध्या साम्राज्यविरोधी हवा यूनोत असल्याने, फॉकलंड बेटे जवळची म्हणून आपल्या सार्वभौमत्वाखाली आणली तर बहुधा ते खपून जाईल. तक्रारी होतील. कुरकूर होईल. पण डाव यशस्वी होईल. पण ब्रिटनने हा डाव यशस्वी होऊ दिलेला नाही.

मार्गारेट थॅचरबाई पंतप्रधान नसत्या तर ब्रिटनने आज जे कडक धोरण स्वीकारलेले दिसत आहे ते स्वीकारलेही नसते. परंपरावादी विचारसरणीत (conservatives) ब्रिटनचे जागतिक श्रेष्ठत्व या कल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे आणि ब्रिटनच्या भूतपूर्व व ऊर्वरित साम्राज्याविषयी आपुलकी आहे. सात हजार सागरी मैल अंतरावरची नापीक फॉकलंड बेटे ताब्यात ठेवण्यासाठी ब्रिटन आज स्वत.ला न पेलणारा खर्च करीत आहे आणि भावी चलनवाढीची वाट मोकळी करून देत आहे, याच्या पाठीमागे राजनैतिक कारणे जशी आहेत, तसे हे भावनात्मक कारणही आहे.

राजनैतिक कारणाचा अधिक खुलासा करायला हवा. दक्षिण ध्रुवापासून, म्हणजे अंटार्क्टिका खंडापासून अतिशय जवळच्या अंतरावर ही बेटे आहेत. अंटार्क्टिका खंडावर आणि त्याच्या भोवतालच्या समुद्रावर प्रभुत्व कोणाचे, हा प्रश्न रणनीतीच्या दृष्टीने आज सर्वांत महत्त्वाचा आहे. या मुलखात ज्या राष्ट्राचा पायरव असेल ते राष्ट्र बलवान ठरणार ! उलटपक्षी जे राष्ट्र बलवान आहे ते या प्रदेशात शिरकाव साधून पाय रोवण्याचा प्रयत्न करणार. आज या क्षेत्रात राजनीती व रणनीती अशा रीतीने एकत्र गुतलेल्या आहेत. दक्षिण ध्रुवक्षेत्रात भारताने देखील तातडीने संशोधन-पथक पाठविले ते या राज-रण-नीतीच्या गरजेतूनच पाठविले.

हिंदी महासागरात जे महत्त्व दी गो गार्सियाचे तेच अटलांटिक महासागरात फॉकलंड आणि जॉर्जिया बेटाचे आहे. अर्थात्, दी गो गार्सियाप्रमाणे फॉकलंडवरही आपलेच प्रभुत्व असावे असे ब्रिटन आणि त्याबरोबरच अमेरिकेला वाटणे स्वाभाविक आहे. कारण ब्रिटन आणि अमेरिका याचे राजनैतिक हितसंबंध बहुतांशी एकमेकांस पूरक आहेत आणि फॉकलंडपरिसरावरील लष्करी प्रभुत्वाबाबत तर ते निश्चितच पूरक आहेत.

फ्रान्स, रशिया व चीन या महासत्ताची या बाबतीतील भूमिका समजावून घेणे इष्ट आणि मनोरंजक ठरेल. फ्रान्सचा एक मनोगंड आहे. ब्रिटन-अमेरिका आपल्याला नेहमी कमी लेखतात, हा तो गंड आहे. म्हणूनच, ब्रिटन-अमेरिकेपेक्षा आपले धोरण वेगळे असायला हवे आणि ते दिसायलाही हवे, अशी दक्षता द गॉलपासून सारे फ्रेंच-नेते घेत आले आहेत. याखेरीज, प्रत्यक्ष युरोपात असल्याने जर्मनीप्रमाणे फ्रान्सला संभाव्य रशियन आक्रमणाच्या पहिल्या दणक्याची भीती जास्त वाटते. या दोन कारणांनी एकीकडे ब्रिटन अमेरिका आणि दुसरीकडे रशिया या दोन्ही अतिमहासत्ताशी समान सबंध (आणि समान अतर) राखणे हे फ्रान्सचे धोरण आहे. म्हणून फॉकलंडबाबत आज फ्रान्स तटस्थ आहे. ब्रिटनला फ्रान्सचा पाठिंबाही नाही, विरोधही नाही.

रशियाला आता तटस्थ राहावे लागत आहे. तसा रशियाने ब्रिटनला जाहीर इशारा दिला आहे. अर्जेन्टिनाविरुद्ध आधुनिक, प्रगत, आण्विक शस्त्रसामग्री वापरू नका, असा जाहीर इशारा दिला आहे. पण इस्रायल-इजिप्त संघर्षात रशिया ईजिप्तच्या मदतीला गेला नाही किंवा इराण-इराक संघर्षात इराकच्या मदतीला गेला नाही. तसाच आता तो अर्जेन्टिनाच्या मदतीलाही जाणार नाही.

प्रत्यक्ष संघर्षात उतरणे रशियाला आवडत नाही आणि बहुधा परवडतही नाही. उत्तर व्हिएतनाम आणि उत्तर कोरिया यांना हा अनुभव पूर्वी आलेला आहे. जागतिक प्रभुत्व मिळविण्यात ताकद वाया घालविण्यापेक्षा स्वतःभोवताली अंकित राष्ट्राचे कडे उभारून स्वसंरक्षणासाठी उपयोगी अशी बफर तटबंदी उभारणे हे रशियाचे गेल्या चाळीस वर्षांतील सूत्र आहे. झेकोस्लोवाकिया, फिनलंड, अफगाणिस्तान या राष्ट्राशी रशियाचे वागणे याच दृष्टिकोणातून झालेले आहे. रशियन अस्वलाची ही आत्मरत, संशयी आणि बाह्य जगाविषयी अगर कोठल्याही तत्त्वप्रणालीविषयी बेफिकीर वृत्ती फार जुनी आहे. चाळीस साली स्टालिनने हिटलरशी केलेला करार आणि महायुद्धानंतर मार्शल टिटोशी मांडलेला विरोध या परस्परविरोधी भासणाऱ्या घटना अलिप्त, बर्फखंड, आत्मसंरक्षक वृत्तीशी सुसंगतच आहेत.

म्हणूनच फॉकलंडची मालकी कोणाकडे जाते याबद्दल रशिया उदासीन आहे. अर्थात् तो बेपर्वा नाही. अर्जेन्टिनाच्या ताब्यात फॉकलंड बेटे गेली असती तर रशियाला जास्त बरे वाटले असते. कारण मग त्याला अप्रत्यक्ष नियंत्रणाची आवडती खेळी खेळण्याची संधी मिळाली असती. आता तसे झाले नाही म्हणून रशिया खट्टू झाला असणार; पण भांडणात प्रत्यक्ष गुंतण्याइतके याचे महत्त्व त्याला वाटत नाही. तिसऱ्या जगाची सहानुभूती मिळविणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट या प्रकरणी रशियाने आज डोळ्यांसमोर ठेवलेले दिसते.

चीनचे तर नेहमीच 'मुरारेस्तृतीय: पन्था:' असे धोरण असते. चीनच्या पश्चिमेस पाकिस्तानपासून तो जपानच्या पूर्वेस पॅसिफिक महासागराच्या मध्यापर्यन्त चीन आपले प्रत्यक्ष वर्चस्वक्षेत्र मानतो. अर्थात् फॉकलंड बेटे ब्रिटनच्या ताब्यात राहिली काय किंवा अर्जेन्टिनाच्या ताब्यात गेली काय, चीनला त्याचे सोयरसुतक नाही. मात्र, प्रत्यक्ष वर्चस्वक्षेत्राच्या रक्षणासाठीच अप्रत्यक्ष वर्चस्वक्षेत्र हवे असते. त्याबाबत, तिसरे जग आणि विशेषतः दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रे यांची सहानुभूती आपणांकडे असावी, असे रशियाप्रमाणे चीनचेही धोरण असते. ही सहानुभूती मिळविण्यासाठी रशिया व चीन याच्यात स्पर्धा असते. असते. म्हणून अर्जेन्टिनाच्या ताब्यात फॉकलंड बेटे गेली आणि अर्जेन्टिनाच्या राजवटीवर स्वतःला प्रभुत्व ठेवता आले तर ते चीनसा आवडेल. त्यातही अमेरिकेचे राजनैतिक डावपेच अयशस्वी झाले तर तेही चीनला हवे आहे. तैवानला राजनैतिक आणि लष्करी पाठिंबा देण्याचे अमेरिकेने अजून सोडलेले नाही, हा चीनचा अमेरिकेवर राग आहे. तसेच, लष्करी कारवाईने तैवान जिंकता आले तर तेही चीनला हवे आहे. अर्जेन्टिनाचा फॉकलंड बेटाचा बळकाव विश्वमान्य होणे आणि अमेरिका व ब्रिटन याचे नाक कापले जाणे ह्या दोन्ही गोष्टी चीनला यासाठी मनातून हव्या आहेत. सध्या मात्र हे सारे मनात ठेवून साम्राज्यवादाला शिव्या देण्याचे धोरणच तो पत्करणार !

अमेरिकेच्या धोरणात अधिकच गुंतागुत आहे. एकही बार न उडता हा प्रश्न सुटावा अशी अमेरिकेची धडपड होती. एकीकडे ब्रिटनला उपकृत करणे आणि दुसरीकडे अर्जेन्टिनाला मिंधे करणे या दोन्ही गोष्टी त्यात साधल्या असत्या. पॅसिफिक व अॅटलांटिक ह्या दोन्ही महासागरांवर प्रभुत्व गाजवणारी महासत्ता म्हणून अमेरिकेचे महत्त्व वाढले असते. महासत्तातही एकमेवाद्वितीय असे आपले आसन सिद्ध व्हावे असे अमेरिकेला नेहमीच वाटत आलेले आहे. त्या एकमेवाद्वितीयत्वाकडे अमेरिकेचे एक पाऊल पडले होते. शिवाय, संरक्षणास मदत म्हणून फॉकलंड बेटांवर आपले लष्करी अस्तित्व सुरू करण्याची संधीही कदाचित अमेरिकेला मिळाली असती. परराष्ट्रमंत्री श्री अलेक्झांडर हेग यांनी या विचारानेच आपले झंझावाती प्रयत्न सुरू केले होते; पण हे प्रयत्न विफल झाले. म्हणून, आता राष्ट्रसंघाचेच या बेटांवर निरीक्षण हवे, या नव्या सूचनेतून असा काही शिरकाव करता येतो का हे अमेरिका अजमावून पाहत आहे.

¤

म्हणजे बघा. फॉकलंड बेटे ती केवढी ! पण त्यांच्यावरील प्रभुत्वाकडे साऱ्या महासत्ताचे लक्ष लागून राहिले आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षच आपले वर्चस्व या भागात असावे या हेतूने साऱ्या महासत्ता या प्रश्नाबाबत मनाने सज्ज आहेत. या सज्ज असण्यात कोणाचाही कोठलाही मानवतावादी दृष्टिकोण नाही. स्वसंरक्षण, प्रभुत्व, साधली तर प्रभुसत्ता, नाही तर अधिसत्ता, असा हा त्या त्या राष्ट्राचा राष्ट्रीय स्वार्थाचा दृष्टिकोण आहे.

भारताने, म्हणजे आपण हे नीट समजून घेतले पाहिजे. आतरराष्ट्रीय व्यवहारात राष्ट्रीय स्वार्थ साधणे हे एकमात्र महत्त्वाचे सूत्र असते. मानवता, विकसनशील राष्ट्रांना मदत, व इ० इ० बाहेरची लेबले असतात. काश्मीरचा प्रश्न यूनोत नेऊन, स्वयंनिर्णयाचा हक्क काश्मिरी जनतेला देऊ असे आश्वासन देऊन, भारत अशा लेबलांच्या आवाहनाला अनेक वेळा बळी पडलेला आहे. १९७२ सालचा चीनने आपला केलेला मानभंग आणि पराभव या लेबलावर जादा भरवसा ठेवल्यानेच आपण ओढवून घेतला ! १९६५ साली दिवंगत लालबहादूर शास्त्रीनी आणि १९७१ साली इंदिरा गाधींनी राष्ट्रीय हिनसंबंधाची योग्य जाणीव ठेवली होती; पण आज १९८२ साली परिस्थिती काय आहे ? आक्रमणाला तोंड देण्यास आपण कितपत समर्थ आहोत ?

अननुभवी आणि कर्तृत्वशून्य व्यक्तीना सत्तापदी संरक्षण देण्याचा हल्ली पंतप्रधानांचा आणि सत्ताधारी पक्षाचा शिरस्ता आहे. विशेष हे को, हे काही विचारपूर्वक स्वीकारलेले धोरण नाही. सत्ताधारी पक्षाची आणि पंतप्रधानांची आजची अवस्था अगतिक आणि केविलवाणी झाली आहे. त्यांनीच पोसलेले भस्मासुर त्यानाच आवरता येईनासे झाले आहेत. पूर्वेस आसाम आणि पश्चिमेस पंजाब या दोन्ही सीमाराज्यांत गेली तीन वर्षे असंतोष खदखदत आहे. पुढे ढकलू धोरणाखेरीज दुसरे कोठलेही धोरण याबाबत केन्द्र सरकारने स्वीकारलेले नाही. आसामबरोबर मणिपूर, मेघालय, अरुणाचल या पूर्वांचलीय पाचही राज्यात असंतोष, अंदाधुंदी आहे; पण ज्या सरकारला बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या मध्यवर्ती राज्यातली दरोडेखोरी रोखता येत नाही, ते सरकार सीमेवर काय करणार ?

अतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने आपण असे दुबळे झालो आहोत. येथे गुडांचे राज्य आहे! बारकेसे निमित्त करून दंगली होतात. दीड–दोन डझन माणसे जाळून मारली जातात. पोलीस स्वस्थ उभे राहून बघतात ! कारण पोलिसातच असतोष आहे. हा असंतोष चेतवण्याचे आणि भडकवण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू आहेत. पोलिसही असहकार करतात, सपावर जातात, चौक्या ताब्यात घेऊन जवळच्या शस्त्रानी धमकावतात !

पोलिसांना ताब्यात ठेवण्यासाठी राज्य राखीव दलाचे (एस. आर. पी.) अथवा सीमा संरक्षक सेनेचे (बी. एस. एफ.) जवान बोलावण्यात येतात. हे जवान येतात. बेछूट शिस्तीने, गोळीबाराने, मनमानी वागण्याने शांतता प्रस्थापित करतात; परंतु ही शांतता कृत्रिम आणि तात्पुरती असते. बाहेरून आणलेले जवान परत गेले की, पुन्हा पोलिसाचे म्हणजेच गुडाचे राज्य सुरू होते !

वाईट हे की, सप, असहकार, बहिष्कार, ठाणे बळकावणे–या कार्यक्रमांची लागण राज्य राखीव दलालाही झाली आहे. राखीव दलाच्या तत्त्वानुसार व व्यवहारानुसार अशी कृती हा अंतर्गत लष्करी उठाव किंवा बंड म्हणायला हवे. लष्करातील अंतर्गत उठाव मोडण्याचे लष्करी उपाय असतात. ते उपाय म्हणजे उठाव करणाऱ्या कंपन्या किंवा बटॅलियन्स मोडणे (disband करणे), प्रत्यक्ष अपराधी जवानांवर कोर्ट मार्शल करणे, सामील नसलेल्यांना इतर बटॅलियन्समध्ये किंवा कंपन्यात विखरून–विखरून पाठविणे. गेल्या तीन वर्षांत राज्य राखीव दलात जे जे उठाव झाले ते ते या मान्य पद्धतीनी हाताळले गेले. हे उपाय योजण्यासाठी कधी राखीव दलातील इतर बटॅलियन्सची मदत घेतली गेली, तर कधी लष्करी तुकड्यांची !

म्हणजे, सामान्य नागरिक बिथरले किंवा

गुंड-दरोडेखोर प्रबळ झाले की, त्याच्यासाठी पोलीस, पोलीस बिथरले तर त्याच्यासाठी राज्य राखीव दल आणि राखीव दल बिथरले तर त्यांच्यासाठी लष्कर-अशी ही साखळी झाली.

¤

मनात येते, लष्कर बिथरले तर कोणाला बोलवायचे ? तर फक्त न बिथरलेल्या इतर राष्ट्रनिष्ठ तुकड्यांना. पण आजचे लष्कर किती प्रमाणात राष्ट्रनिष्ठ आहे ? पाकिस्तानात दिसून आले त्याप्रमाणे काही सेनाधिकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत काय ?

पाकिस्तानचे उदाहरण घेतले याचे कारण असे की, भारतीय व पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांची परंपरा एकच आहे. ही परंपरा सँढर्स्टची, म्हणजे ब्रिटिश आहे लष्करात राजकारण आणायचे नाही ही ती परंपरा आहे; पण पाकिस्तानी अधिकारी ही परंपरा विसरलेच की नाही ? मग भारतीय अधिकाऱ्यांपैकी काही ही परंपरा विसरले तर ते आश्चर्यकारक म्हणता येणार नाही. याबद्दल आपण सतत सावध व दक्ष असले पाहिजे हे अगदी उघड आहे.

मात्र, जनरल करिअप्पांपासून आजच्या कृष्णमूर्तींपर्यंत साऱ्या सेनादलप्रमुखांचे विचार घोषणा आणि अंमल पाहिला तर भारतीय सेनादल अजूनही राजकारणातीत आणि पूर्णपणे व्यावसायिक वृत्तीने वागणारे आहे, असे दिसते. जगात आजूबाजूला लष्करी उठावांची आतषबाजी चालू असता भारतीय सेनादलाने केवळ तज्ज्ञ व्यावसायिक भूमिका टिकवावी, हे सेनादलाला, शासनाला आणि आपणा साऱ्यांना भूषणावह आहे यात शंका नाही.

यात आज लक्षात घेण्याजोगी एक महत्त्वाची गोष्ट आहे. पुढेमागे ही गोष्ट काळजीचीही ठरू शकेल, म्हणून तिचा सर्वांगीण विचार आजच केला पाहिजे. आजच्या मीमांसेत या नव्या व्यावसायिक प्रवृत्तीचे केवळ सूतोवाच करीत आहे. पुढे केव्हा या प्रवृत्तीचा सविस्तर विचार करावा लागेलही.

ही प्रवृत्ती म्हणजे व्यावसायिक तुलनेची व स्पर्धेची वृत्ती ! अन्य व्यवसायात अधिकाऱ्याच्या जागा, बढतीच्या शक्यता, अन्य सवलती, फायदे हे आपल्या व्यवसायाच्या तुलनेने किती, अशी ही स्पर्धेची वृत्ती असते. आजकाल बँकिंग आणि जीवनबीमानिगम या दोन व्यवसायातील सेवक व अधिकारी एकमेकाकडे अशा तुलनेने बघत असतात.

अशी स्पर्धावृत्ती मुळात वाईट म्हणता येणार नाही. कारण, इतरांच्या तुलनेने आपणास न्याय मिळावा ही रास्त अपेक्षा या वृत्तीमागे असते. मात्र, इतरापेक्षा आपणासच जास्त मिळावे अशी अवस्था जेव्हा या स्पर्धेत उतरते, तेव्हा ही अवस्था त्या त्या व्यवसायाच्या गुणवत्तेला मारक ठरते व्यवसायाची शिस्त, त्याचे कर्तृत्व यांना दुय्यमपणा येतो. व्यावसायिक गुणवत्तेची म्हणून जी ताकद तयार झालेली असते ती अधिक चांगल्या सेवा-शर्ती मिळवण्याचे साधन म्हणून वापरली जाते. परिणामी खऱ्या अर्थाने व्यवसायाची हानी होते.

भारतीय सेनादलात अशी व्यावसायिक स्पर्धावृत्ती शिरली आहे, असे काही ताज्या तपशिलावरून म्हणता येते.

भारतीय सेनादलाकडे, त्याच्या मूलभूत प्राथमिक गरजाकडे शासनाचे म्हणजे देशाचे किती दुर्लक्ष झाले होते, हे १९६२ च्या नामुष्कीने चांगले स्पष्ट झाले. त्यानंतर त्या वेळेचे नवे संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी या उणीवा दूर करण्याच्या दीर्घ मुदतीच्या कार्यास सुरुवात केली.

सेनाधिकाऱ्यांच्या आणि सैनिकांच्या मनातही नवे विचार सुरु झाले. मुलकी सेवेइतकीच आपलीही सेवा महत्त्वाची, आक्रमणाच्या वेळी तर अधिकच महत्त्वाची. पण श्रेणी, पगार, भत्ते, सवलती यांचा वाटा मात्र मुलकी सेवेलाच मोठा त्यांच्यासंबंधाने सरकारी धोरणही लाडाचे. बासष्ट साली, तेजपूरचे मुलकी कमिशनर घाबरले आणि ट्रंका बॅगासह खास रेल्वेडब्यातून पळाले. त्याना शिक्षा काय झाली ? तर मुदतपूर्व निवृत्तीची परवानगी त्यांना देण्यात आली. एखादा लेफ्टनंट जनरल असा पळाला असता तर ? तर त्याला कोर्ट मार्शलला तोड द्यावे लागले असते. एकूणात, लोणी मुलकी सेवेला आणि बडगा सेनासेवेला असा हा मामला होता.

ही विषम स्थिती सेनाधिकाऱ्यांना साहजिकच बोचली. प्रथम कुरकुर, नंतर तोंडीलेखी रिपोर्ट असे होत होत शेवटी १९७९ साली सरकारने लष्करासाठी 'श्रेणी-पुनर्विचार समिती नेमली. जन. ओ. पी. मल्होत्रा, एअरमार्शल इद्रिस लतीफ (आजचे महाराष्ट्राचे राज्यपाल) व अॅडमिरल परेरा हे या समितीचे सदस्य होते.

या समितीने एका शिफारशीच्या फटक्यात सेनादलातील अधिकारपदे दुप्पट केली. याचा परिणाम पोषक की घातक ? याचा विचार येत्या मीमांसेत करावा लागेल. □


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**

**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव

(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आंबेडकर भारत

**लेखक बाबुराव बागुल**

**राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये**

अवतीभवती । शरद कृष्णन्

## निवडणुका – चरणसिंग यांची सरशी

चार राज्यांमधील निवडणुकीचा सावळा गोधळ आता अखेरच्या टप्प्यात आला असला तरी संबंधित राज्यबाहेरील मंडळीना या निवडणुकीबाबत नेमकी परिस्थिती काय आहे याचा थांगपत्ता नाही निवडणुकीच्या राजकारणामध्ये रस घेणारी मंडळीही राजकीय पक्षांनी घातलेला सावळा गोधळ लक्षात घेऊन आता निकालानंतरच काय ते समजेल असे म्हणताना दिसतात. राजकीय पक्षानी आणि राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांनी इतक्या उलटचा–सुलटघा भूमिका घेतल्या आहेत, की अखेरीस यातून निष्पन्न काय होणार याची चिंता मतदारांना वाटू लागली, तर राजकीय नेते मतदार काय करतात इकडे डोळे लावून बसलेले दिसतात. तथापी एकंदर परिस्थिती लक्षात घेता निवडणूक पूर्व राजकारणात हरियाना आणि हिमाचलप्रदेश या दोन राज्यांचा विचार करता चौधरी चरणसिंग यांनी बाजी मारली आहे. भाजप–लोकदल सहकार्याला मतदारांनी अनुकूल कौल दिला तर दोन वर्षांनी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात काही हालचालीना प्रारंभ होईल. तथापी ही युती जर फसली तर विरोधीपक्षाच्या परस्पर सहकार्याच्या हालचालीनी वेगळी दिशा घेतलेली असेल.

चार राज्यात मिळून एकूण ५९२ जागांसाठी निवडणुका होत आहेत. केवळ ३७ जागी एक विरुद्ध एक अशी लढत होत आहे. बाकी सगळ्या ठिकाणी उमेदवाराची पलटण जनतेचा कौल घेण्यास सिद्ध आहे. प. बगालमध्ये २९४ जागांसाठी १२०६ उमेदवार आहेत. त्यामध्ये ४०० अपक्ष आहेत. प. बंगालमधील राजकीय पक्षाच्या उमेदवारीची दखल घेताना असे लक्षात येते की, सत्ताधारी आधाडी- विरुद्ध इंदिरा काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष यांचे साटेलोटे आहे. केरळमध्ये इंदिरा काँग्रेस विरुद्ध तात्त्विक भूमिका घेणारी शरद काँग्रेस, प. बंगालमध्ये मात्र इंदिरा काँग्रेसबरोबर साटेलोटे करताना दिसते. केरळमध्ये १४० जागासाठी ७०१ अपक्ष उमेदवार आहेत. केवळ सात जागांसाठी सरळ सामने होत आहेत. डावी संयुक्त आघाडी व युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंट अशा दोघामध्येच खरी लढत आहे. हरियाना विधान सभेच्या जागा आहेत केवळ ९० आणि एकूण उमेदवार आहेत १०९५! हिमाचलप्रदेशातही एकूण जागा आहेत६८ तर इच्छुक उमेदवाराची संख्या आहे ४४१. जनता पक्ष, लोकदल, भाजप या पक्षापैकी लोकदलाचे सूत अखेरीस कुणा- बरोबर जमले आहे हे मतदारांना समजणे अवघड आहे. खेरीज सम- झोते होईपर्यंत निवडणूक–उमेदवारी मागे घेण्याची मुदत टळून गेल्याने समझोते झाल्यानंतरही मित्रपक्षांचे उमेदवार एकमेकांच्या विरोधात उभे ठाकलेले दिसतात. भारतीय राजकारणाला सध्या कोणतीही तात्त्विक बैठक राहिलेली नाही. सत्तासंपादनासाठी जे सोयिस्कर ते उत्तम असे धोरण असल्याने बोल तरी कोणाला लाव- णार? परंतु पातळ झालेल्या या तत्त्वज्ञानाला व्यावहारिक वस्तु- स्थितीची जोड देऊन चरणसिंग पाय रोवण्यास जागा पहात आहेत. सध्या परिस्थिती अशी आहे की, प्रमुख विरोधी पक्षांना पाय रोवून उभे राहण्यास जागाच नाही! बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्टाच्या नेतृत्वाखालील शासन आहे खरे; परंतु दिल्लीच्या राजकारणावर कलकत्त्याहून प्रभाव पडू शकत नाही. लखनौ, चंडीगड हाती लागले तर पुढील वाट सोपी ठरते. चरणसिंग काय किंवा अटलजी काय तसा प्रयत्न करत आहेत आणि या प्रयत्नात त्यांना कितपत यश मिळते यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत. केरळमध्ये जर डाव्या आघाडीची सरशी झाली तर इदिरा काँग्रेसला थोडाफार चाप बसेल; परंतु हरियना, हिमाचलप्रदेशामध्ये जर काही नाटचपूर्ण घडून आले तर त्याचा राजकीय पक्षांच्या आगामी हालचालीवर महत्त्वपूर्ण परिणाम होईल. निवडणुकीनतर शरद काँग्रेस आणि जनता पक्ष अधिक खच्ची झालेले दिसतील! या एकमेव गोष्टीबाबत राज- कीय निरीक्षकामध्ये एकमत आहे. निवडणूकपूर्व टिपणाला किंवा वार्तापत्राना पूर्वी एक थरार असे. परंतु निवडणुकीच्या संदर्भात जनता इतकी निब्बर झाली आहे की, चार राज्यांमध्ये निवडणुका होत असून त्याचे पडसाद जेवढचा तीव्रतेने उठायला पाहिजेत तेवढचा तीव्रतेने उमटताना दिसत नाहीत.

## दोन विद्यापिठांच्या दोन तऱ्हा

गुरुदेव टागोर यांचे विश्वभारती विद्यापीठ म्हणजे तमाम बंगाली लोकांचे मोठे गौरवस्थान! वास्तविक विद्यार्थ्यांची संख्या आणि संलग्न महाविद्यालये यांचा विचार केला तर कलकत्ता विद्यापीठ आज जगात पहिल्या क्रमांकाचे ठरते. परंतु त्या विद्यापीठामध्ये काही भले–बुरे झाले तर त्याचे पडसाद उमटत नाहीत; परंतु विश्वभारती विद्यापीठामधील बारिक–सारिक घटनांचे पडसाद प. बंगालमध्ये तिव्रतेने उमटताना दिसतात. जुने ते सोने हे एकमेव प्रमाण मानून प्रत्येक सुधारणेला खो घालण्याचा उद्योग या विद्यापीठामधील जुन्या मंडळीकडून चालू आहे; तर विद्यापीठ यशस्वीपणे चालवायचे असेल तर काळाबरोबर चालले पाहिजे असे सुधारणावाद्यांना वाटते. या संघर्षामध्ये विद्यापिठाचा कारभार सध्या थंडावला असून गेल्या सप्ताहात संडे ऑब्झर्व्हरने या विद्यापीठामधील सध्याच्या दयनीय परिस्थितीचे नेमके चित्रण करणारा एक लेख प्रसिद्ध केला आहे या विद्यापिठामध्ये प्रामुख्याने भाषाशास्त्राचा अभ्यास केला जातो. निसर्गाच्या सान्निध्यात अभ्यासवर्ग भरवले जातात. ग्रामीण जिवनाची पुनर्रचना हाही एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन स्विकारला गेला. इतर विद्यापिठाच्या तुलनेत हे विद्यापीठ वेगळे असावे असा जो विचार गुरुदेवानी विद्यापीठ स्थापन करताना व्यक्त केला होता, त्याला अनुसरूनच विद्यापिठाचे कामकाज चालविण्यात येते. विद्यापिठाचे विद्यमान उपकुलगुरु प्रा. अमलान् दत्त हे प्रागतिक विचाराचे समजले जातात विद्यापिठामधील जुन्या मंडळीकडून त्याना सतत विरोध होतो. त्यांची भरपूर टिंगल-टवाळीही करण्यात येते. त्या संदर्भातील

एक विनोद नोंदण्यासारखा आहे.

विद्यापीठाच्या आवारातील टागोराच्या पुतळयाने एका अधिकाऱ्यास असे फर्मान सोडले की, येथे नवचैतन्य निर्माण करू शकेल असा शिक्षणतज्ज्ञ घेऊन ये ! संबंधित अधिकाऱ्याने उपकुलगुरूंना पुतळयासमोर हजर केले. टागोरानी डोळे किलकिले केले आणि उपकुलगुरूंकडे बघून ते म्हणाले, अरेच्या ! मी तर तुला शिक्षणतज्ज्ञ घेऊन येण्यास सांगितले होते आणि तू चक्क गाढव आणलेस. हे आणि अशा प्रकारचे अनेक विनोद दत्तांच्या बाबतीत सांगण्यात येत असले तरी दत्त अजून तरी आपल्या खुर्चीत टिकून आहेत.

आजपर्यंतची या विद्यापीठाची परंपरा पाहिली तर दत्त आपली सहा वर्षांची कारकीर्द पूर्ण करू शकतील असे वाटत नाही. १९५१ पासूनची पूर्वपीठिका पाहिली तर असे दिसून येते की, एक सुधीर रंजनदास याचा अपवाद वगळता एकही उपकुलगुरू आपली मुदत पूर्ण करू शकलेला नाही. श्री. दास हे १९५१–६५ अशी सहा वर्षे उपकुलगुरु होते खरे; परंतु हे प्रायः त्यांना त्यावेळचे विद्यापीठाचे कुलगुरु पं. जवाहरलाल नेहरू यांचा पूर्ण पाठिंबा असल्यामुळेच शक्य झाले. नेहरूंच्या निधनानंतर श्री. दास यांना अपमानित होऊनच विद्यापिठातून बाहेर जावे लागले. विद्यापिठाच्या आवारामध्ये प्रस्थ समजली जाणारी अनेक जुनी खोंडे आहेत. रवींद्र संगीताचे व्यासंगी श्री. शांतीदेव घोष हे त्यापैकीच एक.

१९१० सालापासून ते विद्यापिठात आहेत. संस्थेबद्दल अपार प्रेम असल्याचे ते सांगतात; पण त्याचबरोबर त्यांच्याकडे असलेल्या टागोराच्या काही काही दुर्मिळ वस्तूना व पत्राना विद्यापीठाने चापून किंमत द्यावी अशीही त्याची अपेक्षा आहे. याला जे विरोध करतात ते सर्व टागोरांचे आणि विद्यापीठाचे शत्रू अशी त्यांची भूमिका. विद्यापिठामधील जुनी मंडळी साध्यसुध्या परंतु आवश्यक अशा सुधारणांना कसा विरोध करतात याचे एक मजेशीर उदाहरण देण्यासारखे आहे. विद्यापिठाच्या विशेष अधिकारी सौ. मानसी दासगुप्ता यानी केवळ सोयीच्या दृष्टीने रवींद्र–भवनमधील टागोर म्युझियम तळमजल्यावर नेण्याचे ठरवले व तळमजल्यावरील वाचनालय पहिल्या मजल्यावर नेण्याचे ठरवले; परंतु हा बदल म्हणजे टागोराचाच अवमान अशी काहीशी विचित्र भूमिका जुन्या मंडळीनी घेतली व सौ. दासगुप्ता यांच्या चारित्र्यावर अकारण शितोडे उडवले. नव्या जुन्याच्या या संघर्षात विद्यापिठाचे विलक्षण नुकसान होत असल्याने विद्यार्थी व अनेक कर्मचारी एकंदर कारभारावर नाराज आहेत. नियामक मंडळाच्या पूर्वी निवडणुका होत असत; परंतु १९७१ पासून निवडणुकांचा पत्ता नाही ! आता नियामक मंडळाचे सदस्य नियुक्त केले जातात. या विद्यापीठाला केंद्र शासनाचे प्रचंड अनुदान असते. चालू आर्थिक वर्षामध्ये १.५ कोटी रुपये या विद्यापीठासाठी खर्च पडणार आहेत ! हा सारा खर्च एखाद्या प्राणिसंग्रहलयावरील खर्चासारखा आहे, असे उद्‌गार एका माजी उपकुलगुरूनी काढले आहेत. विद्यापीठाचे कर्मचारी आपल्याला दुजा भावाने वागवले जाते, अशी तक्रार घेऊन महामंत्र्यापर्यंत गेले आहेत. नवे–जुने वाद शैक्षणिक आखाडीवर खेळले जात असताना शिक्षकेतर कर्मचारीही असहकाराचे हत्यार उगारून आहेत आणि विद्यार्थी भांबावलेल्या अवस्थेत आहेत.

## जवाहरलाल नेहरू विद्यापीठ

'जवाहरलाल नेहरू विद्यापिठामधील उच्च शिक्षणक्रमासाठी ज्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात त्याबाबत भरपूर घोळ आहेत. या विद्यापिठाने या प्रकरणी केलेला खुलासा समाधानकारक नाही. या संदर्भातील मुख्य तक्रार अशी आहे की, या शिष्यवृत्त्या वशिल्याच्या मंडळीना देण्यात येतात आणि शिक्षणक्रम अर्ध्यावर टाकून प्रबंध वगैरे दाखल न करता विद्यार्थी पोबारा करतात ! काही विद्यार्थी अशा प्रकारे अभ्यासक्रम टाकून गेले असल्याचे या विद्यापिठातर्फे मान्य करण्यात आले असले तरी या काहींची संख्या ४०० च्या घरात आहे. या संदर्भात १६१ खासदाराच्या सह्याचे एक निवेदन देण्यात आल्यावर विद्यापिठाने थातुर–मातुर खुलासा केला व काही विद्यार्थ्यांनी व्यक्तिगत कारणासाठी अभ्यासक्रम पूर्ण केला नसला तरी गेल्या दहा वर्षांत विद्यापिठाने २४३ विद्यार्थ्यांना डॉक्टरेट दिली असे सांगण्यात आले. सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या संदर्भातील सुविधाचा पुरेपूर लाभ घेतला आणि विद्यापिठाला चांगल जाणवण्यासारखा फटका बसला ! विद्यापिठाने २४३ विद्यार्थ्यांना डॉक्टरेट घेतल्याचे घोषित केले आहे, तर अभ्यासक्रम अर्ध्यावर टाकून गेलेल्याची संख्या ४०८ आहे. या विद्यार्थ्यांनी दरमहा मिळणारी ४००–५०० रुपयाची शिष्यवृत्ती नियमितपणे घेतली; पण त्यापैकी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम सुरू केल्याचेही दिसून येत नाही ! म्हणजेच केवळ आर्थिक लाभ घेण्यासाठीच त्यानी या शिष्यवृत्तीचा वापर केला आणि शिष्यवृत्तीची मुदत संपल्यावर काही तरी थातुर–मातुर कारण सांगून पोबारा केला ! शिक्षकवर्गाचे वर्तनही या विद्यार्थ्यांच्या पद्धतीचेच! या ना त्या कारणाने अनेक शिक्षकानी परदेशात दौरे केले. कधी शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून तर कधी सांस्कृतिक देवाण–घेवाण योजनेचा एक भाग म्हणून. 'सेंटर फॉर स्टडीज् इन सायन्स' हा विभाग नियामक मंडळीच्या शिफारशीखेरीज मार्च १९८० पासून बंद करण्यात आला. या विभागावर आजपर्यंत १६ लाख रुपयाची रक्कम खर्ची पडली आहे; परंतु या खर्चाचे समर्थन व्हावे अशी एकही नोंद या सेंटरच्या नावे नाही ! आता बंद पडलेले हे सेंटर नव्याने सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ते अचानक बंद करण्यात आल्याने ४५ विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. या विद्यार्थ्यांची सोय लावण्यासाठी हे सेंटर पुन्हा सुरू करण्यात यावे अशी मागणी आहे तो जर मान्य झाली तर सालिना ४५ लाखाची सोय करावी लागेल ! कॉम्प्युटर सायन्सचा विभागही असाच निष्क्रिय आहे आणि हा विभाग कार्यरत होण्यासाठी सालिना ५ लाखांची गरज आहे. या खर्चाचे न्याय्य समर्थन होत असेल तर त्याबाबत कोणाची तक्रार नाही; परंतु शिष्यवृत्त्यावर जसे लक्षावधी रुपये खर्च होऊन हाती काहीच लागले नाही तसे होऊ नये. नेहरू विद्यापीठ म्हणजे एक पांढरा हत्ती असून या विद्यापिठाच्या आर्थिक कारभाराची परिपूर्ण चौकशी करावी अशी मागणी २५ खासदारानी केली आहे. चौकशी होईल अथवा होणार नाही, परंतु देशाच्या राजधानीमधील महत्त्वपूर्ण विद्यापीठामधील कारभार किती अनागोंदीचा आहे याची झलक या कारभाराबाबतच्या ज्या वार्ता आकडेवारीसह प्रसिद्ध झाल्या आहेत त्यामध्ये पहावयास मिळते.

## ▫ माजी पंतप्रधानांशी बातचीत

माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांच्या विक्षिप्त स्वभावामुळे सहसा कोणी पत्रकार त्यांची मुलाखत वगैरे घेण्याच्या भरीस पडत नाहीत. अगदी अलीकडेच त्यानी एक पत्रकार-परिषद घेतली होती. पत्रकार-परिषदेमध्ये चौधरी आल्यावर उपस्थित पत्रकार उभे राहिले नाहीत म्हणून रागावून त्यांनी पत्रकार-परिषद रद्द करून टाकली! असा हा विक्षिप्त नेता अजूनही आपल्या मस्तीतच असतो. अगदी अलीकडेच संडे-मिड्डेच्या प्रतिनिधीने त्यांची मुलाखत घेतली' आपल्या बरोबरीच्या नेत्यांबद्दल चौधरी अजून विलक्षण तुच्छतेने बोलतात. जनता राजवटीत पंतप्रधान सरळ आपल्याकडेच यायचे; आपणच मोरारजींची निवड केली असे ते म्हणतात! असे का केले असे त्यांना विचारले असता ते म्हणतात को, ते आणीबाणीच्या काळात निदान तुरुंगात तरी होते. बाबू जगजीवनराम पंतप्रधान-पदावर हक्क सांगू लागले तेव्हा मला हसूच आले. गृहमंत्रीपदी नसूनही केवळ त्या बाईंना खूष करण्यासाठी आणीबाणीचे विधेयक लोकसभेत मांडणारा हा नेता पंतप्रधानपदी विराजमान होणे मला मंजूर नव्हते. तडजोड म्हणून मी मग मोरारजीभाईंच्या नावास मान्यता दिली. विरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी मी १९७४ पासून खपत होतो, तर १८ जानेवारी १९७७ पर्यंत मोरारजीभाई जनता-पक्षात येण्यास तयार नव्हते. या वस्तुस्थितीकडे मी पाठ फिरविली. माझा न्याय्य-अधिकार असूनही मी पंतप्रधानपदासाठी आग्रही भूमिका घेतली नाही ही गोष्ट विसरून माझ्यावर पक्षफोडीचे खापर फोडतात त्याचे मला अतीव दुःख होते.

देशाचे पंतप्रधानपद पुन्हा एकदा मिळाले तर काय कराल? असा प्रश्न विचारल्यावर चौधरी म्हणाले, जातिव्यवस्था मोडून काढण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावीन. तसेच, ग्रामीण भागातील जनजीवन सुधारण्याच्या योजना आग्रहाने राबवीन. आपल्याला कोणत्या गोष्टीची व्यथा वाटते असा प्रश्न विचारला असता चौधरी म्हणतात, व्यथा वाटावी असे माझ्या हातून काहीही घडले नाही. तथापी माझ्या प्रामाणिक विचाराला योग्य प्रसिद्धी मिळत नाही याची मला खंत वाटते. आपला मुद्दा स्पष्ट करताना चौधरी हसून म्हणाले, 'मला प्रसिद्धी देणार कोण म्हणा!' कारण मी पंतप्रधान झालो तरी त्यापासून लाभ कोणाचाच नाही. त्यामुळे भाजपची तळी उचलून देणारा एक्सप्रेस माझी दखल घेईल कशाला? टाटांचा स्टेटस्मन, बिर्लांचा हिंदुस्थान-टाइम्स किंवा जैनाचा टाइम्स ऑफ इंडिया याना माझ्यापासून काय लाभ मिळणार? त्यामुळे माझे विचार मी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करतो. मुलाखत-कर्त्यालाच चौधरी प्रतिप्रश्न विचारतात, 'माझे 'दि इकॉनॉमिक नाइट मेअर ऑफ इंडिया-इटस् कॉझेस् अँन्ड क्युअर' हे पुस्तक तुम्ही वाचले आहे का?' पत्रकाराने होकारार्थी उत्तर दिल्यावर ते म्हणाले, 'हे पुस्तक शांतपणे वाचण्याइतके तुम्ही स्वस्थचित्त कसे होता' त्यावर पत्रकार म्हणाला, 'मी ते फक्त चाळले आहे!' चौधरींनी सेवकाला बोलावून पुस्तकाची एक प्रत मागवून घेतली व मुलाखत-कर्त्याच्या हातामध्ये प्रत ठेवून ते म्हणाले, 'घरी जाऊन हे पुस्तक शांतपणे वाचा. कदाचित तुम्ही जास्त बरे पत्रकार व्हाल!' ▫


## अभ्यासकास उपयुक्त शेतकऱ्यास प्रेरक

"श्री. विजय परुळकर यांनी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्यांबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्मयात भर टाकणारे आहे."

—प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

# योद्धा शेतकरी

ले. : विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : रुपये छत्तीस

नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पंचरंगी मुखपृष्ठ

श्यामचा संसार (कथा ३५ वी)

फिरोज रानडे

# 'आठवणी व आख्याइका' – खरे मनोरंजक वाङ्मय

बरेच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. श्याम बहुधा त्यावेळी मॅट्रिकला ऊर्फ अेस्. अेस्. सी. ला होता. त्याच्या अभ्यासाव्यतिरिक्त त्याला वाचनाचा फार नाद होता. वाचनालयात जावे, तेथून वेगळी वेगळी पुस्तके वाचायला घरी आणावीत, तेथे जाऊन लोकमान्य, नवशक्ती, नवा काळ ही वर्तमानपत्रे वाचावीत हा त्याचा हव्यास झाला होता. त्यावेळी लोकमान्य'चे संपादक पां. वा. गाडगीळ, नवशक्तीचे प्रभाकर पाध्ये अशी जबरदस्त मंडळी मोठ्या तावातावाने व तावच्या ताव लिहित असत. त्याचे अग्रलेख बातम्यांपेक्षाही जास्त वाचनीय असत. कोणी अेका वर्तमानपत्राचे संपादक तर दररोजचा अग्रलेख प्रश्नार्थक वाक्यानेच संपवत. श्यामला आता त्याचे नाव आठवत नाही; पण त्याने त्याचे त्या काळी खूप कौतुक केले असल्याचे मात्र आठवते!

नाशिकच्या वाचनालयाला त्या वेळी काहीतरी शंभर वर्षे पूर्ण होऊन वर चार पाच वर्षे झाली होती. महाराष्ट्रात जी काही जुनी चांगली वाचनालये म्हणून प्रसिद्ध होती त्यात नाशिकचे वाचनालय मोडत असे. त्याचे पेशव्याच्या सरकारवाड्यात प्रस्थान होते. तेथे शेकड्याने पुस्तके होती. कोणतेही नवे पुस्तक, विशेषतः कादंबरी व लघु-कथा सग्रहाचे पुस्तक आले की, ते १५–२० दिवसात वाचनालयात येते अशी त्याची ख्याती होती.

अेक दिवस श्याम असाच वाचनालयात पुस्तक बदलायला म्हणून गेला. प्रथम त्याने फडक्यांच्या कादंबऱ्या मागितल्या. पुस्तक देणाऱ्या कारकुनाने अेका क्षणाचाही वेळ न लावता 'बाहेर गेल्यात' म्हणून सांगितले. हाच किस्सा माडखोलकर, खाण्डेकर व इतर लेखकांच्या कादंबऱ्यांबाबत गिरवला गेला. आता काय वाचावे? अत्र्यांची नाटके होती; पण नाटक ही करण्याची गोष्ट आहे, वाचण्याची नाही. त्यापुढे नाटकाचे कपाट भरगच्च असूनसुद्धा त्याचा उपयोग नव्हता.

काही विनोदी वाङ्मय वाचावे ह्या हेतूने मनाशी विनोदी. विनोदी म्हणत श्यामने विनोदी पुस्तकांचा कॅटलॉग बघायला सुरवात केली. 'सुदाम्याचे पोहे' आहेत का? विचारता 'बाईंडिंगला गेले आहे' म्हणून उत्तर मिळाले. गडकऱ्यांच्या 'ठकीचे लग्न?' तर तेही बाईंडिंगला गेल्याचे कळले.

इतकी पुस्तके बाईंडिंगला गेल्यावर बाईंडर लोक पुढे-मागे मस्तवालपणे वागणार, असा श्यामने त्यावेळीच, त्या वयात अंदाज केला होता व तो धोक्याचा कंदील मित्र-मंडळीस दाखवला होता; पण जसे 'लोकमान्य'कार वा 'नवशक्तिकारा'नी दाखवलेले धोक्याचे लाल कंदील सरकारने व जनतेने गंभीरपणे घेतले नाहीत तसेच श्यामच्या कंदिलाचे पण झाले.

श्यामच्या बाईंडर लोकांच्या मस्तवालपणा बाबतच्या भविष्याचा प्रत्यय सर्व मराठी जनतेला १५–२० वर्षांनी का होईना, 'सखारामा'च्या रूपाने पहायला मिळालाच.

असो. तो भाग फार पुढे; पण त्या वेळी कंदील दाखवून झाल्यावर आता काय करावे, म्हणजे कोणते पुस्तक न्यावे असा श्यामला प्रश्न पडला. मराठी वाङ्मयाच्या आकाशात पुलरूपी चंद्र व वि. आ. बुवा, मिरासदाररूपी तारे उगवून जनतेला विनोदरूपी चादण्याचा आल्हाद देण्यास अजुनी अवकाश होता. चिं. वि. जोशीचे वाङ्मय कालानुसार जुने वाटू लागले होते. फक्त ताम्हणकर का कोणी 'गोटया' वगैरे लिहीत; पण त्यांच्या 'sitting sitting ants nave come to my leg' ह्या विनोदाला हसण्याच्या यत्तेत आता श्याम नव्हता.

उद्या रविवार, परवा सोमवार; पण श्रावणी म्हणून सुट्टी! दोन दिवस वाचायला काहीतरी आवश्यक होते. तशी वाचनालयात पुस्तके होती; पण ती म्हणजे समग्र केळकर वाङ्मय, केसरीतले निवडक निबंध, काळातले निवडक निबंध, टिळकचरित्र, गीता रहस्य अशी जाडजूड व भारदस्त ग्रंथ-मंडळी होती. त्यातला अेक ग्रंथराज उचलून घरी नेणे श्यामला शक्य नव्हते, मग वाचणे तर फार दूरचे!

पुस्तकाची कपाटे बघता बघता त्याला "लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्याइका" हा ग्रंथ-युवराज दृष्टिस पडला. हा ग्रंथ युवराज असल्यामुळे फारसा जाडजूड नव्हता. आता अेवीतेवी वाचायला काही नाहीच आहे व ग्रंथ असूनही पुस्तकासारखा आहे, तेव्हा बघावे तर चाळून ह्या विचाराने त्याने तो कपाटातून काढला व पुस्तके देणाऱ्या कारकुनासमोर ठेवला.

हा १५–१६ वर्षांचा मुलगा 'लोकमान्य टिळकाच्या आठवणी व आख्यायिका 'सारखे पुस्तक नेतो आहे, तर त्याचे डोके ठिकाणावर आहे की नाही हे त्या कारकुनाने स्वतःचे डोके वर करून पाहिले व ते जागेवर असल्याची खात्री करून घेतली. अर्थात त्या वेळी हल्लीसारखी सिने-नट्याची, पुढाऱ्यांच्या स्त्रियांची वा सिने-नटाच्या आठवणी व आख्यायिका प्रसिद्ध करण्याची टूम निघाली नव्हती. त्यामुळे हा मुलगा काही वेगळे नेण्याची धास्ती नव्हती.

पुस्तकाच्या पहिल्या पानावर पुस्तक जपून वापरावे व १५ दिवसांच्या आत परत करावे असा रबरी सदेश होता. श्यामने असले पुस्तक १५ दिवसांत वाचून संपवणे शक्य नाही असे म्हणताच तो कारकून म्हणाला, 'ठेव रे पाहिजे तेवढे दिवस! कोण नेतो असली पुस्तके?'

श्यामने पुस्तक घरी नेले व चाळावयास सुरुवात केली. अगदी सर्व सामान्य लोकांनी लोकमान्यांच्या अगदी सामान्य आठवणी दिल्या होत्या. त्यात लोकमान्यांच्या व्यक्तित्वाचे काही पैलू दाखवण्याऐवजी आपले व आपल्या कुटुंबाच्या सर्व व्यक्तीचे जास्तीत जास्त पैलू दाखवण्याची खटपट केली होती. ह्या टिळकाच्या आठवणी आहेत की त्या लोकांच्या नातेवाइकाच्या आख्यायिका आहेत असा कोणासही प्रश्न पडावा. उगाच आणले हे पुस्तक, त्यापेक्षा ताम्हणकराचे पुस्तक परवडले असे विचार मनात येऊन श्यामला चुटपुट लागली.

पण जसजशी त्याने एकेक आठवण वा

आख्यायिका वाचायला सुरुवात केली तसतशी त्याची चुटपुट दूर होत गेली. ह्या आठवणीत काय नव्हते ? काम सोडून बाकी सगळे म्हणजे क्रोध, लोभ, मत्सर वगैरे रस भरपूर प्रमाणात होते ! आजकालचे लेखक मनाचे पापुद्रे दाखवणाऱ्या गोष्टी लिहितात; पण बऱ्याच वेळा ते पापुद्रे इतके पातळ व एकमेकांना चिकटून असतात की, सर्वसामान्य वाचकाना ते सुटे-मोकळे करणे जड जाते. ते काम टीकाकार उत्तमरीत्या करतात. श्याम तर कित्येक वेळा एखादे पुस्तक वा गोष्ट वाचून त्यात फक्त २-३ पापुद्रे आहेत म्हणून सोडून देत असे; पण त्या पुस्तकावरचे व गोष्टीवरचे टीकाकारांचे भाष्य वाचले व त्यांनी त्याच गोष्टीतून ५-६ पापुद्रे काढून दाखवलेले बघितले की, श्याम अगदी चाट होऊन जात असे व त्याच्या तोंडून, मागास वर्गातले लोक जसे 'अरे तिच्या मारी, अशी भानगड आहे काय ?' असे म्हणतात तसे उद्गार निघत.

पण ह्या आठवणीत तशी काही भानगड नव्हती म्हणजे पापुद्रे नव्हते असे नाही. अगदी राघा करत असे तशा घडीच्या पोळचांप्रमाणे चार-चार पापुद्रे होते; पण प्रत्येक पापुद्रा अगदी मोकळा-मोकळा व सर्वसामान्य माणसास टीकाकाराची मदत न घेता उलगडता येईल असा होता. त्यांतून नव्या प्रकारच्या वाङ्मयात मनाचे पापुद्रे एकमेकात सरमिसळ होऊन जातात व ते वेगवेगळे करणे जड जाते तसे येथे नव्हते. हे वाङ्मय मनोरंजक होते व त्या वेळच्या समाजाच्या सांपत्तिक, सामाजिक व वैयक्तिक बाबतीतच चांगला प्रकाश पाडून जात होते; पण सर्वांत महत्त्वाचे हे वाङ्मय विनोदी लिहिण्याच्या हेतूने न लिहितासुद्धा फार विनोदी झाले होते. आजकालचे विनोदी लेखक विनोदी लिहावयाचे म्हणून लिहीत असल्यामुळे त्यात एक प्रकारचा ओढून-ताणून रस असतो. त्या रसाचा ह्या आठवणीतून अगदी अभाव होता. तसा रस नसल्याने त्या आठवणी मोठ्या कुरकुरीत व खुसखुशीत लागत होत्या.

त्या आठवणी व आख्यायिकांबाबत सागावयाचे म्हणजे, पण तसं कशाला ? पूर्वी जसं हाताच्या काकणाला आरसा कशाला म्हणत व आता काकणे पुढारी मंडळी घालू लागल्यापासून, नखांना रंग लावायला आरसा कशाला ? म्हणतात, त्या म्हणीप्रमाणे आपण स्वत:च काही आठवणी बघू या.

'आमचे वडील बुलढाण्याचे प्रसिद्ध वकील. त्यांचे अशिल म्हणजे मोठे मालदार, मोठे व्यापारी, मोठे जमिनदार असे असत. आमचा वाडा मोठा होता. त्या विभागातला तो मोठ्या वाड्यांपैकी एक म्हणून प्रसिद्ध होता. घरात नोकर चाकर होते. घोडागाडी होती. थोडक्यात म्हणजे आमच्या घरात सर्व तऱ्हेची सुबत्ता होती.

आमच्या घरात डि. एस. पी. साहेब, कलेक्टरसाहेब, कमिशनरसाहेब यांचे उठणे बसणे होते. ह्या सर्व साहेबलोकांकडे आमच्या वडिलाचे फार मोठे वजन होते. ते लोक वडिलाचे म्हणणे ऐकत व आमचे वडिल त्यांच्या अडी-अडचणीना धावून जात.

त्या सुमारास लोकमान्य टिळक बुलढाण्याला आले. आमच्या वडिलाचा व टिळकांचा काही संबंध नव्हता ! पण आमच्या वडिलाना त्यांच्याबद्दल फार आदर वाटे. कारण आमच्या वडिलाची वृत्ती पण टिळकासारखी बेदरकार व झुंजार वृत्तीची होती. आमचे वडिलही परिणामाची पर्वा न करता जे काय करावयाचे ते करीत.

लोकमान्य बुलढाण्याला येऊन दोन दिवस झाले होते. शेकडो लोक त्यांना भेटून जात होते. आमच्या वडिलांच्या मनात पण टिळकांना भेटावे असे फार होते. पण आपल्या मित्रमंडळींना म्हणजे डी. एस. पी. साहेबास वा कलेक्टरसाहेबास ते आवडेल की नाही ह्याचा वडिलाना विश्वास नव्हता व मित्रमडळीचे मन मोडणे त्यांना आवडत नसे.

पण दोन-चार दिवसांत शेकडो लोक भेटून गेले असतानासुद्धा त्याच्या बेदरकार वृत्तीला अनुसरून आमचे वडील दुपारचे, ज्या वेळी फार गर्दी नव्हती, त्या वेळी त्यांना भेटून व त्याच्याशी राजकारणावर चर्चा करून आले.

लोकमान्य टिळक तर काय सरकारशी युद्ध पुकारलेले ! त्यामुळे त्यांची वाटेल तो त्याग व हालअपेष्टा सहन करण्याची तयारी होती. सरकार त्यांचे काय वाकडे करणार होते ? पण आमच्या वडिलाची गोष्ट वेगळी होती. त्यांची वकिलीची फार मोठी प्रॅक्टिस होती. मोठा संसार होता. कदाचित् ते पब्लिक-प्रॉसिक्यूटर होण्याचा संभव होता पण असे असूनसुद्धा त्यांनी होणाऱ्या परिणामाची काहीही पर्वा न करता लोकमान्यांची भेट घेतली हे खरच कौतुक करण्यासारखे आहे.

नरहर रंगो,
बुलढाणा

ह्या आठवणीतले वा आख्याईकेतले वेगळे वेगळे पापुद्रे दाखवण्याकरता कोणा टीकाकाराची गरज नाही. टिळकांनी काय देशाकरता सर्वस्व वाहिले होते त्याच्या त्यागाचे कसले कौतुक ? खरे कौतुक ह्या नरहर रंगोच्या वडिलाचे !

आता हा मासला वाचा.

'आमची आई म्हणजे अगदी सती-सावित्री. सगळ्या पंचक्रोशीत तिचे नाव होते. आम्ही मुलेच नव्हे तर सगळे लोक तिला 'आई' म्हणत. ती म्हणजे खरेच देवता होती. गोरगरिबांबद्दल तिला फार कळवळा होता. सगळी देवाची लेकरे असे ती म्हणत असे व त्याप्रमाणे वागतही असे.

'आमचे वडिल आमच्या लहानपणीच वारले. आमच्या सुपारीच्या मोठचाल्या बागा होत्या तशाच नारळाच्या पण होत्या. त्या बाबतचा सगळा व्यवहार ती स्वत: करत असे. त्या मानाने आमचेच काका आळशी व त्याच्या वाटयाला बागाही फार लहान आल्या होत्या. त्यांना सुपारीचे व नारळाचे उत्पन्न फार कमी होते. त्याच्याबाबत आई म्हणे, 'करावे तसे भरावे' एका दृष्टीने आईचे म्हणणे बरोबर होते.

रत्नागिरी हे आमच्या आईचे माहेर होते. रत्नागिरीला आमच्या आईच्या वडिलांचे फार मोठे नाव होते. त्यांचे घर बाळ गंगाधर टिळकाच्या वडिलांच्या घराशेजारीच होते. त्याबद्दल आमच्या आईला फार आदर होता. 'बाळ गंगाधरासारखी व माझ्या वडिलांसारखी नररत्ने फक्त रत्नागिरीच निर्माण करू शकते.' असे ती मोठ्या अभिमानाने म्हणावयाची व आमच्या आईचे म्हणणेही बरोबर होते.

वामन शंकर जोशी,
वेंगुर्ले

हुश्श ! श्यामन हुश्य केले. त्याला वाटले, आता आठवणीत टिळकाचे नाव येते आहे की नाही ? सगळे कौतुक आईचे व आईच्या

वडिलांचे ! आता वाचकांना शंकर वामनांच्या आईच्या साध्वीपणाशी काय करावयाचे आहे बरे ? पण टिळकाच्या आठवणीच्या निमित्ताने छापून येते आहे ना मग द्या ठोकून. आता असे ठोकणे फक्त खेडयापाडयांतलेच लोक करतात असे समजू नका ! आता ही एका I. C. S. अधिकाऱ्याची आठवण व आख्याइका वाचा :

" मी I. C. S. च्या परीक्षेत पहिला आलो होतो व त्या वेळी इंग्लंडमध्ये अभ्यासक्रमाकरता दाखल झालो होतो. माझे English drafting चे Lord Talklittle नेहमी खूप शब्दात कौतुक करत.

' त्या वेळी मला वाटते लोकमान्य टिळक —हो बाकी सगळे मिस्टर टिळक म्हणत असले तरी मी मात्र लोकमान्यच म्हणत असे. कोठल्या तरी कॉन्फरन्सला लंडनला आले होते. माझ्या मनात त्यांना ताबडतोब भेटण्याची फार इच्छा होती; पण आमचा शिक्षणक्रम इतका भरगच्च होता की, मला एका मिनिटाचा वेळ नव्हता !

पण एक दिवस मी मनाशी अगदी ठरवले की, काही झाले तरी टिळकाची भेट घ्यावयाचीच म्हणून, त्या दिवशी Sir Snow Fall ने आम्हाला चहाला बोलावले होते. मी त्याना आज मला येता येणार नाही असे ठामपणे सांगितले. अर्थात मला लोकमान्याना भेटावयाचे आहे हे Sir Snow Fall पासून गुप्त ठेवले. ह्याचा अर्थ माझ्या मनात काही भीती होती असे नव्हे, पण असल्या गोष्टी गुप्तपणे कराव्यात असे माझे विचारांती मत झाले होते.

मी संध्याकाळी ४।।–५ च्या सुमारास टिळक उतरले होते त्या इमारतीत गेलो. टिळक त्यांच्या सहकाऱ्याबरोबर गप्पा मारत होते. त्यांच्या डोक्यावर पगडी नव्हती; पण मी अंदाज केला की हेच टिळक असणार. गेल्या १०–१२ वर्षांच्या नोकरीत माझे अंदाज अचूक असतात असे Secretary of State पासून तो व्हाइसरॉयच्या Personal Secretary पर्यंत सर्वजण म्हणत आलेले आहेत. व्हाइसरॉयाचा Personal Secretary हा सुद्धा मोठा I. C. S. अधिकारी असतो हे वेगळे सांगावयास नकोच.

मी टिळकांच्या जवळ जाऊन बसलो. माझ्या व्यक्तित्वाने, माझ्या बोलण्याच्या पद्धतीने व माझ्या बुद्धिमत्तेने ते भारल्यासारखे दिसले. मी त्यांना आमच्यासारख्या बुद्धिमान I. C. S. अधिकाऱ्यांनी देशाकरता काय करावे असे स्पष्टपणे विचारले व माझी काहीही करावयाची तयारी आहे असे खुबीने सूचित केले.

टिळकानी माझ्याकडे एक मिनिटभर पाहिले व म्हणाले, " तुम्ही आहात तेथेच ठीक आहात. नोकरीत राहूनच तुम्हाला देशाची सेवा चांगल्या प्रकारे करता येईल. " त्यांच्या संदेशाप्रमाणे मी नोकरीतच राहिलो व मोठया मोठया हुद्दयावर राहून देशाची सेवा केली !

× × ×
I. C. S.

आता टिळकाना विचारून जो माणूस देशसेवा करण्याचे म्हणत होता तो काय करणार हे टिळकांनी त्या I. C S. अधिकाऱ्याला पाहाताच पहिल्या झटक्यात ओळखले असणार ! देशसेवेकरता काहीही करण्याची तयारी दाखवणारे हे काही पहिले गृहस्थ नव्हते. ज्याना काही करावयाचे होते त्या I. C. S. अधिकाऱ्यानी म्हणजे सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, अरबिन्दो वा सुभाष बोसनी टिळकाना न विचारताच करून दाखवले होतेच !

टिळकानी ओळखले होते की हे, रडतराऊ देशाकरता काय करणार ? तेव्हा त्यांनी आहात तेथेच ठीक आहात, तेथे राहूनच देशाची सेवा करा म्हटले त्यात नवल काय ? नवल एवढेच की त्यात एवढे अभिमानाने पुस्तकात छापण्याला देण्यालायक का ही आठवण आहे ? हा प्रश्न ह्या अधिकाऱ्याने स्वत:ला केला नाही. आहे तेथे राहून देशसेवा तर सगळयाच I. C. S. अधिकाऱ्यानी केली! त्यात विशेष काय ? पण केसरीवाले छापता आहेत ना आठवणी ? मग द्या पाठवून ! दाखवा देशभक्ती ही वृत्ती !

एका गृहस्यानी तर कमालच केली होती. त्यांच्या मनात गोपाळ कृष्ण गोखल्याबाबत फार राग होता व तो त्यानी ह्या आठवणीच्या निमित्ताने काढून घेतला होता.

'आम्ही त्या वेळी पुण्याला शनिवारपेठेत रहात होतो. आमच्या शेजारी नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांची लांबची आत्या की मावशी रहात होती. त्या बिचारीचे यजमान काही महिन्यांपूर्वी वारले होते. त्यांच्या प्रॉव्हिडंड–फंडाचे पैसे मिळण्यात फार दिरंगाई होत होती. त्या बाईंना मदत करावी ह्या हेतूने मी त्याना गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या घरी घेऊन गेलो.

ते एका मोठया अलिशान बंगल्यात रहात होते. आम्ही त्यांच्या वाट पहाण्याच्या खोलीत थांबलो. पाच–दहा मिनिटांनी गोरेपान व संपूर्ण साहेबाचे कपडे घातलेले गोखले त्या खोलीत आले व येता येता म्हणाले, ' मी कोणाची खाजगी कामे करत नाही, हे माहीत आहे ना तुम्हाला? ' मी म्हणालो, 'ते आम्हाला माहीत आहे; पण ह्या तुमच्या लांबच्या आत्या आहेत. त्याना फंडाचे पैसे मिळायला फार त्रास होत आहे, वगैरे वगैरे...', ' गोखले परत त्याच स्वरात म्हणाले, ' म्हणून काय झाले ? खाजगी काम आहे ना शेवटी ?' असे म्हणून ते जाऊ लागले व जाता जाता घडयाळात पहात म्हणाले, ' ह्या लोकामुळे माझी ९ मिनिटे वाया गेली बघा ! '

' मग आम्ही काही दिवसांनी लोकमान्य टिळकांकडे गेलो. लोकमान्य उघडया अंगाने झोपाळयावर सुपारी चघळत बसले होते. आम्ही त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला. तर ते म्हणाले, ' मी चिठ्ठी देतो बघा काम होते आहे का ते. ' आता लोकमान्यानी चिठ्ठी दिल्यावर काम होणार नाही असे कसे शक्य होते ?

सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, गोखले व टिळक दोन्हीही थोर माणसे; पण एकाची वृत्ती अगदी ते आपल्या नातेवाइकाला पण मदत न करण्याची व दुसऱ्याची मात्र काही नातेगोते नसता मदत करण्याची सर्वतोपरी तयारी! लोकमान्याचे मोठेपण हृपातच आहे! '

अशा किती तरी आठवणी होत्या. श्यामने त्या मोठया आवडीने वाचल्या व त्यानंतर फडके–माडखोलकराच्या कादंबऱ्यांऐवजी तो वेगवेगळया आठवणी व आख्याइका वाचू लागला.

□

# एका मानसोपचारतज्ज्ञाची मुलाखत

कि. मो. फडके, एम. ए., डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

न्यूयॉर्क शहरातील मॅनहॅटन या अलीशान भागात १९५९ साली. एक संस्था अस्तित्वात आली. त्या संस्थेचे नाव इन्स्टिटयूट फॉर रॅशनल लिव्हिंग आणि तिचे संस्थापक व कार्यकारी संचालक म्हणजे अमेरिकेतील सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस. मानसोपचाराच्या रूढ पद्धती झुगारून देऊन १९५५ साली डॉ. एलिस यांनी स्वत:च शोधून काढलेल्या रॅशनल सायकोथेरपी—म्हणजे विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती—या विषयावर अमेरिकेतील मानसशास्त्रज्ञाच्या वार्षिक अधिवेशनात एक प्रबंध वाचून मोठी खळबळ उडवून दिली होती. त्या वेळी काही प्रस्थापित मानसोपचारतज्ज्ञांनी डॉ. एलिस यांनी प्रवर्तिलेली पद्धती अशास्त्रीय व उथळ आहे असे मत प्रदर्शित केले होते; परंतु डॉ. एलिस यांच्याकडे मानसोपचारासाठी यणाऱ्या लोकांच्या बाबतीत ही नवी पद्धती अधिकाधिक परिणामकारक ठरू लागली. त्या वेळी बाल्यावस्थेत असलेल्या या नव्या मानसोपचारपद्धतीत डॉ. एलिस व त्यांचे सहकारी आपल्या वाढत्या अनुभवानुसार सुधारणाही करू लागले आणि काही काळ उलटल्यावर रॅशनल सायकोथेरपी हे नाव बदलून डॉ. एलिस यानी आपल्या या नव्या पद्धतीला रॅशनल-इमोटिव्ह थेरपी असे नवे नाव दिले. मानसोपचाराची ही पद्धती जेव्हा अधिक परिणामकारक आहे असे दिसून येऊ लागले, तेव्हा त्या पद्धतीची तात्त्विक बैठक, उपचाराची तंत्रे इत्यादी विषयाचा सखोल व सुसंघटित अभ्यास व प्रसार करण्यासाठी डॉ. एलिस यांनी काही मानसोपचारतज्ज्ञांच्या सहकार्याने वरील संस्था स्थापन केली.

आणखी काही वर्षांनी मूळ संस्थेशी संलग्न असलेली दुसरीही एक संस्था डॉ. एलिस यांनी स्थापन केली. त्या संस्थेला आज 'द इन्स्टिटयूट फॉर रॅशनल-इमोटिव्ह थेरपी' असे म्हणतात. या नव्या संस्थेचे मुख्य कार्य म्हणजे मानसोपचारतज्ज्ञांना, मनोवैद्यकीय तज्ज्ञांना व व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांना या नव्या मानसोपचारपद्धतीचे प्रशिक्षण देणे. शिवाय या संस्थेत सामान्य लोकासाठी एक मानसोपचाराचे केंद्रही चालविले जाते. उलट, द इन्स्टिटयूट फॉर रॅशनल लिव्हिंग या मूळ सस्थेचे मुख्य कार्य म्हणजे मानसिक आरोग्याविषयी सामान्य लोकाना शिक्षण देणे. यासाठी संस्थेमार्फत अनेक पुस्तके, ध्वनिफिती व इतर साहित्य प्रसिद्ध केले जातेच; परंतु याशिवाय अनेक जीवनोपयोगी विषयावर व्याख्याने व शिबिरेही आयोजित करण्यात येतात.

विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती उदयास आल्याला आता पचवीस वर्षे लोटली आहेत आणि या कालावधीत सर्वांगानी विकसित झालेल्या या प्रभावी मानसोपचारपद्धतीचा पाया भक्कम झाला आहे. न्यूयॉर्क शहरातील मुख्य संस्थेच्या अनेक शाखा आता अमेरिकेत व इतरत्रही अस्तित्वात येऊन जोमदारपणे कार्य करीत आहेत. डॉ. एलिस यानी शोधून काढलेल्या व विकसित केलेल्या या मानसोपचारपद्धतीबद्दल अगदी थोडक्यात सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, आज अमेरिकेत जिथे जिथे मानसोपचारशास्त्राचे शिक्षण दिले जाते तिथे तिथे विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा अंतर्भाव अपरिहार्य होऊन बसला आहे.

विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीच्या ढोबळ मानाने तीन बाजू कल्पिता येतील. पहिली बाजू म्हणजे ज्या मानसशास्त्रीय सिद्धांतावर ती आधारलेली आहे ते मूलभूत सिद्धांत. दुसरी बाजू म्हणजे विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीत अध्याहृत असलेले एक जीवनतत्त्वज्ञान आणि तिसरी बाजू म्हणजे प्रत्यक्ष मानसोपचार करण्यासाठी उपयोगात आणावयाची तंत्रे व पद्धती. सर्वसामान्य सुशिक्षित माणसाला विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीची ओळख करून घ्यावयाची असेल तर त्याला डॉ. एलिस यांनी किंवा त्यांच्या सहकाऱ्यानी लिहिलेल्या अनेक लेखांची किंवा पुस्तकांची मदत घेता येईल; परंतु डॉ. एलिस याची मूलभूत विचारसरणी समजावून घेण्याचा आणखीही एक मार्ग उपलब्ध आहे. तो मार्ग म्हणजे त्यांच्या आजपर्यंत घेतलेल्या विविध प्रकारच्या मुलाखती. अगदी अलीकडेच पेन्सिलवानियामधील एक मानसोपचारतज्ज्ञ प्रा. डॉ. स्टीफन जी. वाइनरॅच यांनी त्यांची जी मुलाखत घेतली ती सर्वसामान्य सुशिक्षित लोकांनाही उपयुक्त वाटण्याजोगी असल्यामुळे तिचा सारांश या लेखात देण्याचे योजिले आहे.

मुलाखतीच्या निमित्ताने डॉ. वाइनरॅच तीन वेळा डॉ. एलिस यांना दीर्घकाळ भेटले. त्यामुळे डॉ. एलिस यांच्या व्यक्तित्वाचे जे पैलू त्यांच्या निदर्शनास आले त्याबद्दलही त्यांनी प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीच्या प्रस्तावनेत आपले अनुभव नमूद करून ठेवले आहेत. ते म्हणतात की, मला डॉ. एलिस कधीकधी उतावीळ व चक्रम वाटले. शिवाय, सामाजिक शिष्टाचार म्हणजे काय हे त्यांना माहीतच नसावे असे मला वाटले. अर्थात, ते अतिशय बुद्धिमान व संवेदनाक्षम असूनही त्याचा स्वभाव विनोदी आहे व त्याचा सहवास उत्तेजक आहे असेही मी चटकन ओळखले आणि मुलाखत घेताना मी त्यांच्या पसतीस उतरलो पाहिजे व मला वाटत होते त्याप्रमाणच त्यानी माझ्याशी वागले पाहिजे या माझ्या मनातील अविवेकी कल्पनांना मी मूठमाती दिल्यावर मला त्यांच्याशी बातचीत करताना मनमुराद आनंद वाटला. मात्र माझ्या मनातील या कल्पनांना मूठमाती देणे हे काही सोपे काम नव्हते किंवा ते काम सोपे करण्यास डॉ. एलिस मला काही

मदतही करीत नव्हते ! खरोखर डॉ. एलिस हे त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत असेच म्हटले पाहिजे. त्याच्या सर्व वागण्या-बोलण्यावरून सहज प्रत्ययास येते की, लोकांच्या पसंतीवर किंवा मर्जीवर ते अवलंबून तर नाहीतच; परंतु लोकांची मर्जी संपादन करण्याची त्यांना इच्छा असेल असेसुद्धा वाटत नाही. मी जेव्हा जेव्हा त्यांच्या समवेत होतो तेव्हा ते अशा तऱ्हेने वागत असत की, मला वाटे त्यांच्या कचेरीतील माझ्या अस्तित्वाचा त्यांच्यावर काहीच परिणाम झालेला नसावा आणि तर्कशुद्धपणे विचार केल्यावर मला असे वाटले की, माझ्या अस्तित्वाबद्दल त्यांना बरे अथवा वाईट काही वाटावे याला काहीच सयुक्तिक कारण देता येणार नाही. फार तर इतकेच म्हणता येईल की, मी लोकांना आवडो अथवा न आवडो ते माझ्याशी रूढ औपचारिक शिष्टाचारानुसार वागतात याची मला सवय झालेली आहे आणि डॉ. एलिस याच्यात जर कोणती एक गोष्ट अभावाने तळपत असेल तर ती म्हणजे रूढीप्रियता !

त्याच्या या काहीशा तऱ्हेवाईक वर्तनामुळे काही माणसे दुरावली जातात ही गोष्ट सत्य आहे; परंतु त्यांची मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील कामगिरी मात्र सर्वमान्य आहे. शिवाय मी या लिखाणाचे कच्चे मसुदे डॉ. एलिस याना वाचावयास देऊन त्यांच्याकडून फेरफार करून घेण्याची तयारी दाखविली होती, तरी मी त्यांच्या स्वभावाबद्दल जे काही लिहिले आहे त्याबद्दल त्यानी अवाक्षरही काढले नाही. जो मनुष्य मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीकडून "उतावीळ, चक्रम व सामाजिक शिष्टाचार कशाशी खातात ते माहीत नसलेला" अशी खेलकी विशेषणे मिळाली असतानाही मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीचे मत बदलण्याचा यत्किंचितही प्रयत्न करीत नाही अशा मनुष्याबद्दल मला नितात आदर वाटतो. विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती मानवतावादी आहे आणि डॉ. एलिस यांच्यात मानवतावाद ओतप्रोत भरलेला आहे.

डॉ. वाइनरॅच यांच्या वरील प्रस्तावनेवरूनही डॉ. एलिस यांच्या विचारप्रणालोची वाचकाना तोडओळख होते; परंतु त्याचे काही विचार अधिक सुस्पष्टपणे समजण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखतीतील खालील भागाकडे वळणे उपयुक्त होईल.

**डॉ. वाइनरॅच :** मानसोपचारतज्ज्ञाने मनोरुग्णावर उपचार करताना किती प्रमाणात सहानुभूतीने व प्रेमळपणे वागणे आवश्यक आहे असे तुम्हाला वाटते ?

**डॉ. एलिस :** इतर काही मानसोपचारतज्ज्ञांप्रमाणे मलाही असे वाटते की, मनोरुग्णाकडे क्षमाशील दृष्टीने पाहावे, त्याच्या वर्तणुकीवर 'योग्य' किंवा 'अयोग्य' असे शेरे मारीत बसू नये व त्याचा व्यक्ती म्हणून पूर्णत: बिनशर्तपणे स्वीकार करावा; परंतु मनोरुग्णाशी फार प्रेमाने किंवा फार सहानुभूतीने वागल्यामुळे तो रुग्ण उपचार करून घेण्यासाठी आपल्याकड येत राहील हे खरे असले तरी तसे करणे इष्ट नव्हे. कारण मुळात बहुतेक मनोरुग्ण इतर लोकानी त्याना चागले म्हटले अथवा नाही तरी आपण स्वत.चा बिनशर्तपणे स्वीकार केला पाहिजे असे मानण्याऐवजी इतर लोकाकडून प्रेमाची व सहानुभूतीची मागणी करीत असतात. अशा परिस्थितीत त्यांच्याशी केवळ प्रेमाने किंवा सहानुभूतीने वागणे अनेकदा उपायकारक ठरण्याऐवजी अपायकारकच ठरते.

**डॉ. वाइनरॅच :** विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा अवलंब करावयाचा म्हणजे किती प्रमाणात मानसोपचारतज्ज्ञाने तुमच्याप्रमाणे वागले किंवा बोलले पाहिजे अथवा तुमची तंतोतंत नक्कल केली पाहिजे ?

## मूलभूत सिद्धांत

**डॉ. एलिस :** जवळजवळ अजिबात नाही. किती तरी मानसोपचारतज्ज्ञ विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा उपयोग अधिक सौम्यपणे करतात. ते मी वापरतो तशी भाषाही वापरीत नाहीत किंवा ते माझ्याप्रमाणे जोमदारपणेही बोलत नाहीत. त्याच्या भिन्न रीतीमुळे मनोरुग्णाची सुधारणा बहुधा मर्यादित प्रमाणात होते व ती सुधारणा होण्यास वेळही थोडा जास्त लागतो; परंतु त्याची रीतही उपयुक्त ठरते हे निर्विवाद आहे.

**डॉ. वाइनरॅच :** विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धचीचे तात्त्विक, मूलभूत सिद्धात कोणते ?

**डॉ. एलिस :** एपिक्टिटस नावाचा ग्रीक तत्त्वज्ञ दोन हजार वर्षीपूर्वी म्हणाला होता की, तुमच्या जीवनात ज्या घटना घडतात त्यामुळे तुम्ही अस्वस्थ होत नाही तर त्या घटनाकडे पाहण्याच्या तुमच्या दृष्टिकोनामुळे तुम्ही अस्वस्थ होता. हा झाला विवेकनिष्ठ मानसोपचाराचा पहिला मूलभूत सिद्धांत. दुसरा सिद्धात असा की, विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती सर्व घटनाकडे मानवतावादी दृष्टिकोनातून, माणसाच्या दृष्टीने पाहते; स्वर्गातील किंवा पाताळातील कोणत्याही त्रिकालाबाधित शक्तीच्या दृष्टीने पाहत नाही. तिसरा सिद्धांत म्हणजे माणसाला त्याच्या स्वत.च्या वर्तणुकीच्या बाबतीत थोडे का होईना पण स्वातंत्र्य असते. उदाहरणार्थ, माणूस जिवंत राहण्याचे किंवा स्वतःला मारून टाकण्याचे ठरवू शकतो. शिवाय, माणसाच्या काही प्रेरणाही जैविक असतात, त्या प्रेरणापैकी एक म्हणजे त्याची जीवंत राहण्याची तीव्र इच्छा, दुसरी म्हणजे आनद व सुख मिळविण्याची त्याची धडपड आणि जिवत राहून माणसाला थोडा का होईना आनंद किंवा सुख मिळाले नसते तर त्याने जीवंत राहण्याची धडपडच केली नसती.

**डॉ. वाइनरॅच :** माणसाच्या मनातील अविवेकी—कल्पनाच्या मुळाशी काही जैविक बैठक असते काय ?

**डॉ. एलिस :** आपल्या बऱ्याच कल्पना व विचार विवेकनिष्ठच असतात. म्हणजे अशा कल्पनामुळे किंवा विचारामुळे आपण आपली उद्दिष्टे साध्य करून घेऊ शकतो. स्वतःला जीवंत राहण्यास व आनंद मिळविण्यास उपयुक्त ठरेल अशी जैविक प्रवृत्ती माणसाला जन्मजातच लाभलेली असल्यामुळे तो ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निर्णय घेऊन त्यानुसार वर्तन करू शकतो; परंतु आपली नेमकी हीच उद्दिष्टे पराभूत करण्याची अविवेकी जैविक प्रवृत्तीही माणसाला जन्मजातच लाभलेली असावी असे वाटते. अशा अविवेकी प्रवृत्तीमुळेच माणूस अकाली स्वतःची हत्या करण्यास किंवा हळूहळ स्वतःचा नाश करण्यास किंवा आनंदी राहण्याची इच्छा असूनही दु खीकष्टी जीवन जगण्यास प्रवृत्त होतो. याचा पुरावा म्हणजे ज्यांची स्वतःची तशी इच्छा नसतानाही आपले आयुष्य अकार्यक्षमतेने, आत्मघातकी पद्धतीने, अकारण चिंताग्रस्त व विषण्ण होऊन, विद्वे-

षाची किंवा आत्मकरुणेची भावना मनात बाळगून जीवन कंठताना सर्वत्र दिसणारे बहुसंख्य लोक !

उदाहरण म्हणून माणसाची एखाद्या कामाच्या बाबतीत अळंटळं करण्याची व ते काम लांबणीवर टाकण्याची प्रवृत्ती पाहा. निदान अमेरिकेत तरी आपण माणसाला कामाच्याबाबतीत चालढकल करण्यास शिकवत नाही. उलट आपल्या आई-वडिलाकडून, शिक्षकांकडून व इतर माध्यमांद्वारे आपल्याला सतत यशस्वी होण्याची, कोणतेही काम तत्परतेने करण्याची व शिस्त अंगी बाणवून उद्योगाची कास धरण्याची शिकवण मिळत असते आणि तरीही या सर्व शिकवणुकीच्या विरुद्ध जाऊन कामाच्या बाबतीत आपण कमालीची चालढकल व अळंटळं करतो व आजचे काम उद्यावर टाकतो. अगदी महाविद्यालयातील बहुसंख्य उच्चशिक्षित, बुद्धिमान विद्यार्थीही याला अपवाद नाहीत ! एखादी अविवेकी वर्तणूक इतकी मोठ्या प्रमाणावर दिसून येते व ती आपल्या सर्व सामाजिक शिकवणुकीच्या प्रयत्नांवर बोळा फिरविते तेव्हा तिच्या मुळाशी काही जैविक कारणे असावीत असे जरी सिद्ध होत नाही तरी तसे निःसंशयपणे वाटू लागते.

डॉ. वाइनरॅच : मी जरा गोंधळलो आहे. तुमच्या मते माणूस प्राय: विवेकी आहे की अविवेकी आहे ?

डॉ. एलिस : दोन्ही ! मॅस्लो, रॉजर्स वगैरे मानसशास्त्रज्ञांनी निदर्शनास आणल्याप्रमाणे माणूस अनेक विवेकी व आत्महितकारक प्रवृत्ती घेऊन जन्मास येतो. उदाहरणार्थ, प्रेम करण्याची, विकास साधण्याची, परिवर्तन करण्याची व स्वतःमधील गुणविशेषाचा आविष्कार करण्याची प्रवृत्ती माणसात जन्मजातच असते; परंतु हे स्वप्नदर्शी किंवा थोड्या मृदु प्रकृतीचे मानसशास्त्रज्ञ ही गोष्ट विसरतात की, माणसाला अनेक अविवेकी व आत्मघातकी प्रवृत्ती जन्मत च लाभलेल्या असतात. उदाहरणार्थ, स्वतःची निंदा करण्याची, स्वतःला तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती, एखाद्या व्यक्तीचे दैवीकरण किंवा दानवीकरण करण्याची प्रवृत्ती आणि आयुष्यातील कटकटीबद्दल काही परिणामकारक कृती करण्याऐवजी कुथत बसण्याची प्रवृत्ती या त्याला जन्मत: लाभलेल्या अविवेकी प्रवृत्तींपैकीच काही प्रवृत्ती आहेत, असे म्हणावे लागेल. तेव्हा माझ्या मते माणूस जन्मत.च विवेकी व अविवेकी असतो किंवा शहाणा व मूर्ख असतो ! त्याची ही दुहेरी प्रकृति हेच त्याचे मनुष्यत्व !

डॉ. वाइनरॅच : ग्रीक तत्त्वज्ञ एपिक्टिटस याच्या वचनावर आधारलेला जो पहिला सिद्धांत तुम्ही सांगितलात त्यामुळे माणसाला आपल्या स्वत.च्या वर्तनाबद्दलची स्वतःची जबाबदारी टाळण्यास मुभा मिळेल असे तुम्हाला वाटत नाही काय ? कारण, समजा मी दुसऱ्या माणसावर टीका करून जाणूनबूजून त्याचा अपमान केला व त्यामुळे तो माणूस अस्वस्थ झाला तरी तुमच्या सिद्धांताचा दाखला देऊन मी म्हणेन की, दुसरा माणूस माझ्या टीकेमुळे नाही तर माझ्या टीकेबद्दलच्या त्याचा दृष्टिकोणामुळे अवस्थ झाला आहे.

डॉ. एलिस : होय. दुसरा माणूस काहीसा सवेदनाशील किंवा भावनाप्रधान असू शकतो ही गोष्ट तुम्ही विसरलात तर तुम्हाला स्वतःवरील जबाबदारी टाळण्याची मुभा मिळेल, हे खरे आहे; परंतु विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीत आम्ही माणसाला स्वतःच्या वर्तणुकीबद्दलची जबाबदारी स्वीकारण्यास शिकवतो. त्यामुळे मी जर एखाद्या व्यक्तीचा हेतुपुरस्सर अपमान केला व त्यामुळे ती व्यक्ती अस्वस्थ झाली तर त्याचे कारण म्हणजे त्या व्यक्तीने माझे बोलणे गंभीरपणे मनाला लावून घेतले असेच म्हटले पाहिजे; परंतु त्या व्यक्तीचा अपमान करण्याचा माझा हेतू होता त्याची जबाबदारी माझ्यावरच राहते. अशा वेळी विवेकनिष्ठ राहून मी माझी चूक मान्य करीन किंवा माझे वर्तन अनिष्ट असल्याचे मान्य करीन; परंतु त्या चुकीबद्दल किंवा अनिष्ट वर्तनाबद्दल मी स्वत.च व्यक्ती म्हणून पूर्णपणे धिक्कार करणार नाही. त्यामुळे मी माझी चूक मान्य करण्यास धजणार नाही व परिणामी मी अधिक नीतिमान होऊ शकेन. कारण माझे वर्तन चूक नव्हतेच असे म्हणण्याचो मला गरजच उरणार नाही.

डॉ. वाइनरॅच : आपल्यापुढील समस्या सोडविण्याच्या कामात तुम्ही वस्तुनिष्ठ भूमिकेवर इतका भर देता त्यामुळे भावना अनुभवण्यावर किंवा व्यक्त करण्यावर गदा येते का ? किंवा वेगळ्या भाषेत बोलायचे म्हणजे विवेकनिष्ठ राहून विचार करण्यामुळे माणूस आत्मसंतुष्ट व उदासीन तर होणार नाही ना ?

## क्रोधभावना

डॉ. एलिस : अगदी उलट ! ही पद्धत अनुसरणारा मानसोपचारतज्ज्ञ दुसऱ्या व्यक्तीची मर्जी संपादन करण्याच्या तहानेने उगाच फारसा अस्वस्थ होत नसल्यामुळे तो स्वत: भावना अनुभवण्यास व व्यक्त करण्यास, कडक किंवा गंभीर भाषा वापरण्यास मोकळा असतो. किंबहुना भावना अनुभवण्यास व त्या व्यक्त करण्यास तो अगदी मुक्त असतो !

दुसरी गोष्ट अशी की, आम्ही माणसाला तीव्र चिंता, विषण्णता, आत्मकरुणा, विद्वेष, शत्रुत्वाची भावना व न्यूनत्वाची भावना इत्यादी आत्मघातकी भावनाचा त्याग करावयास शिकवतो. सर्वच भावनाचा त्याग करावयास शिकवत नाही. किंबहुना माणसाला खेद, योग्य काळजी किंवा क्लेश या भावना अनुभवण्यास आम्ही प्रसंगी उत्तेजन देतो. कारण त्यामुळे माणूस काही तरी स्वहितकारक किंवा परहितकारक कृती करण्यास प्रवृत्त होऊ शकेल. कधीकधी तर आम्ही ज्या गोष्टी केल्यामुळे माणसाला लज्जा किंवा अपमान वाटेल अशा अगदी मूर्ख व आचरट गोष्टी मुद्दाम करावयास लावून त्याला आपल्या स्वतःला अकारण अस्वस्थ करणाऱ्या अशा भावनावर मात करावयास शिकवितो.

डॉ. वाइनरॅच : क्रोध या भावनेबद्दल आपण काही सांगू शकाल काय ?

डॉ. एलिस : अनेक तत्त्वज्ञानी म्हटल्याप्रमाणे 'अ' या टप्प्यावर आपल्या सभोवतालच्या जगात घडणाऱ्या घटनाबद्दल 'ब' या टप्प्यावर आपण आपल्या मनात जो अर्थ लावतो त्यामुळे 'क' या टप्प्यावर आपल्या मनात क्रोध उत्पन्न होतो. म्हणजे 'ब' टप्प्यावर आपल्याला निवड करण्याचे स्वातंत्र्य असते. तसे स्वातंत्र्य आपल्याला असते याची आपल्याला जाणीव नसली तरी तसे स्वातंत्र्य आपल्याला असते. आपल्या मनातील 'च' या अव्ययामुळे आपण रागवतो. 'तू जे केलेस ते तू करावयास नकोच होतेस; तू मला जशी वागणूक दिलीस तशी वागणूक तू मला द्यायला नकोच होतीस, तू माझ्याशी

अशा अन्यायकारक रीतीने, सहानुभूतिशून्यपणे व दुष्टपणे वागताच कामा नये आणि तसे तू वागलास तर तुझे वागणे भयंकर आहे व ते मला सहन करताच येणार नाही व म्हणून तू नतद्रष्ट माणूस आहेस असेच सिद्ध होते.' असे विचार 'ब' या टप्प्यावर स्वतःला सांगितल्यामुळे आपण 'क' या टप्प्यावर रागावतो. सारांश, क्रोधाच्या मुळाशी अनिष्ट वर्तन करणाऱ्या माणसाचा व्यक्ती म्हणून पूर्णतः धिक्कार करण्याकडे आपला कल दृढमूल झालेला असतो आणि शिवाय त्यात अशीही कल्पना अंतर्भूत असते की, असे अनिष्ट वर्तन करणाऱ्या माणसाला नष्ट करून टाकले पाहिजे किंवा त्याला कडक शासन हे झालेच पाहिजे. म्हणजे क्रोधाच्या मुळाशी लोकांनी मला समजूतदारपणे, प्रेमाने व न्याय्यरीतीने वागवावे व त्यांनी मला तशा प्रकारे न वागविल्यास ते नालायक, नतद्रष्ट कृमिकीटक ठरतात अशी शेखसल्ली विचारसरणी अनुस्यूत असते. म्हणून आपल्या मनातील अशा शेखसल्ली मागण्यांचा बीमोड करून आपल्याला क्रोधावर मात करता येते किंवा तो निदान आटोक्यात आणता येतो.

डॉ. वाइनरॅच : आपल्या मनातील क्रोधाला वाट मोकळी करून देऊन म्हणजेच तो उघडपणे व्यक्त करून काय फायदा होतो ?

डॉ. एलिस : राग व्यक्त करून कदाचित एखाद्या वेळी आपल्याला रागावर मात करणे शक्य होईलही. कारण आपल्या मनातील रागाला वाट मोकळी करून देताना तुम्ही स्वतःला सांगाल की, त्याच्या वागण्याचा मला तिरस्कार वाटतो; परंतु तो काही पूर्णतः नालायक माणूस नाही. फक्त त्याचे माझ्याशी वागणे अनिष्ट होते आणि असे स्वतःला सांगितल्यामुळे तुमच्या रागाचा पारा कमी झाल्यावर तुम्ही तुमचा दृष्टिकोनही बदलाल व तुमचा क्रोधही संपेल; परंतु राग व्यक्त केल्यामुळे बहुधा उलटच परिस्थिती निर्माण होते. उदाहरणार्थ नोकरीतील तुमच्या वरिष्ठावर प्रहार करण्याऐवजी तुम्ही तुमच्या उशीवर गुद्दे लगावून तुमचा राग व्यक्त करता, तेव्हा तुम्ही स्वतःला सांगता की, तो माणूस हलकट आहे. त्याने माझ्याशी असे वागायलाच नको होते, साला मरेल तर बरे! म्हणजे राग व्यक्त करता तेव्हा तुम्ही तुमच्या रागाला खतपाणी घालून वाढविता. अशा प्रकारे राग व्यक्त केल्याने बहुधा तो वाढतो, कायम राहतो किंवा दृढमूल होतो. याचा अर्थ मानसशास्त्रातील अनेक प्रयोगांवरून सिद्ध झाले आहे त्याप्रमाणे रागाच्या अप्रत्यक्ष आविष्काराने (उशीवर गुद्दे मारून) किंवा प्रत्यक्ष आविष्काराने (तू मला आवडत नाहीस व तू खरोखरच वाईट माणूस आहेस असे दुसऱ्याला तोंडावर सांगून) राग कमी होत नाही म्हणजे रागाचा निचरा करावा असे म्हटले जाते, तरी वस्तुतः राग व्यक्त केल्याने फक्त तात्पुरते बरे वाटते. कारण तुम्ही तुमचा राग व्यक्त करता तेव्हा तुम्ही स्वतःवर रागवत नाही इतकेच! परंतु अशा प्रकारे राग व्यक्त केल्यामुळे बहुतेक लोकांना अधिकच वाईट वाटते. त्यामुळे कधीकधी तुमच्या मूळ दृष्टिकोनात बदल होतो व म्हणून तुम्ही रागावर मात करू शकता. हे खरे असले तरी बहुधा त्यामुळे तुम्ही जास्तच कोपिष्ट बनता व परिणामी तुमच्या हे लक्षात येत नाही की तुमचा क्रोध तुम्हीच निर्माण करीत असता.

डॉ. वाइनरॅच : क्रोधामुळे व चिंतेमुळे माणसाचे काही फायदे होतात काय ?

डॉ एलिस : मर्यादित चिंतेमुळे माणसाला काही फायदे मिळू शकतात; परंतु विषण्णतेमुळे किंवा क्रोधामुळे बहुधा काही फायदे होत नाहीत. विषण्णतेमुळे तर मनुष्य निष्क्रियच बनतो. क्रोधामुळे काय परिस्थिती निर्माण होते ते पहा. समजा, रस्त्यात मला एखादा लुटारू भेटला व म्हणाला, 'काढ तुझे पैसे नाही तर तुला ठार करीन!' अशा वेळी मी रागवलो तर त्या लुटारूशी योग्य रीतीने मुकाबला करण्याऐवजी मी अयोग्य रीतीनेच मुकाबला करीन. उदाहरणार्थ, रागवल्यामुळे मी त्याच्यावर जरी जोरात प्रहार केला तरी तो अचूक ठरणार नाही. अर्थात कधीकधी व विशेषतः माझा प्रतिस्पर्धी दुबळा असेल तर मी रागवल्यामुळे त्याच्यावर मात करीनही किंवा त्याला ठार करू शकेन. तेव्हा क्रोध व इतर घातकी भावना कधीकधी उपयुक्त ठरतात. उदाहरणार्थ, चिंतेमुळे मी सिंहाला भिऊन पळून जाईन किंवा परीक्षेची कसून तयारी करीन.

### समस्यांचे कारण

डॉ. वाइनरॅच : माणसाच्या मानसिक अस्वस्थतेचे मूळ कारण म्हणजे त्याची वैफल्य सहन करण्याची मर्यादित कुवत होय. हे तत्त्व म्हणजे तुमच्या सर्व विचारसरणीचे सार असावे असे मला वाटते. त्याचप्रमाणे, माणसाच्या सर्व मानसिक समस्यांचे कारण म्हणजे या जगातील घटना त्याला हव्या असतात त्या रीतीने घडत नाहीत, ही गोष्ट त्याला सहन करता येत नाही असा निष्कर्ष काढला तर चालेल काय ?

डॉ. एलिस : तुम्ही काढलेला सारांश अगदी पूर्णतः नाही तरी बऱ्याच अंशी बरोबर आहे.

डॉ वाईनरॅच : म्हणजे तुम्ही माणसाची वैफल्य सहन करण्याची मर्यादित कुवत या गोष्टीवरच विशेष भर देता तर !


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

डॉ एलिस : तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु कोणतीही मानसोपचारपद्धती वापरून अखेर काय साधले जाते असे मला विचारलेत तर मी म्हणेन की मानसोपचार करून माणसाला त्याच्या मनातील 'मला ही गोष्ट सहन होत नाही' या कल्पनेशी सामना करावयास शिकवले जाते. माणसाच्या मनातील ही कल्पना तीन रूपे धारण करू शकते. तिचे पहिले स्वरूप म्हणजे मला माझ्यामधील न्यूनत्व सहन होत नाही; दुसरे स्वरूप म्हणजे इतरांमधील दोष मला सहन होत नाहीत; आणि तिसरे रूप म्हणजे माझ्या सभोवतालच्या जगातील घटना मला सहन होत नाहीत.

डॉ वाईनरॅच : मानसोपचारामुळे मनुष्य आपल्यापुढील समस्या सोडविण्यास समर्थ होतो असे म्हटले तर तो ज्या पद्धती वापरून स्वत.च्या जीवनातील समस्या सोडवितो त्या पद्धतींपैकी काही अधिक परिपक्व पद्धती असतात तर काही आपल्या कामचलाऊ पद्धती असतात असा काही फरक करता येईल काय ?

डॉ. एलिस : होय. तसा फरक करता येतो. समजा एखादा माणूस नोकरी मिळविण्यासाठी मुलाखतीला गेला व 'अ' या टप्प्यावर तो अयशस्वी झाला आणि 'क' या टप्प्यावर त्याला चिंता व विषण्णता या भावना तीव्रपणे अस्वस्थ करू लागल्या तर त्याच्या या त्रासदायक भावनाचे कारण आम्ही 'ब' या टप्प्यावर तो स्वतःला जे काही सागत असतो त्यात शोधण्याचा प्रयत्न करतो. आणि या माणसाने आपल्यापुढील समस्या अधिक परिपक्वपणे हाताळण्याची पद्धती म्हणजे असे समजावून घ्यायचे की मला छळणाऱ्या या भावना मी स्वतः निर्माण केल्या आहेत आणि मुलाखतीत अयशस्वी झालो म्हणून मी स्वतःला क्षुद्र, कस्पटासमान लेखण्याची, चिंताग्रस्त व विषण्ण होण्याची काहीही आवश्यकता नाही; माझ्या मनात प्रक्षुब्ध भावना निर्माण करण्यास मीच जबाबदार आहे त्यामुळे दुसऱ्यांनी मला प्रक्षुब्ध केले असे समजून त्याना दोष देण्याचे कारण नाही; मी या मुलाखतीत किंवा कोणत्याही कामात यशस्वी झालेच पाहिजे असे म्हणण्यास वस्तुस्थितीचा काहीही आधार नाही; आणि मुलाखतीत अयशस्वी होणे ही काही महाभयंकर आपत्ती नाही; मी असे अपयश जरूर सहन करू शकतो; शिवाय, अपयश पदरी आल्यामुळे मी नालायक माणूस आहे असे सिद्ध होत नाही. वरील विचार स्वतःला पूर्णपणे पटवून देणे म्हणजे आपल्यासमोरील समस्येशी अधिक परिपक्व पद्धतीने मुकाबला करणे होय. कारण एकदा हे विचार माणसाला पटले व तो स्वतःचा पूर्णपणे स्वीकार करावयास शिकला की पुढील जीवनात निर्माण होणाऱ्या इतर समस्याही तो अधिक समर्थपणे हाताळू शकेल.

याउलट, कामचलाऊ पद्धतीने याच समस्येशी मुकाबला करणे म्हणजे स्वतःला असे सांगणे की मी या वेळी अयशस्वी झालो असलो तरी पुढच्या वेळी यशस्वी होईन; म्हणून अयशस्वी होणे ही काही महाभयंकर आपत्ती नव्हे. परंतु असा मनुष्य, मनुष्यच असल्यामुळे, पुढच्याही वेळी अयशस्वी होऊ शकेल. त्यामुळे स्वत पुढील समस्येला सामोरे जाण्याची ही पद्धती कामचलाऊ म्हटली पाहिजे आणखी एक कामचलाऊ पद्धती म्हणजे चिंता व विषण्णता या स्वतःला छळणाऱ्या भावना नाहीशा करण्यासाठी मनुष्य विरंगुळा म्हणून सिनेमाला जाईल किंवा इतरत्र कोठे तरी लक्ष गुंतविण्याचा प्रयत्न करील. असे कामचलाऊ मार्ग अनेक असू शकतात. उदाहरणार्थ, एखादा मानसोपचारतज्ज्ञ त्याच्याकडे आलेल्या मनोरुग्णाला सांगेल की, तुला तुझी घृणा वाटत असली किंवा तू स्वत वर अतिशय नाराज असलास तरी मला तू आवडतोस व माझ्या दृष्टीने तू मोठा माणूस आहेस. अशा वेळी त्या मनोरुग्णाला तात्पुरते बरे वाटेलही. परंतु दूरदृष्टीने पाहता त्याची परिस्थिती अधिकच बिघडणेही शक्य आहे. कारण या तात्पुरत्या मलमपट्टीच्या मुळाशी लोकांच्या पसंतीची, यशस्वी होण्याची अत्यावश्यकता केवळ इच्छा नाही तर अत्यावश्यकता--तशीच कायम राहते.

डॉ. वाईनरॅच : किती माणसे आपल्यापुढील समस्या अधिक परिपक्व पद्धतीचा उपयोग करून सोडविण्यास तयार व समर्थ असतात असे तुम्हाला वाटते ?

डॉ. एलिस : अगदी पूर्णतः परिपक्व पद्धतीने स्वत.पुढील समस्या सोडविण्यास फारच थोडी माणसे तयार असतात. अगदी पूर्णतः परिपक्व पद्धतीचा अवलंब करणे म्हणजे माणसाने उरलेल्या आयुष्यात कोणत्याही प्रसंगी स्वत ला अकारण अस्वस्थ करून न घेणे. हे फारच थोड्या माणसांना शक्य होईल कारण हे काम माणसाच्या प्रकृतिजन्य स्वभावाविरुद्ध आहे. माणूस हा परिपूर्ण नसल्याने तो कमी अधिक प्रमाणात परिपक्व पद्धतीने आपल्यापुढील प्रश्न सोडवील; परंतु बहुसंख्य माणसे कामचलाऊ पद्धतीचाच अवलंब करतील.

डॉ. वाईनरॅच : तुम्ही स्वतः कोणत्या गटात मोडता ?

डॉ. एलिस : अगदी परिपक्व पद्धतीने स्वत पुढील प्रश्न सोडविणारे जे काही थोडे फार लोक आहेत त्यापैकी मी एक आहे. मी स्वतःला जवळजवळ कधीच विषण्ण करून घेत नाही. आणि अगदी काहीही झाले तरी फार क्वचित प्रसंगी मी स्वतःला चिंताग्रस्त करून घेतो. मात्र लोकांचा मूर्खपणा व त्याचे अन्याय्य वागणे यामुळे मी स्वत च्या मनात वारंवार क्रोध निर्माण करतो. अर्थात याही बाबतीत मी पूर्वीपेक्षा खूपच सुधारलो आहे. तेव्हा हे उघडच आहे की मी काही शंभर टक्के परिपक्वपणे माझ्यापुढील प्रश्न सोडवू शकत नाही.

डॉ. वाईनरॅच : तुम्ही तुमच्या विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा इतका प्रसार करू शकला आहात त्याचे एक कारण असे की ती पद्धती वैज्ञानिक दृष्टिकोणावर आधारलेली आहे. परंतु दुसरे कारण म्हणजे तुमचे आगळे व्यक्तित्त्व ! तेव्हा तुमच्यानंतर विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचे भवितव्य काय ? तुमची जागा कोण घेणार ? विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती आता स्वतंत्रपणे आपल्या पायावर उभी राहिली आहे काय ?

डॉ. एलिस : विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती म्हणजे मी नव्हे ! अनेक व्यावसायिक मानसोपचारतज्ज्ञ तिचा उपयोग माझ्यापेक्षा वेगळ्या शैलीने करीत आहेत; व तेही अगदी परिणामकारकरीत्या तसा उपयोग करीत. त्यांच्यापैकी कित्येकाचे व्यक्तित्त्व माझ्याहून फार भिन्न आहे. तेव्हा विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती काही केवळ माझ्या एकट्यावर अवलंबून नाही. आणि त्या पद्धतीत जर काही सत्यांश असेल तर ती माझ्यावर अवलंबून न राहवी हेच उत्तम !

□

पुस्तके

# सर्व देवजींचे हेच प्राक्तन आहे का?

माधव कोंडविलकराची 'अजून उजाडायचं आहे' ही कादंबरी वाचली. एकदा वाचल्यावरच कादंबरी मनाची पकड घेते. संपूर्ण कादंबरीत साधी सरळ निवेदनपद्धती वापरली आहे. देवजी चाभार, त्याची बायको देवकी आणि त्यांची मुलं याची दुःस्थिती आणि असहाय्यता या कादबरीतून सरळ पुढे येते. कादंबरीचं वैशिष्टय म्हणजे ती वाचताना जो ठसा मनात उमटतो तो केवळ तात्कालिक स्वरूपाचा न राहता, 'सर्व चांभार समाजाचं प्रातिनिधिक चित्रण देवजी करतो आहे का?' या विचाराने मन अस्वस्थ होत. देवजी चाभारासारख्या कित्येक घराघरातून अजून उजाडायचं आहे, पण त्यावर उपाय काय? या प्रश्नावर कोंडविलकरानी कोणताही सरधोपट उपाय सुचवण्याची घाई केलेली नाही; पण कादंबरीतून ब्राह्मण, ब्राह्मणेतर, प्रस्थापित आणि देवजीसारखे इतर अप्रस्थापित याच्यातील सामाजिक, आर्थिक, सास्कृतिक दरी मनाच्या आतल्या कप्प्यात सतत जाणवत राहते आणि काही काही असंघटित समाजाची दुःस्थिती ही आपल्या आजच्या प्रयापित समाजरचनेचाच अपरिहार्य भाग आहे हे स्पष्टपणे जाणवते. या कादबरीचे हेच वैशिष्टय म्हणावे लागेल.

कादंबरीची सुरुवात होते देवजीच्या रोजच्या कामापासून. "सकाळपासून दुकानाच्या फळीवर बसलेला देवजी अखंड वहाणा टोपोत होता, फाटक्या–तुटक्या वहाणा शिवत होता. सकाळपासून सात–आठ लोकांचं काम झालं होतं आणि अजून सात–आठ दारात बसले होते." यासारख्या वर्णनातून देवजीचं रोजचं काम डोळ्यासमोर येतं. गावातल्या बारा वाड्यापैकी सहा वाड्यांचं काम एकटा देवजी करतो. प्रत्येक वाडीत ५०।६० घरं आणि प्रत्येक घरात किमान सात–आठ माणसं वहाणा वापरणारी होती. या प्रत्येकाच्या वहाणा फाटतील तेव्हा नाही–होय न म्हणता शिवून द्यायच्या, हा देवजीच्या पणजोबांपासून चालत आलेला अलिखित नियम आहे. देवजी त्याला अपवाद नाही. असे अपवाद गावात टिकत नाहीत हे देवजीला पूर्ण माहीत आहे. त्याच्या चुलत्याने पडपोनीवर वर्षभर मरायचं नाकारलं तर त्याला गाव सोडावं लागलं. दुसऱ्या गावात गेला तर 'उचला' म्हणून राहू देईनात. देवजी या अनुभवातून शहाणा झालेला नम्र, पापभिरु आणि आहे ती परिस्थिती पूर्णपणे पचवलेला गरीब चाभार आहे. जातीचे आणि उच्चवर्णीयानी घालून दिलेले नियम पाळायची त्याला मनापासून आवड आहे. काशिनाथ हा देवजीचा मुलगा. तो शाळेत शिकतो, चांगले मार्क मिळवतो. त्याच्याबद्दल देवजी आणि देवकीला अभिमानही आहे आणि भीतीही आहे. भीती अशासाठी की, काशिनाथ शहाणा होऊन कोणाला अरे ला का रे करू लागला तर काय? आपण आपल्या पायरीप्रमाणं रहावं हे तत्त्वज्ञान देवजीनं आत्मसात केलं आहेच पण ते दुसऱ्या पिढीपर्यंत तो पोचवतो आहे. देवजीच्या मनातली ही भीती कादंबरीत छान व्यक्त होते. उदाहरणार्थ, पाणी भरायला म्हणून गेलेला काशिनाथ सगळ्याचं पाणी भरून होईपर्यंत थांबतो. लोकाच्या आंघोळी होतात, कपडे धुऊन, भाडी घासून घेतात, गाई–बैल धुऊन झाले तरी काशिनाथला पाणी मिळत नाही. पाण्यासाठी विचारले तर सर्व शिव्या द्यायला लागतात, 'तुजा सालंत पैला नंबर, म्हन् तू हयपन दादागिरी करू नुको!' अशी मनातली मळमळ आणि विखार बोलून दाखवतात. काशिनाथ घरी आल्यावर देवजी काशिनाथचं बोलणं ऐकून न घेता वाडीतल्या लोकांसमोर तोंड वर करून बोलला म्हणून त्याला मरेस्तोवर मारतो या मारण्यात देवजीची चीड नाही. होऊ घातलेल्या संभाव्य संक्रमणाबद्दलची भीती आहे!

कादंबरीत दोन पिढ्यामधला संघर्ष फक्त 'संभाव्य' म्हणून ओळखीचा होतो पण तो आकार घेत नाही. कारण काशिनाथ अजून लहान आहे. तो शाळेत शिकतो, वेळ पडली तर देवजीजवळ फळीवर बसून वहाणेला टाके घालतो, जे त्याला विशेष जमत नाही. घरात अन्न नसेल तेव्हा देवजीबरोबर तो गावात भीक मागायला जातो त्याची त्याला लाज वाटत नाही. पाणी भरण्याच्या प्रसंगात काशिनाथमधली चमक दिसते. तो म्हणतो, 'शिव्या देन्याचा तुजा कारन नाय्. आमी तुमचा सल्ला सन कर्ताव, ऐकान् घेताव्, तरीपन तुमी आमास बोल्ताव!'

कादंबरीत घडलेले सर्व प्रसंग खरे वाटतात. कादंबरी खुलवण्यासाठी कोणताही अवास्तव प्रयत्न इथे दिसत नाही. देवजीचे जीवन लेखक प्रत्यक्ष जगला आहे की काय अशी शंका मनात येण्याइतके या कादंबरीतले संवाद सहज, सरळ आणि बोलके आहेत. निवेदनात एक ओघ आहे; पण त्यात लेखक अकारण वाहून जात नाही!

चांभाराचं जीवनच कातड्यावर बेतलेलं. देवजीला कित्येक दिवस कातडं मिळत नाही. गिऱ्हाईक थटून बसलेलं असतं. काम वेळेवर होत नाही म्हणून गावातला शिंदे हत्यारं उचलून नेतो. देवजी बेचैन होतो. या अस्वस्थतेत मेलेल्या बैलाचं कातडं सोडवण्याचं महाराचं काम देवजीच करतो. जातीला बट्टा लावतो. जातीतले लोक ओरडा करतात. पंचायत बोलावतात. देवजीचा न्याय पंचायतीत होतच नाही. गप्पा मारण्यात आणि किस्से सांगण्यात रात्र सरायला लागते; पण देवजीनं कातडं सोडवण्याचं पाप का केल? ते कोणीच जाणून घेत नाही शेवटी देवकीला रहावत नाही. ती पंचायतीला म्हणते, 'मरमर मरानसुद्धा प्वॉट जलत नाय्, तवा हयेचा तुमी इचार करा आणि फुडं कसा जगाचा ता तुमीच सागा!' 'बाईचा काय चुकत नाय हाय, पन कर्नार काय?' असं पडलेल्या आवाजात पुढारी म्हणतो आणि गप्प होतो.

इथे कादबरी सपते. पोट जाळण्यासाठी जातीनं निषिद्ध ठरवलेलं काम केलं, चुकलं नाही; पण काय करणार? कादंबरीचा हा शेवट अतिशय संयतपणे केलेला आहे. जातिव्यवस्थेमुळे समाजरचनेचे झालेले कठोर कप्पे आणि त्यातून जन्माला आलेली ही असहाय्यता! कळतं पण वळत नाही ही आपल्या सुशिक्षित समाजाची स्थिती. त्यांच्यापुढं काय करणार? हा शेवटचा प्रश्न खरोखरच सूचक आहे.

'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' नंतर कोंडविलकरांची ही दुसरी कादंबरी. मॅजेस्टिक प्रकाशनने ही कादबरी सप्टेंबर ८१ मध्ये

प्रसिद्ध केली आहे. मुखपृष्ठ कमल शेडग्यांचं आहे. काळ्या पार्श्वभूमीवरची फाटकी वहाण कादंबरीचा आशय सूचित करते. 'मुक्काम पोस्ट' नंतरच्या या कादंबरीत कोंडविलकरांची लिखाणातली सफाई आणि तांत्रिक सुधारणा जाणवते. कादंबरी-वाचनानंतर तात्काळ मनात येणारा प्रश्न म्हणजे, देवजी सरळ, पापभिरु आणि प्रामाणिक आहे म्हणूनच त्याच्यावर ही परिस्थिती ओढवली नाही ना? की सर्व देवजीचे हेच प्राक्तन आहे? ◻

अजून उजडायचं आहे
लेखक—माधव कोंडविलकर
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे : १४०, किंमत : २४ रु.

# 'आपली' नीता

सिस्टमिक ल्युपस ॲरिथ्रोमेटोसस् किंवा एस. एल. ई. या विलक्षण रोगाने नीता या हुशार, चुणचुणीत, कलासक्त आणि सदासतेज मुलीवर वयाच्या बाराव्या वर्षी झडप घातली! पुरी पाच वर्षं ती या असाध्य रोगाशी प्राणपणान झुजली. जीवनाची अखेर जवळ आल्याचं तिला कळून चुकलं; पण तिनं तिची मूल्यं सोडली नाहीत. एका सदासतेज, महत्त्वाकांक्षी जीवनाची तिनं सुरुवात केली होती; पण एस. एल. ई. सारख्या असाध्य रोगानं वयाच्या १७ व्या वर्षी तिला आपल्यापासून ओढून नेलं! नीताचा स्वभाव, तिची जिद्द, तिचा उत्साह, तिचे विचार, स्पष्टवक्तेपणा खास तिचाच होता. नीता या जगातून गल्यावर तिची आई उषा सेठ यानी 'माझी नीता' ही चटका लावणारी सत्यकथा लिहून काढली.

'माझी नीता' वाचून झाल्यावर थोडा वेळ मन सुन्न होतं. नकळत डोळ्यांत पाणी येतं. ह्या क्षणिक परिणामातून बाहेर पडल्यावर मनात शिल्लक रहाते ती नीता आणि तिच्या आईनं साक्षात मृत्यूशी आणि नियतीशी दिलेली झुंज! भावनेला बळी न पडता नीताने दाखवलेलं मनोधैर्य, चिकाटी, प्रयत्न खरोखरच लोकविलक्षण आहेत!

ही कादंबरी म्हणजे काही नीताच्या स्मृती नाहीत की, हे तिचं व्यक्तिचित्र नाही. रोगाची लक्षणे दिसू लागल्यापासून रोगाने तिच्यावर क्रूर झडप घातली त्या उण्यापुऱ्या पाच वर्षांचा कालावधी या कादंबरीत आहे. या पाच वर्षांतसुद्धा नीता लख्ख डोळ्यांसमोर उभी रहावी असे किती तरी प्रसंग आहेत. 'मम्मी, मला तुला त्रास द्यायला आवडत नाही; पण काय करू? पोटात गेल्याशिवाय मला झोप येत नाही' असं सांगणारी नीता. 'मी बरी झाल्यावर मला दिवाळीला नवीन कापडाची मॅक्सी शीव' म्हणणारी नीता. 'आता मी 'टीन एजर' झाले आहे' म्हणून अभिमानाने सांगणारी नीता. नीताच्या वागण्या-बोलण्यात जीवनाची ओढ होती. तिला जीवन सर्वांगांनी उपभोगायचं होतं. 'माझी नीता'मध्ये उषा सेठ नीताच्या स्वभावाचे बारीक-सारीक कंगोरेसुद्धा कधी सहज, कधी मुद्दामहून तर कधी नकळत उलगडत जातात. आजूबाजूच्या जगाबद्दल नीताला प्रचंड उत्साह होता. आजारपणात वनस्पतिशास्त्रातल्या प्रयोगासाठी तिनं एका कुंडीत वालाचं बी पेरलं होतं. त्यातून उगवलेल्या रोपाचं माप घेऊन ती त्याचा ग्राफ काढत असे. बागेतल्या झाडावर नियमित येणाऱ्या अनेक पक्ष्याचा तिन याच वेळी शोध लावला. मेडिकल, इंजिनिअरिंगचे फॉर्म भरले, आपण डॉक्टर, इंजिनिअर होऊन खूप मोठं सामाजिक कार्य करू अशी ध्येयस्वप्नं पाहिली. शेवटपर्यंत मैत्रिणींच्या आठवणी काढत राहिली. उषा सेठनी या कथेत हे सारं इतकं सरळ मांडलं आहे की वाटत, अरे! ही नीता तर माझ्याही माहितीची आहे, हिचा गोड चेहरा, आनंदी वृत्ती माझ्याही परिचयाची आहे. एखाद्या व्यक्तीचं इतकं जिवंत चित्रण फक्त शब्दांतून दाखवणं ही सोपी गोष्ट नाही. उषा सेठ यानी ते करून दाखवलं आहे. वरवर पहाता वाटेल, त्या तर तिच्री आईच आहेत म्हणूनच त्याना ते जमलं. नंतर विचार केल्यावर जाणवतं की, त्या फक्त आई नाहीत, त्यांची आणि नीताची 'वेव्हलेंग्थ' फक्त आई म्हणून जुळली नाही. आई म्हणजे नीताची जिवाभावाची मैत्रिण आहे!

या कथालेखनाचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे वाचकाला आपल्याबरोबर खेचून नेण्याचं विलक्षण सामर्थ्य या कथेत आहे. नीताच्या रोगाशी, ती घेत असलेल्या कार्टिझोनशी, तिच्या वेगवेगळ्या वैद्यकीय तपासण्यांशी आपण पूर्ण एकरूप होतो. त्यामुळेच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे मन सुन्न होते,

प्रत्येकाने एकदा जरूर वाचावी अशी ही सत्यकथा आहे. वाचताना यातले साहित्यिक गुण लक्षात येतच नाहीत. लक्षात रहाते ती नीता आणि तिची आई! आणि हेच या कथेचं महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. 'माझी नीता', वाचल्यावर नीता 'आपली' होते एवढं सांगितलं तरी पुरे आहे!

—मेधा देशपांडे

माझी नीता
लेखिका—उषा सेठ
पॉप्युलर प्रकाशन
पृष्ठे : १७४, किंमत : २० रु.

## फिनिक्स निवड

**Reminiscences**
Discreet and Indiscreet
T. N. Kaul
(Lancer Publishers,
pages 312, Rs. 115/–)

आलं आहे, फिनिक्समध्ये हे पुस्तक आलं आहे. असं सांगण्याचं कारण असं की, एकदा श्री. ज. म्हणाले होते की, 'फिनिक्स निवड'ची पुस्तके फिनिक्समध्ये नसतातच! (श्री. ज. जेव्हा टोमणा मारतात तेव्हा तो इतका निखालस असतो की, आपण कधीच दुखावत नाही. ना. सी. फडकेंना एकदा कधी कुणी 'थरो जंटलमन' म्हटलं होतं. तसंच मी श्री. जं. ना म्हणेन! श्री. ज. literally grows on you!) या गृहस्थांचं एक वैशिष्ट्य म्हणजे सर्व टाइपच्या माणसांबरोबर त्याचं जमतं!

या पुस्तकाच्या लेखकाचं (T. N. Kaul) लाडकं नाव 'टिक्की!' Tikki has the chomeleon quality of always being able to merge with his background." तसंच श्री. जं. च आहे.

मला श्री. ज. ना असं विचारायचं आहे की, आत्तापर्यंत 'फिनिक्स निवड', 'आमचे ग्रंथालय' 'पुस्तके' वगैरे सदरात 'माणूस' मध्ये गेल्या सहा वर्षात माझे १५० च्या वर लेख आले. यांतील ८० % म्हणजे जवळजवळ १२० लेख आमच्या फिनिक्स ग्रंथालयातील त्या त्या पुस्तकाला चिटकवलेले आहेत. मौजूद आहेत. कुणालाही केव्हाही पाहाता येतील. याचा अर्थ एवढाच होतो की, ही पुस्तके श्री. जं. नी वाचली नाहीत! हे पण तसे सौम्यच विधान आहे म्हणा!

श्री. टी. एन्. कौल यांची Diplomacy In Peace and War आणि The Kissinger Years ही दोन पुस्तके सुद्धा 'फिनिक्स' मध्ये आहेत. श्री. कौल हे रशिया व अमेरिका (USA) या दोन्ही ठिकाणी भारताचे वकील होते. कृष्णमेननसारखे इकडून तिकडे 'जेट–हॉपिंग' करीत होते. 'टाइम' मासिक ज्याला 'Moverick Diplomat' म्हणू शकेल अशापैकी टिक्की आहेत. Unorthodox, Nonconformist वगैरे. १९३० ते १९८१ या काळातील त्यांनी 'इन्साईड स्टोरीज' दिल्या आहेत. सरकारी नोकरी सुटल्यावर पुस्तक लिहिणे हा बहुतेक ICS व डिप्लोमॅट लोकांचा एक आवडता उद्योग असतो. केशव भिकाजी ढवळे यांच्या 'स्टुडंटस् मॉडर्न डिक्शनरी' नुसार डिप्लोमॅटचा अर्थ 'स्वार्थ साधण्यात कुशल' असा होतो. सोहोनीच्या डिक्शनरीत 'चतुर कारस्थानी पुरुष' असा अर्थ दिला आहे. "A diplomat is a man who always remembers a woman's birthday but never remembers her age" असं कोण बरं म्हणालं होतं? मि. मिस्ट का मि. फॉग? थांबा, थाबा! झाली आठवण. रॉबर्ट फ्रॉस्ट, अमेरिकन कवी अस वदला होता. नेहरूंच्या टेबलावर याचीच कविता नेहमी असे. "The woods are lovely, dark and deep. But I have promises to keep And miles to go before I sleep."

डिप्लोमॅटचे हे सर्व गुण टिक्कीमधे आहेत आणि इतरही बरेच आहेत. स्टाईल आहे. तोडात पाईप असल्यामुळे तर ते भलतेच 'पेन्सिव्हल' वाटतात. एरवी तेरवी धूर सोडणे हे विचारवंताचे एक अचूक लक्षण समजलं जातं. शेरलॉक होम्स कोडं सोडवताना कसे पाईप धरत होते? कौल यांचा या पुस्तकातील फोटो बघता अगदी होम्सची आठवण होते!

जेव्हा भारत–चीन युद्ध झाले तेव्हा श्री. कृष्णमेननने रशियाचे त्यावेळचे वकील श्री. बेनेडिक्टोव्ह याना त्यांच्या ऑफिसमध्ये बोलावले व टिक्कीनासुद्धा हजर रहायला सांगितले. श्री. कृष्णमेननना या भारदस्त रशियनाने चांगला प्रतिसाद दिला नाही तेव्हा "तुम्ही वकिलासारखे बोलत आहात" असे मेनन त्याला स्पष्ट म्हणाले. मेननचा स्वभाव नेहरूंपेक्षाही तापट होता हे बहुतेकांना माहित आहेच. रशियाकडून त्यावेळेला मेननना भारतासाठी काही MIG29 विमाने हवी होती. कौल यांनी ही गाथा अर्थात् नेहरूंपर्यंत पोचवली. मेननच्या बोलण्यानं रशियन अस्वल दुखावलं गेलं होतं हे उघड आहे. अर्थात् कौल यांनी लागलीच रशियाला ट्रिप मारली!

रशिया हा एक अती मद्यपी देश आहे. दारूमुळे तिथे दरवर्षी अनेक लोक मरतात. रशियन लोकांचा पेहराव व त्यांच्या चेहऱ्यारील भाव पाहिले की, या लोकांत विनोदबुद्धी आहे असे वाटत नाही; परंतु आपला हा अंदाज चुकीचा आहे हे आपल्याला नंतर कळून येते. कुझनेट्सॉव हे रशियाचे सिनियर व्हाईस फॉरिन मिनिस्टर होते. आता ते व्हाईस प्रेसिडेंट आहेत! त्यांच्या नावाचा अर्थ रशियात लोहार असा होतो. म्हणून त्यांनी नेहरूइंदिरा गांधीना असे सागितले की, त्याला मि. स्मिथ म्हणून हाक मारावी! ज्यांनी ऑपरेशन टायगर हा सिनेमा पाहिला आहे त्यांनासुद्धा रशियन विनोदाची कल्पना येईल. उग्र, भावहीन चेहरे ठेवून विनोद केला की अधिकच हसू येतं. डोस्टोव्हस्कीचं लिखाण बघा. एकोकडे तो खोल विचार मांडत जातो, तर दुसरीकडे त्याच्या लाईन्स व 'बिट्विन द लाईन्स' वाचून सारखं हसू येतं. एकदा चर्चिल म्हणाले होते, "Russia is a riddle covered in mystery, wrapped in enigma!" असं सर्व काही असल्यामुळे गंभीर चेहरा, विनोदबुद्धी वगैरेचं मिश्रण झालं असेल!

या पुस्तकात श्री. कौल हे इंग्लंडमध्ये विद्यार्थी असताना त्यांच्या मोटारीने युरोप ते आशिया प्रवास, काश्मीर, पंजाब, दिल्ली, उ. प्रदेश, दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्योत्तर भारत, रशिया, अमेरिका, चीन, द. आशिया, जपान, ब्रीटन, कॉमनवेल्थ, भारताचे इतर अनेक देशांबरोबर असलेले सबंध व इतर अनेक विषय हाताळलेले आहेत.

मी अलिकडे एका गोष्टीचं निरीक्षण केलं ती ही की, (V) VIP ज्या मेम्वार्स किंवा आठवणी लिहितात त्यात क्लासिक्सचा किंव 'क्लासिक' पुस्तकाच्या लेखकाचा फक्त ओझरता उल्लेख असतो. यावरून अती पॉश खोल्यांतील 'मॅचिंग' कलरच्या पुस्तकाची आठवण येते. VIP नी क्लासिक्स वाचली आहेत हे काय असं जाता जाता सांगायचं असतं? अहो, क्लासिक्स वाचल्याशिवाय का ते VIP होत असतात? जिचकर बघा, माणिकराव भामले बघा! शेवटी एतद्देशीय व वारवार परदेशी जाणारे VIP वेगवेगळे असतात! टिक्कीसारखी मंडळी सुटाबुटात तर हे एतद्देशीय मंत्री कधी गंजीफ्रॉक घालून स्वयंपाकघरात 'Maharashtra's most eligible bachelor' म्हणून वावरतात. त्यातून एखादा 'कोण हा सेनापती बापट? असे विधानसभेत ओरडला तर एतद्देशीय, आपलाच बन्धू म्हणून माफ करायला काय हरकत आहे?

परंतु ह्या परदेशी जाणाऱ्या VIP च्या बाबतीत थट्टा करण्यासारखं फारसं नसतं. हे लोक फाड फाड इटन, हॅरो इंग्रजी बोलणारे. टिक्कीनी तर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये भाषणे ऐकली आहेत! थॉट प्रव्होकिंग मूडमध्ये विमानात पाईप ओढणारे जगातील कित्येक नामांकित व्यक्तीबरोबर बसणारे या पुस्तकात टिक्कीचा एक शेरवानी घातलेला जीना लॉलॉब्रीडाबरोबरचा फोटो तर इतका स्मार्ट आहे की, आपण इकडची cleft बघावी की टिक्कीच्या दाढीवरची cleft बघावी असा आपल्याला प्रश्न पडतो.

एकूण पुस्तक वाचनीय आहे. मधूनच थोडीशी oneupmanship डोकावली तरी ती फॉरीन टाईपची पॉलिश्ड रिफाईन्ड असते, त्यामुळे ती ग्राह्य धरली जाते.


—जे. एन. पोंडा

**गोळेचा खून पूर्वनियोजित होता की
तो दैवी चमत्कार होता ?
निकालाचा दिवस उजाडला. कल्पनाला
निकालापूर्वी काही सांगायचं होतं.
कल्पना सांगत होती, लोक चक्रावले होते.
कल्पना आता भसाडच्या आवाजात
हसत सुटली !
तो हर्षवायू ऐकवत नव्हता....**

# सबला

**: पाच :**

**माधव शिरवळकर**



अर्जुन गोळे खूनखटला जेव्हा सेशनकमिट झाला तेव्हा बरीच खळबळ उडाली. नवनाथमठाचे काही सेवाभावी आणि देव-भोळे कार्यकर्ते, शिवाय साठ–सत्तर प्रवचनी म्हाताऱ्या, चाळीस–पन्नास पेन्शनर्स आणि इतर थातुर-मातुर मंडळींनी एक छोटासा मोर्चा काढला आणि तो न्यायाधिशांच्या निवासस्थानावर नेला. ह्या खटल्यात कल्पनाला फाशी होऊ नये, आध्यात्मिक दृष्टिकोनातून खटल्याचा विचार व्हावा, त्याचप्रमाणे ह्यात व्यक्तिशः कल्पना ह्या स्त्रीचा कोणताही दोष नाही वगैरे त्यांच्या मागण्या आणि सांगणं होतं. न्यायमूर्तींनी ह्या मोर्चाचं तोंड पहायचंही नाकारलं म्हणून मोर्चानं त्यांच्या धिःकाराच्या घोषणा दिल्या. न्यायाधीशमहाशयांच्या बंगल्याबाहेरच त्यांनी एक गेट-मीटिंग घेऊन कल्पना देसाई निर्दोष सुटण्यासाठी जनतेने आंदोलन करून दबाव आणावा अशा तऱ्हेची भाषणे केली. वर्तमानपत्रांनी ह्या किरकोळ मोर्चावर कडाक्याची टीका केली. न्यायासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मोर्च्यावर त्यांनी कोरडे ओढले.

□

त्या साक्षी, त्या बातम्या, तो मोर्चा, त्या लोकांच्या चर्चा हे सारं पाहून श्यामकांत वेडाच्या पायरीकडे वळू लागला होता. त्याचा मानसिक तोल आता ढळू लागला होता. पोस्टात काम करताना आतल्या–बाहेरच्या लोकांच्या नजरा त्याला टोचत होत्या. कोपऱ्या-कोपऱ्यावर चर्चा करणारे घोळके लांब–लांबून त्याच्याकडे बोटं दाखवत होते. 'तो बघा चाललाय ना, तो नवरा हो त्या बाईचा !' असं बायका एकमेकींना दाखवत होत्या. जग्गू चाकूवाल्याची साक्ष म्हणजे त्याच्यावर फार मोठा आघात होता.

तो सतत विचार करत होता. जग्गू चाकूवाला शपथेवर खोटं बोलत असेल काय ? की खरंच कल्पनानं चाकू घेतला त्याच्याकडून ?

श्यामकांतला आता हे अपराधी जिणं अशक्य होत चाललं होतं. त्याच्या घरात कित्येक दिवस स्वच्छतेचा हात फिरलेला नव्हता. दोन्ही खोल्यांतून प्रचंड अडगळ झालेली होती, धूळ साठलेली होती. श्यामकात तिथंच हात झटकून त्या नेहमीच्या खाटेवर खिन्न मनानं पडत होता. स्वतःला सारखा पोखरत होता. नीलू मात्र नाथाकाकाकडे मजेत होती.

¤

साक्षीवर साक्षी होत राहिल्या. जग्गू चाकूवाला, चाकूला दोन्ही बाजूंनी धार लावणारा धारवाला, इन्स्पेक्टर आचार्य, प्रत्यक्ष खून आणि प्रचिती ज्यानी पाहिली असे काहीजण, प्रचितीमागे कोणती मुक्ती असू शकेल हे प्रात्यक्षिकासह दाखवणारा धंदेवाईक जादूगार, लीलाबाई बढे, मठाचे उपाध्यक्ष, खुद्द श्यामकांत, श्रीयुत सातोस्कर अशा सर्वांच्या साक्षीनी खटल्याला आकार मिळत होता. वर्तमानपत्राची पानं भरत होती. निकालाचा दिवस जवळजवळ येत चालला होता.

¤

श्यामकांताचं चित्त थाऱ्यावर नव्हतं, जग्गू चाकूवाल्याची ही साक्ष आणि सुऱ्यावरची 'डीलक्स' ही अक्षरं यानी तो वेडा झाला होता. पोस्टातली त्याची हजेरी रोडावली होती. जीवनात अनियमितपणा आला होता. त्याला ह्या खटल्यातलं सत्य जाणून घ्यायचं होतं. प्रचितीनं निधालेल्या सुऱ्यावर 'डीलक्स' ही अक्षर कशी हे जाणून घ्यायचं होतं. खटल्याच्या शेवटी-शेवटी त्याला उगाचच वाटू लागलं होतं की, कल्पनान काही तरी लपवलंय. श्यामकाताला ते जाणून घ्यायचं होतं. जं इन्स्पेक्टर आचार्यांना इंट्रोगेशनरूममध्ये जमलं नाही ते श्यामकांताला सहज जमणारं होतं. कारण–

कारण श्यामकात कल्पनाला नीलूची शपथ घालणार होता. सत्य जाणून घेण्यासाठी कल्पनाच्या मनात नीलूचे प्राण तो गहाण ठेवणार होता. नाक दाबल्यावर तोड उघडणार होतं !

¤

संतोष आगरवालला कल्पनाच्या वकिलाचं भाषण फार आवडलं. त्याच्या मते कल्पनाच्या वकिलाच्या भाषणामुळेंच कल्पना निर्दोष सुटणार होती कल्पनाच्या विरुद्ध कोर्टात आलेले पुरावे किती पोकळ आणि निराधार आहेत याचं उत्तम स्पष्टीकरण वकिलानं केलं होतं. जग्गू चाकूवाल्यासारख्या कित्येक साक्षी त्यानं 'भोंगळ' म्हणून बाजूला फेकल्या होत्या.

कल्पनाच्या वकिलाचा भर गोळेच्या वागणुकीकडे होता. भरपूर कष्ट घेऊन त्यानं माहिती मिळवली होती. कुठल्याशा डिटेक्टिव्ह एजन्सीचं सहकार्य त्यानं त्यासाठी घेतलं होतं. ऑफिसातल्या एका मुलीचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून गोळेला मिळालेली वॉर्निंग लेटर्स त्यानं कोर्टाला पेश केली. गोळे जुगारी, दारुबाज होता, वासनाध होता, त्याच्या पूर्वीच्या नास्तिकतेत तो देवाधर्माबद्दल किती अचकट-विचकट ओंगळ बोलायचा, स्वत:च्या पापांची कशी शेखी मिरवायचा आणि ह्या मगरुरीचं प्रायश्चित्त त्याला देवीच्या पायाशी कसं मिळालं हे त्यानं प्रभावीपणे पटवलं होतं. निदान उपस्थितांना तरी ते पटलं. शेवटी शेवटी त्यानं स्वत:च्या घरात बसवून घेतलेला देव्हारा हे गोळेला त्याच्या पापांची भीती वाटू लागल्याचं लक्षण होतं. इथंही वकिलानं कोर्टाचं लक्ष वेधलं.

चाकूचा मुद्दाही त्यानं खोडून काढला. तो म्हणाला, 'युवर ऑनर, एका चाकूसाठी दैवी मायेला स्वत:चा चाकूचा कारखाना उघडण्याची आवश्यकता नव्हती. प्रचितीतून आलेला चाकू हा जगावेगळा दैवीच असला पाहिजे असा निकष आणि आग्रह धरता येणार नाही. जी शक्ती सबंध जगावर ताबा ठेवून आहे आणि ज्या शक्तीमुळं सृष्टीतील कारभार काही नियमानं चाललेला आहे त्या शक्तीला ह्या जगातील एखादी गोष्ट इकडची तिकडे करण अवघड का आहे ? तो चाकू भले डीलक्स असेल; पण त्याच्या स्टोअरमधला एक चाकू हवेतून नवनाथाच्या मठात हलवण्याइतकी ताकद आमच्या हिंदू देवदेवतांमध्ये निश्चितच आहे !' कल्पनाच्या वकिलानं अशा तऱ्हेनं चाकूच्या मुद्द्याला आणखी वेगळीच कलाटणी दिली. त्यानं स्पष्ट सांगितलं, 'देवीच्या कोपामुळं अर्जुन गोळेचा वध झालेला आहे. त्याच्या पापाचं फळ त्याला मिळालेलं आहे. ह्यात आपल्या अशील कल्पना देसाईचा काहीही दोष नाही ! त्याना ह्यातलं खरोखरीच काहीही माहीत नाही. त्याना शिक्षा होता कामा नये, त्या निर्दोष आहेत !'

कायद्याचाही त्यानं कीस काढला. इंडियन पीनल कोडाच्या २९९ किंवा ३०० ह्या कलमात असलेल्या 'कल्पेबल होमीसाईड' आणि 'मर्डर' ह्याच्या व्याख्येत अर्जुन गोळेचा वध बसत नाही. कारण कल्पना देसाईंना त्या वेळी आपण काय करीत आहोत ह्याचं ज्ञान किंवा knowledge नव्हतं. ह्या दोन्ही व्याख्यांमधला knowledge हा शब्द अतिशय महत्त्वाचा असल्याचं त्यानं कोर्टाला सांगितल. मुळात हा खून किंवा मानवी हत्या नव्हेच अस कायदेशीर प्रतिपादन तो करीत होता. त्या वेळी कोर्टानं काही तरी नोंद घेतली.

संतोष आगरवालनं कोर्ट उठल्यानंतर कल्पनाच्या वकिलाची भेट घेतली आणि त्याचं मन:पूर्वक अभिनंदन केलं. कल्पना निर्दोष सुटणार ह्यात त्याला मुळीच शंका वाटत नव्हती. त्यानं श्यामकातालाही सांगितलं, 'साहेब, काळजी करू नका, बाई सुटणार ! भगवान के घरमें देर है अंधेर नही !'

¤

सरकार पक्षाच्या वकिलाचं भाषण श्यामकाताला फार लागलं. तेही तितकच प्रभावी होतं. त्यानं कल्पनावर प्रचड झोड उठवली. तिला 'पक्की बनेल बाई' असं विशेषण दिलं. तो सुरुवातीलाच म्हणाला, 'कायद्याला वास्तवापासून दूर पळताच येत नाही. पाण्याशिवाय जसा मासा जगू शकत नाही तसा वास्तवाशिवाय कायदा अस्तित्वात असूच शकत नाही.' कल्पनाच्या अंगात येण्याला त्यान 'एक ढोंगबाजी' अस शीर्षक दिलं. 'ह्या ढोंगबाजीचा आधार घेऊन केलेला हा पूर्वनियोजित निर्घृण खून' आहे अस तो म्हणाला.

जग्गू चाकूवाल्याची साक्ष त्यानं उचलून धरली. त्या चाकूला

**ढोंगबाजीचा आधार घेऊन केलेला पूर्वनियोजित खून...सरकारी वकील**

दोन्ही बाजूंनी तीक्ष्ण धार लावणारा धारवाला, त्यानं ओळखपरेड-मध्ये चाकू ओळखणं वगैरे मुद्दे त्यानं पुन्हा पुन्हा कोर्टापुढे ठसवले. डीलक्स कंपनीच्या स्टोअरमधून एक चाकू हवेतून नवनाथाच्या मठात येऊ शकतो ह्या कल्पनाच्या वकिलाच्या प्रतिपादनाला विनोद असं नाव त्यानं दिलं. कोप, वध वगैरे शब्द म्हणजे मूर्खपणा आहे असं तो म्हणाला.

कल्पनाच्या वकिलांना सडेतोड प्रश्न करीत सरकारी वकील आवेशानं म्हणाला, 'माणसाला त्याच्या पापाचं प्रायश्चित्त देण्याचा हा दैवी प्रकार अभूतपूर्व न भूतो न भविष्यती' असा आहे. दैवी शक्ती सार्वभौम अशी जर होती तर प्रत्यक्ष खून करण्याची गरज तिला का भासली? गोळेला चालता चालता जाळून भस्म करण्याची शक्ती तिच्यात नव्हती?'

सरकारी वकिलानं एरणगाव प्रकरणचाही उल्लेख केला. त्या प्रकरणानंतर देसाई कुटुंबाचं तातडीनं मुंबईला निघून येणं आणि बदली करून घेणं ह्याला त्यानं 'अर्थपूर्ण' असं विशेषण दिलं. बाई काय मनोवृत्तीची आहे हे सिद्ध करण्याचा त्यान प्रयत्न केला. खुनाच्या दिवसानंतर कल्पनाचं अंगात येणं बंद व्हावं ह्याला त्यानं 'साहजिकता' असं म्हटलं.

खुनाचा हेतू काय हे सांगताना तो म्हणाला, 'ह्यात पैशाच्या देवाण-घेवाणीचा व्यवहार गुंतलेला आहे. गोळेचं सतत वसुलीसाठी घरी येणं असह्य झाल्यामुळं आणि त्यामुळं नवरा दिवसेंदिवस व्यथित होत चालल्यामुळं पद्धतशीर योजना आखून जाणीवपूर्वक केलेला हा खून आहे!' सरकारी वकिलांनी हे प्रतिपादन पुन्हा पुन्हा केलं.

सरकारी वकिलानं एक मुद्दा सोडला. प्रचितीचा चाकू एकदम हातात कसा आला हे मात्र त्यानं स्पष्ट केलं नाही. ह्या बाबतीत फक्त त्यानं कल्पनाला दोष दिला. कबुलीजबाब टाळून सत्य लपविण्याचा तिच्यावर आरोप केला. जादूगार साक्षीदारानं दाखवलेल्या दोन-तीन युक्त्यांपैकी कोणती तरी एक तिनं वापरली असावी अशी शंका व्यक्त केली.

सरकारी वकिलाचं भाषण ऐकून लीलाताई बढे फार चिंताक्रांत झाल्या. कल्पनाच्या वकिलाला जाऊन भेटल्या. कल्पनाचा वकील म्हणाला, 'बढेआजी, एक गोष्ट लक्षात ठेवा. शक्यता, शंका म्हणजे संशय आणि संशयाचा फायदा नेहमी आरोपीलाच मिळत असतो! तुम्ही काळजी करू नका. बाई सुटताहेत. त्यांच्या स्वागताची तयारी करा!'

¤

सरकारी वकिलाचं भाषण ऐकताना श्यामकांत थरथर कापत होता. त्यानं मांडलेला तर्कवाद हृदयावर गोंदवून घ्यावा तसा त्याला टोचत होता. त्यानंतरचे काही दिवस श्यामकांत तापानं आजारी पडला. अन्नपाण्यावरची त्याची वासनाच उडाली. एकट्यानं स्वतः-शीच काही तरी बडबडल्यासारखे त्याच्या ओठातून आवाज बाहेर पडत. मानसिक आणि शारीरिक अशक्तपणानं त्याला घेरलं होतं.

त्या दिवशी भर तापाचा तो धडाधडा पावलं टाकीत कल्पनाच्या जेलकस्टडीकडे निघाला होता. त्याचे डोळे किंचित लाल झाले होते. खरं तर त्याला बेडवर पडून राहाण्याची डॉक्टरांची सक्त ताकीद होती; पण नाथाकाका काही कामासाठी बाहेर पडल्यानंतर काकूंच्या नकळत कपडे चढवून तिरीमिरीनं तो बाहेर पडला. कल्पनाकडून 'सत्य' जाणून घेण्याच्या निश्चयानं तो निघाला. घरून निघताना आपल्या मुठीत त्यानं नीलूची शपथ धरली होती. ती मूठ तो कल्पनाच्या पुढं उघडणार होता.

'तुम्ही?' कल्पनानं किंचित चमकून विचारलं.

'हो, मी!' श्यामकांत ठामपणे म्हणाला.

'काय अवस्था झालीय ही तुमची?'

'.........'

'एकटेच आलात?'

'.........'

'बोलत का नाही तुम्ही?'

'कल्पना, मला खरं सांग. ह्या खटल्यात तू कितपत दोषी आहेस? खरं सांग! माझं डोकंच फिरून गेलं आहे साफ!'

श्यामकांत येवढं बोलून थकून गेला. वाढलेल्या दाढीच्या खुंटातून एक बारीकसा घर्मबिंदू ओघळला.

'नाही हो, मी निर्दोष आहे, अगदी निर्दोष! ह्यातलं काहीच, खरंच काहीच माहीत नाही मला!'

'कल्पना, आपल्या नीलूची शपथ आहे तुला! ह्यामध्ये काही लपवलं असशील तर कोर्टाला सगळं खरं खरं सांगून टाक. काय व्हायचं ते होवो मग. तो कोर्टाचा कारभार पाहून मी मनस्वी गुदमरून गेलोय! असच चालू राहिलं तर एक दिवस मीच···'

'नाही नाही, असं बोलू नका!' कल्पनाच्या डोळ्यातून एक टीप बाहेर पडलं. 'कशाला मला नीलूची शपथ घातलीत तुम्ही?' असं म्हणून ती हमसून हमसून रडू लागली.

'त्या शपथेची आठवण ठेवून कोर्टाला सत्य काय ते साग. मी जातो!' एवढं बोलून श्यामकांत विक्षिप्तासारखा ताडताड निघून गेला! घरी जाऊन तो पुन्हा पलंगावर पडला तेव्हा दाढीच्या खुटातून टिपकलेला एक घर्मबिंदू वाळून गेला होता. त्याचा ताप एका डिग्रीनं वाढला होता. श्यामकांतला ग्लानी आली. तो मलूल पडून राहिला. नीलू शाळेत गेली होती.

¤

कोठडीतल्या सावली–उजेडात कल्पना कोरड्या डोळ्यानं बसली होती. आता तिच्या हृदयात तशी तगमग होत नव्हती. नेहमीसारखा जीव कासावीस होत नव्हता. डोळ्यांत अश्रू तरळत नव्हते. कसलीही भीती वाटत नव्हती. आठवणी सतावत नव्हत्या. डोकं चढत नव्हतं. ग्लानी आल्यासारखं पसरून पडून रहावं असं वाटत नव्हतं. विचार करताना दमून गेल्यासारखं वाटत नव्हतं. श्यामकांत नीलूची शपथ घालून गेला होता तरी!

तिच्या डोळ्यांसमोर एक एक चित्र फिरत होतं. दिवाळीच्या कंदिलात तीच तीच चित्रं दिसतात तसं त्याचं स्वरूप नव्हतं. एखादं चित्रांचं रीळच्या रीळ उलगडावं तशी ती चित्रं होती. निर्जीव, निरुपद्रवी चित्रं. त्यात श्यामकांताचंही चित्र होतं. नीलूची शपथ घालतानाचं. विक्षिप्तासारखं निघून जातानाचं.

त्या चित्राकडे पहात कल्पना विचार करीत होती. ही चित्रं कोर्टात उघडी करायची का? त्या सत्यानं कोर्टाचा नेमका काय फायदा होणार आहे? श्यामकांताला–आपल्या नवऱ्याला–कोणतं समाधान

मिळणार आहे? त्याचा आपल्या स्वत.वर काय परिणाम होणार आहे?

हे सर्व विचार निर्विकार वाऱ्यासारखे कल्पनाच्या मनात भिरभिरत होते.

तिच्या मनात दडलेलं सत्यही तसंच भयानक होतं. ते कोर्टापुढं उभं केल्यावर कसं दिसेल याची तालीम, कल्पना आपल्या मनात करीत होती. लांब गजाची कोठडी निर्धास्तपणे आपल्या सावल्या सांभाळून होती.

¤

त्या सत्याचं बीज त्या एक हजार रुपयांच्या चवडीतून, त्या सिनेमाच्या बॉक्समधून, त्या अमेरिकन जॉर्जेटसाडीमधून, त्या देव्हाऱ्यातून, त्या सुदरलाल सेठच्या वाड्यातूनच फेकलं गेलेलं होतं.

¤

कल्पनाकडून घेतलेल्या अंगाऱ्यामुळं सहानी जुगार जिंकतो हे पाहिल्यावर नास्तिक मनाच्या गोळेनं प्रयोग करायचा म्हणून अंगाऱ्याची पुडी घेतली आणि तो ताज क्लबमध्ये 'तीन पत्ता' खेळायला गेला. ताज क्लबमध्ये तो प्रथमच जात होता. सहानीशी झालेल्या भांडणामुळं त्याला सपना क्लबमध्ये तोंड दाखवता येत नव्हतं.

त्या रात्री गोळे ताज क्लबमध्ये पाच हजार रुपये हरला! मोठ्या हुशारीत नोटांची चवडच्या चवड फेकणाऱ्या गोळेच्या खिशात सकाळी खेळ संपताना सुट्ट्या पैशांची चिल्लरच फक्त वाजत होती. त्या चिल्लरखाली दडली होती एक अंगाऱ्याची पुडी, जिचा मोठा उदो-उदो सहानीनं केला होता.

त्या सकाळच्या सूर्योदयाला रात्रभर जागलेल्या गोळेनं एक अतिशय घाणेरडी शिवी दिली आणि 'धिस ब्लडी शीट!' असं म्हणून ती अंगाऱ्याची पुडी त्यानं खाली वाहणाऱ्या गटारीत ओतून टाकली होती. गोळेची त्या अंगाऱ्यावरची सूडबुद्धी मग विलक्षण उफाळून आली. बॉक्समध्ये झालेला तो अपमान आठवला. त्याची नास्तिकता आता गलिच्छ गटारातून वाहू लागली होती. त्याच दिवसापासून त्याचं आस्तिकतेचं ढोंग सुरू झालेलं होतं. गोळे नियमितपणे दर शुक्रवारी कल्पनाचं दर्शन घेऊ लागला होता. तिचं निरीक्षण करू लागला होता.

अशाच एका शुक्रवारी कल्पनाकडे रोखून पहात असताना त्याची आणि तिची दृष्टादृष्ट झाली. कल्पनानं आपली पापणी खाली केल्याचं जेव्हा त्यानं पाहिलं तेव्हा विलक्षण लालसेनं तो तेथून निघाला. त्याच रात्री त्याचा देव्हाऱ्याचा विचार नक्की झाला. पुढच्या काही तासांतच त्यानं काळा शिसवी आणि प्रशस्त देव्हारा आणवून घेतला. दिडक्या मोजून विकत घेतलेले देव त्यानं त्याच्यात मांडले आणि वर बिनवासाची फुलं विखरून त्यानं श्यामकांतला पोस्टात फोन लावला.

देव्हाऱ्याची पुढची पायरी गाठण्यासाठी गोळेनं फार वेळ दवडला नाही. आपल्या लाघवी आणि सरावलेल्या बोलण्यानं त्यानं श्यामकांतला घराला रंग लावण्याची आवश्यकता पटवून दिली. त्याच शुक्रवारी कल्पनानं आपल्या घरी येऊन आपल्या देव्हाऱ्यासमोर बसावं हेही गोळेनं त्याला सुचवलं. ह्या गोष्टीला कदाचित कल्पना तयार पण होणार नाही म्हणून आपण गावाला जात आहोत आणि आपल्या घरात त्या वेळी कोणीच नसेल ही थाप त्यानं श्यामकांतला मारून ठेवली. सर्वांचा परिणाम म्हणजे त्या दिवशी रंगकामाकडे लक्ष देत श्यामकांत घरातच थांबला. कल्पना आणि बढेआजी सकाळपासून चावी घेऊन गोळेच्या घरात येऊन हजर झाल्या.

त्या दिवसभर गोळे जुगाराच्या अड्ड्यांत रमी खेळत राहिला. "रमीतला मायनस टर्नओव्हर म्हणजे जनता टर्नओव्हर" हे गोळेचं नेहमीचं वाक्य होतं. दुपारी साडेतीन वाजता तो रमीक्लबच्या बाहेर पडला. चार वाजताच एक इंग्रजी शो त्यानं अर्धवट पाहिला आणि तेथून सात वाजण्याच्या सुमारास बाहेर पडून साडेआठच्या सुमारास तो पुन्हा आपल्या वाड्यात शिरला. त्या वेळी बढेआजी झाडांच्या कळ्या काढत होत्या. गोळे गावाला न जाता परत आलेला पाहून त्यांना तेव्हा आश्चर्य वाटलेलं होतं. गोळेनं त्यावर सारवासारव केली होती. सातोस्करकाकूकडे बढेआजीना कोणी तरी बोलावलंय ही थाप त्यानं सहज सोडून दिली होती. ते खरं वाटून बढेआजी झटकन वाड्याबाहेर पडून, बस पकडून निघून गेल्या होत्या.

बढेआजीना कटवण्यामागं गोळेची तोपर्यंत निश्चित आखलेली अशी काहीच योजना नव्हती. वाड्यात त्या वेळी विशेष कोणी नव्हतं. सुदरलालशेठकडे कोणाचा आवाज येत नव्हता. त्याच्या खोलीत कल्पना एकटीच बसलेली आणि आजूबाजूला कोणीही नाही, हे पाहिल्यावर बढेआजीनाही फुटवावं असा सहज विचार गोळेला सुचला. त्यानं तो पार पाडला.

बूट काढून, पाय धुऊन गोळे घरात गेला तेव्हा समईच्या उजेडात ध्यानमग्न कल्पनेचा चेहरा उजळून गेलेला होता. त्या चेहऱ्याकडे पाहून मनातल्या मनात गोळेनं मिटक्या मारल्या. तिला एकटी पाहून त्याच्या मनात अस्वस्थतेच्या लाटा उठू लागल्या. तेवढ्यात बाहेर बागेत माजराचा मियांव मियांव असा जोराचा आवाज ऐकू आला. सुदरलालशेठची मांजरी बहुधा दूध पिऊन बाहेर पडलेली होती. त्या आवाजाचा त्रास होऊन गोळे आपल्या खोलीतून बाहेर वऱ्हाड्यात आला. त्याला मांजरी कुठेच दिसेना. त्यानं आवाजाकडे स्वत.ची नजर फेकली, तेव्हा मांजरीचे दोन्ही डोळे अंधारात चकमकत होते. त्या चमकणाऱ्या डोळ्यांकडे काही क्षण थिजून गेल्यासारखा गोळे पहात राहिला. त्याला त्या वेळी एक भयानक कल्पना सुचली होती. श्यामकांताच्या संशयातल्या सत्याचं बीज इथं रुजू लागलेलं होतं.

त्या भयानक कल्पनेनं भारून गेल्यासारखा गोळे प्रथम घरात गेला आणि देव्हाऱ्यापुढच्या समईतल्या ज्योती त्यानं फुंकर घालून मालवल्या. कल्पना त्या वेळी डोळे मिटून शांत घुमत होती गोळे आता दुसऱ्या कामासाठी पुन्हा वऱ्हांड्यात आला. वाड्यात तशी सामसूम होती. सुदरलालशेठकडे काही हालचाल ऐकू येत नव्हती. बहुधा शेठ बाहेर गेलेला होता. शेठाणी कदाचित एकटीच पोथी वाचत बसलेली होती. गोळे झपाट्यानं इलेक्ट्रिक स्विच बॉक्सकडे

**त्या भयानक कल्पनेने गोळे भारून गेला....**

गेला आणि संपूर्ण वाड्याचा मेन स्विचच त्यानं ऑफ केला ! वाडा काळोखात बुडून गेला. गोळे झपाट्यानं पळाला. आपल्या खोलीचं बाहेरचं दार बंद करून तो आत गेला. डोळे मिटून बसलेल्या कल्पनाला काळोख झाल्याचं चटकन कळलं नाही. गोळेनं सरासरा जाऊन कल्पनाचा दंड हलवला. कल्पनानं डोळे उघडले सभोवताली पसरलेला काळोख पाहून ती एकदम घाबरून ओरडली. आपला हात कोण ओढतंय हे तिला कळेना.

"अरे वा रे वा ! देवी घाबरते काय अंधाराला ? साली ढोंगं सगळी !" गोळे दातओठ खात म्हणाला.

"सोडा, सोडा मला. मला जाऊ द्या !" कल्पना म्हणू लागली.

"जायचंय तुला ? जा ना. मी कुठं अडवलंय तुला ? जा ऽबाई जा ऽऽपण लक्षात ठेव एक गोष्ट!" गोळे करड्या आवाजात बोलला. "तुझ्र अंगात येणं कळलंय मला. उद्या मी दुनियेला ते उघडं करून दाखवीन. मग लोक थुकतील तुझ्यावर ! चीटिंगचा, फसवणुकीचा आरोप येईल तुझ्यावर. तुझ्या नवऱ्यावर सगळे थुकतील बाहेर तोंड दाखवायला जागा नाही उरणार कुठे !" गोळे एकामागे एक त्वेषानं बोलत होता. अंधारात दोघांनाही एकमेकांची तोंडं दिसत नव्हती. फक्त आवाजानं ते चेहऱ्यावरचे हावभाव जाणत होते.

"नाही नाही. असं करू नका. मला जाऊ द्या जाते मी !" कल्पना बोलली.

"जातेस कुठं ? तुझं हे रहस्य न फोडण्यासाठी मला काही किंमत द्यावी लागेल तुला !"

"देईन, काय देऊ ? किती पैसे देऊ बोला !" कल्पना अधीरपणे म्हणाली.

त्यावर गोळे खुदकन हसला. म्हणाला, "बाई, मला फक्त तूच हवीयस. बाकी तुझ्या अंगावरची एक चिंधीसुद्धा नकोय मला ! कळलं ?'

कल्पनावर आभाळ कोसळलं ! उमलतं फूल खटकन गळून पडावं तशी तिनं मूकपणे मान टाकली.

गोळे दबल्या आवाजात म्हणाला, "तुझं रहस्य फुटणार नाही याची नीट काळजी मलाच घ्यायला लागणार आहे, लक्षात घे ! उद्या दुपारी तीन वाजता ये माझ्या घरी ! मी वाट पाहीन. आली नाहीस तर लक्षात ठेव हुकमाचे पत्ते माझ्या हातात आहेत !"

गोळे एवढंच बोलला आणि पुन्हा मेनस्विचकडे धावला. सुंदरलालशेठच्या गॅलरीत बरीच गडबड झाली होती. गडी, नोकर गोंधळले होते. गोळेनं स्विच ऑन केल्यावर वाडा पुन्हा प्रकाशमान झाला. शेठच्या गॅलरीतली गडबड थांबली. मेनस्विचमुळं लाइट गेले होते ही गोष्ट कोणालाच कळली नाही !

त्या दिवशी रात्री गोळे स्वतः टॅक्सीनं कल्पनाला तिच्या घरी पोहोचवून आला; पण तो आल्या टॅक्सीनं तसाच परत गेला.

¤

कल्पनाच्या 'ह्या' अंगात येण्यामागं अनेक गोष्टींची पार्श्वभूमी होती. त्यात कर्णिकबाईंचा नवा फ्लॅट होता, नीलूला नवी मोटार घ्यायची इच्छा होती, श्यामकांताला करावी लागणारी असह्य काटकसर होती, श्यामकांताचा आर्थिक काळजीन ग्रासून जाणारा चेहरा होता, अशा अनेक गोष्टी होत्या. मुख्य म्हणजे सातोस्करकाकूंचा वाडा होता. त्यांची मुक्तेश्वरीदेवी होती. देवळाच्या पेटीत पडणारे पैसे होते, सातोस्करकाकूच्या ओटीत येणारी पातळं, नारळ होते, ह्या सर्वांवर कडी म्हणजे कल्पनाचं अफाट धाडस होतं !

आर्थिक अडचणीला वैतागलेल्या कल्पनाला नोकरी करण्याची, पगार मिळवण्याची, हौसमौज करण्याची इच्छा होती, आवड होती. ह्या आवडीवर तिला बंधन घालावी लागत होती. नीलूचे लाड न पुरवता आल्यानं ती चरफडत होती. पुरेशा पैशाअभावी कुटुंबाचं हरवलेलं सुख तिला परत मिळवायचं होतं. त्यासाठी आर्थिक स्वास्थ्य आवश्यक होतं. त्यासाठी कल्पना नेहमी अस्वस्थ रहायची. मनातल्या मनात तरफडत रहायची. देसाई कुटुंबातल्या स्त्रीनं नोकरी करावयाची नाही हा त्यांचा पायंडा श्यामकांतानं स्पष्ट सांगितल्यामुळं कल्पनापुढचा तो मार्ग बंद होता.

ह्याच अस्वस्थतेनं बढेआजीबरोबर सातोस्करकाकूंच्या घरी ती गेली असताना त्यांची तशा प्रकारची 'मिळकत' पाहून कल्पना प्रभावित झाली. तिला मनातल्या मनात तो मार्ग आवडला. ती वारंवार सातोस्करकाकूंकडे जात राहिली. त्यांचं निरीक्षण करत राहिली. त्या धंद्यातल्या एकूणएक मख्ख्या तिनं स्वतःच्या स्वतःच जाणून घेतल्या. एका नवरात्रात स्वतःच्या खोटंच अंगात आणून तिनं ह्या धंद्याचं उद्घाटन केलं. फक्त एक घागर फुंकली आणि माणूसपण हरवल्यासारखी ती त्यातच नाचत राहिली ! महालक्ष्मीचा मुखवटा तिनं चढवला. तोंडाला येईल ते, मनाला वाटेल ते बोलत राहिली, त्यातून ज्यांचा फायदा झाला ते पुन्हा पुन्हा येत राहिले. कल्पनाची ख्याती वाढतच राहिली. दर शुक्रवारी कल्पनाच्या डोळ्यांसमोर होता तिचा संसार, तिचा नवरा आणि लाडकी पोर नीलू. त्याच 'इरीशिरीनं' तिला हा धंदा जमू दिला होता.

¤

गोळेनं त्या रात्री दिलेला दम कल्पनाच्या वर्मी लागला होता. दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता गोळेकडे जाऊन त्याला सर्वस्व अर्पण करायचं होतं. जे तिनं बॉक्समध्ये वाचवलं ते गोळेच्या घरात उध्वस्त होणार होतं. गोळे ते हक्क सांगून उध्वस्त करणार होता. त्याच्या त्या कृत्याला नाइलाजानं का होईना कल्पनाला हसून मान हलवावी लागणार होती. गोळेनं बरोबर डाव साधला होता ! ती रात्र कल्पनाला झोप नव्हती. उरात प्रचंड धडकी भरलेली होती. उद्या दुपारी तीन वाजता काय करायचं ? जायचं की नाही जायचं ? गेलो तर आपण उध्वस्त होतोय, नाही गेलो तर आपल्यासकट आपलं कुटुंब बदनाम होतय. आपल्या अंगात आपण खोटं आणतो हे नाथाकाका आणि काकूंना कळलं तर त्यांना काय वाटेल? आपला नवरा काय म्हणेल ? थाळीत जमणारे पैसे आपण जिच्या नावावर दरमहा पोस्टात टाकतो ती नीलू मोठी झाल्यावर आपल्या बदनाम आईला काय म्हणेल ? आपल्याकडे येणारी भक्तमंडळी आज फुलं घेऊन येतात तेच उद्या आपल्याला दगडान ठेचायला निघतील चाळीत किती छी:थू होईल ! फसवणुकीच्या आरोपावरून आपण पकडले जाऊ. गोळे हीच मजा पहात राहील !

कल्पनाचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. सकाळपर्यंत ती कसलाही निर्णय घेऊ शकली नाही. सकाळी तारवटल्या डोळ्यांनी उठून तिनं चहा केला. श्यामकांत पोस्टात निघून गेला. तिच्या डोक्यातली ती समस्या

अशी विचित्र होती की, कल्पनाला बढेआजीनाही सल्ला विचारता येत नव्हता. तिच्या सर्वस्वाबाबतचा निर्णय फक्त तिचा तिलाच करावा लागणार होता. दोन रस्ते स्पष्ट दिसत होते. गोळेकडे जाणं आणि न जाणं!

तासावर तास पडत गेले. अडीच वाजता थरथरत्या पावलानी कल्पना बाहेर पडली. गोळेच्या घराची वाट चालू लागली. गोळे घरीच बसला होता. कल्पनाची वाट पहात होता. कल्पनाला गेट सरकवून आत वाड्यात शिरताना पाहून त्याला गुदगुल्या झाल्या. कल्पना निमूटपणे आत आली. गोळेनं तिला आत बोलवल. काळा शिसवी देव्हारा एखाद्या अडगळीसारखा बाजूला सरकवला. एक चांगला गुबगुबीत डबलबेड त्या दिवशी सकाळीच गोळेनं खरेदी केला होता. बिचाऱ्या देव्हाऱ्यानं त्या डबलबेडला जागा करून दिली होती!

गोळेनं सांगावं, वेळ ठरवावी, कल्पनानं यावं हे डबलबेडला आता नेहमीचं झालं होत. गोळे आता खुशाल होता. बॉक्समध्ये हृयाच कल्पनानं केलेला अपमान आता धुऊन निघत होता. गोळेचा सूड हळूहळू निवत होता. लालसा मात्र भडकत होती. कल्पनाचं मन त्यात करपत चाललं होतं. श्यामकांत आणि एकंदर जगाच्या नकळत घडलेल्या तिच्या आयुष्यातल्या अशा घटना तिच्या हृदयात ठासून-ठासून भरल्या जात होत्या. त्याचं ओझं फक्त ती एकटीच वाहत होती. श्यामकांताबरोबर बाजेवर पडताना स्वतःच्याच मनावर ती बलात्कार करत होती!

¤

गोळेच्या कृत्याला तसा शेवट नव्हता; पण कल्पनाच्या सहनशीलतेला सीमा होती. गोळेनं मग्रुरीनं, हक्कानं बोलावावं आणि आपण लाचारासारखं जाऊन तिथे डबलबेडवर पडावं हे कल्पनाला शेवटी फार डाचू लागलं होतं. त्यातच नवरात्रही जवळ आलेलं होतं. काय करावं, ह्या विळख्यातून कसं सुटावं याचा विचार त्याच सुमारास कल्पना करीत होती. दिवस रात्र, तासन तास!

एक तर गोळेचा शेवट किंवा स्वतःची आत्महत्या ह्याशिवाय जीवनात फरक होणं शक्य नव्हतं. आत्महत्या झाली तर ती गोळेसाठी झाली असती. त्याचा भोग श्यामकांत आणि नीलूच्या वाट्याला आला असता. गोळे मग अशाच दुसऱ्या कल्पनाच्या वाटेकडे डोळे लावून बसला असता. म्हणजे मग गोळेचाच शेवट करणं आवश्यक होतं. कल्पनाच्या डोक्यात हे सर्व विचार अष्टौप्रहर दाटत चालले होते.

मागं कल्पनावर सूड उगवायचा म्हणून गोळे बेचैन असे. आता अगदी त्याच प्रकारे कल्पना बेचैन होती.

त्या बेचैनीमधून गोळेच्या खुनाचा प्लॅन ठरत गेला. तिचं मन आणि ती ह्या दोघांमध्येच फक्त तो कट शिजत होता. आजूबाजूला शेकडो लोक होते. कल्पनाच्या डोक्यात असा काही विचार चाललेला असेल अशी पुसटशीही शंका कुणाला येण शक्य नव्हतं. अगदी ब्रह्मदेवानं जरी आभाळातून जाताना तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं असतं तरी तोही ह्या खुनाचा तर्क करू शकला नसता!

गोळेच्या शेवटाबरोबर कल्पनाला संपायचं नव्हतं. तिला जगायचं होतं. तिच्या नीलूसाठी, नवऱ्यासाठी, संसारासाठी, तिला सुखानं जीवन घालवायचं होतं. तिच्या आयुष्यात गोळेच्या रूपानं उगवलेला तो तेवढा काटाच तिला निपटून काढायचा होता. बाकी फुलं तिला हवी होती. त्या फुलांवर तिचं बेहद्द प्रेम होतं!

¤

गोळेला विश्वासघातानं विष घालून म्हणा किंवा चक्क त्याच्याच खोलीत त्याच्यावर चाकू चालवून त्याचा जीव घ्यावा हे विचार सुरुवातीला कल्पनाच्या मनात दाटत होते; पण याची तिला अतिशय भीती वाटत होती. यदाकदाचित आयत्या वेळेला कुठला पुरावा मागं राहिला तर आपण पकडले जाऊ आणि मग गोळेबरोबरच आपलाही शेवट ही एक तिच्या मनातली धास्ती होती. खुन्याचा वास काढून देणारी पोलिसाची कुत्री कशी असतात याचं वर्णन तिनं वर्तमानपत्रात वाचलं होत. ह्या सर्वामुळं तिचं मन नीट तयार होत नव्हतं. दिवस मात्र मागं पडत होते. ती उतावीळ होत चालली होती.

एकदा सुन्नपणे विचार करीत असताना तिच्या डोक्यात विचार आला. आपल्या जर खरोखर अंगात येत असतं तर?... गोळेवर देवीचा कोपच झाला असता??... तिच्या दुबळ्या दबल्या मनानं तिला हे उत्तर दिलं होतं. गोळेवर देवीचा कोप आणि गोळेचा मृत्यु याची सांगड मग तिनं घातली आणि समोर आलेला विचार तिनं निश्चित केला. नवरात्रातल्या अष्टमीच्या दिवशी झालेल्या गोळेच्या वधाचा आरोप ती प्रत्यक्ष देवीवर ठेवू शकणार होती. त्यात कोर्ट आपल्याला कोणतीही शिक्षा देऊ शकणार नाही, हे कसं कोणास ठाऊक पण तिला चांगलं कळलं होतं!

...खेरीज ह्या प्रकरणातून सुटल्यानंतर अंगात येण्याचं सोडून ती सर्वसामान्यांसारखा संसार सांभाळू लागणार होती.

¤

'तुम्हाला एक सांगू?

'सांग सांग, एक नाही हजार सांग!' गोळे कल्पनाला म्हणाला. दोघेही गोळेच्या घरात एकातात होते. गोळे मूडमध्ये होता.

'मला कंटाळा आलाय ह्या अशा लपण्या-छपण्याचा. दिवसा तर फारच धास्ती वाटते.'

'अरे छोडो धास्ती बिस्ती!' गोळे बेफिकीर होता. खूष होता—

'तुम्ही असं करा नं—'

'कसं?' गोळेचा 'स'चा हेल बराच वर गेला.

'ह्या अष्टमीला नवनाथांच्या मठात या!'

'येऊ?'

'ऐका तं खरं, तुम्ही अष्टमीला यायचं. माझ्या अंगात आलेलं असेलच' कल्पनाचं बोलण ऐकून गोळे मोठ्यानं हसला.

'हसू नका हो!'

'अंगात आलं, बरं पुढं?' गोळे हसू आवरत पुढं म्हणाला.

**मला कंटाळा आला आहे अशा लपण्या-छपण्याचा....कल्पना**

'सर्वजण तिकडे असतील. श्यामकांतही असेल. तुम्ही यायचं आणि माझ्या पाया पडायचं. मला काही तरी प्रश्न विचारायचा. मी उत्तर देईन की, रोज मध्यरात्री देवीचा वास तुमच्या घरात झाला म्हणजे तुमच्या चिंता दूर होतील !'

'वा ऽ छान कल्पना !' गोळे म्हणाला.

'मग रोज रात्री आपण भेटत राहू!' श्यामकांतालाही काही संशय यायचा नाही.' कल्पना डोळे उंचावत म्हणाली.

'ठीक आहे. येऊ आम्ही ह्या अष्टमीला तुमच्या त्या नवनाथाच्या मठात !' गोळेनं येण्याचं मान्य केलं.

'किती वाजता याल ?'

'केव्हाही, रात्री आठनंतर ! काय ?'

'चालेल!' कल्पना खूष झाली.'

अष्टमीचा दिवस पक्का झाला. त्या दिवशी मठात काय आणि कसं वातावरण असतं, किती गर्दी असते याची गोळेला काहीच कल्पना नव्हती.

¤

जग्गू चाकूवाला म्हणत होता ते खोटं नव्हतं, कल्पनानं त्याच्याकडूनच चाकू विकत घेतला होता. दोन रुपयेही पाडून मागितले होते. संध्याकाळच्या वेळेला आपला चेहरा जग्गूला नीट दिसणार नाही आणि लक्षातही राहणार नाही असंच कल्पनाला वाटत होतं. चाकूवरच्या त्या 'डीलक्स' अक्षरांच तेवढं तिच्या चटकन लक्षात आलं नाही.

जग्गू चाकूवाल्याकडून घेतलेल्या त्या चाकूला एकाच बाजूला तीक्ष्ण धार होती. धारवाल्याकडून तिनं दोन्ही बाजूंना धार लावून घेतली. टोकही खूप तीक्ष्ण करून घेतलं. जग्गू चाकूवाल्याला तिनं सांगितलं, 'फणस कापायला चांगला चाकू हवाय !' धारवाल्याला ती म्हणाली, 'शहाळी सोलायला लागते चांगली धार !'

एक गोष्ट मात्र शेवटपर्यंत कुणाच्याच लक्षात आली नाही. कल्पनानं खुनाच्या दिवशी गुलाबी जांभळट जाड कापडाचा ब्लाऊज घातलेला होता. त्या ब्लाऊजच्या पाठीकडल्या बाजूवर तिनं एक अरुंद आणि उभा खिसा शिवलेला होता. स्वतःच्या हातानं ह्या खिशात तो तीक्ष्ण धारेचा चाकू त्या दिवशी तिनं काळजीपूर्वक उभा घालून ठेवलेला होता. त्याची मूठ तिच्या मानेशी किंचित वर येत होती; पण पदर नीट मानेशी घेतला म्हणजे ती झाकली जात होती. काहीच समजत नव्हतं.

कल्पना नऊवारी पातळ नेसलेली होती. रात्री सव्वाअकराच्या सुमारास गोळे आला. धुपाच्या वासानं खरं तर सर्वचजण हैराण झालेले होते; पण कल्पनाला त्याची सवय झाली होती. गोळे तिच्या समोर येऊन उभा राहिला आणि गालातल्या गालात हसत हलकेच म्हणाला, 'छान ॲक्टिंग करतेस हं!' गोळेचं हे वाक्य ऐकून कल्पनाच्या तळपायाची आग मस्तकात गेली. एका झटक्यासरशी तिनं हात वर उचलला; परतु वर उचलत असताना तो किंचित वाकवून तिनं सुऱ्याची मूठ वर उचलली होती. मग लगेचच पहिला वार गोळेच्या कुशीत केला होता. त्यानतरचा प्रत्येक घाव गोळे सपावा म्हणून तिनं ताकद एकवटून केलेला होता ! घटना घडून गेली होती. त्या वातावरणात, पाठ भितीकडून, हवेतून आल्यासारखा दिसणारा तो चाकू पाहून भाविक प्रेक्षकांना ती प्रचिती वाटली होती. क्षणार्धात ह्या प्रचितीचा बोलबाला सगळीकडे पसरला होता.

'डीलक्स' ही अक्षरं सर्वप्रथम आचार्यांनाच दिसली. क्राइम ब्रँचमध्ये केस पिकलेल्या हवालदारानं जग्गू चाकूवाला आणि धारवाला हे दोघेही जण शोधून काढले. कल्पनाला अजूनही संसारात रमायचं होतं. केसमधून सुटून बाहेर पडायच होतं ! जगायचं होतं. ती त्या प्रचंड मानसिक दबावाखाली खुनाचा आरोप नाकारत होती, अर्थातच शेवटपर्यंत न्यायदेवतेला हे काही कळलेलं नव्हतं, कळणारही नव्हतं. कारण तिच्या डोळ्यांवर आडवी पट्टी होती.

ही सारी पार्श्वभूमी पाठांतर असावं तशी कल्पनाच्या हृदयाशी साठून बसली होती. प्रत्येक वेगवेगळ्या घटनेनंतर ती पिंजली गेली होती. ह्या प्रक्रियेत मात्र संपूर्ण देसाई कुटुंबच झिजत गेलेलं होतं. सर्वांत मोठी झीज श्यामकांताच्या वाट्याला आली होती. कदाचित ती झीज त्याची त्यानंच स्वीकारली असावी. एवढ्या जबरदस्त घटना घडल्यानंतर कल्पनाच्या जागी असणारा किंवा असणारी कुणीही व्यक्ती उन्मळून पडली असती; पण कल्पनाच्या बाबतीत तसं झालं नाही. तिच्या समोरच बाकीचे धडाधड कोसळल्यागत झाले !

तिची कसोटी आता श्यामकांतच्या विक्षिप्त वागण्याशी होती. त्या विक्षिप्तावस्थेत श्यामकांताचं लॉकअपजवळ येणं, तेथे भर तापात कल्पनाला 'कोर्टाला खरं काय ते सांग, तुला आपल्या नीलूची शपथ आहे!' हे सांगणं आणि तडक तेथून निघून जाणं ह्या प्रकाराचा आता तिला विचार करायचा होता. इतका वेळ मिटून ठेवलेली मूठ कोर्टात उघड असं श्यामकांत तिला बजावत होता. नीलूची शपथ एखादया खेळातल्या पंचासारखी तिथे शिट्टी तोंडात धरून उभी होती!

रेसच्या घोड्यानी रिंगणाभोवती पळत राहून एक एक वेढा मागे टाकावा तशी कल्पना विचार करीत होती. विचारांच्या ह्या जमाखर्चाची एक अजब पद्धत तिची तिनंच त्या मधल्या काळात शोधून काढली होती. तिला भय वाटत होतं ते नीलूच्या शपथेचं ! श्यामकांतानं उगाचच नको ते केलं, नीलूची शपथ त्यानं घालायला नको होती असं वारंवार तिला वाटत होतं. प्रकर्षानं वाटत होतं—आणि त्याला कारण होत्या बढेआजी !

शपथेचं महत्त्व बढेआजीनीच कल्पनाला समजावून सांगितलं होतं. ज्याची शपथ असेल त्याच्यासाठी सारं काही करावं लागतं असं बढेआजीचं तत्त्वज्ञान होतं. देवाची शपथ असेल तर त्याच्यासाठी ती गोष्ट करायला हवी, मुलाची शपथ असेल तर त्याच्यासाठी ते करायला हवं. का कुणास ठाऊक, पण एवढं घडून गेलं तरी कल्पनाच्या मनावरचा बढेआजीचा पगडा अजून तसाच होता. मनातल्या अंधश्रद्धेचं नवरात्र अजून संपलेलं नव्हतं !

बढेआजीच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे नीलूची शपथ पाळणं तिला भाग होतं. कोर्टात सर्व काही खरंखरं सांगून टाकणं आवश्यक होतं. म्हणजे थोडक्यात 'मला फाशी द्या !' असचं कल्पना कोर्टाला सांगणार होती. नीलूची शपथ पाळून फाशी जायचं की शपथ झिडकारून बढेआजीचं तत्त्वज्ञान फेकून द्यायचं असा विचित्र पेच कल्पनासमोर पडलेला होता. जर कोर्टाला खरं काय ते कळलं नाही तर कल्पना निर्दोष सुटणार हे जवळजवळ स्पष्ट झालेलं होतं. कल्पनाचा वकील तेच सांगत होता. बाहेरही तेच बोललं जात होतं. तिच्या ह्या जवळ

आलेल्या निर्दोष मुक्ततेत आता आडवी आली होती नीलूची शपथ !

जर नीलूची शपथ पाळली नाही तर? बढेआजी म्हणाल्या होत्या, शपथ पाळली नाही तर ते माणूस मरतं. म्हणजे, नीलूची शपथ पाळली नाही तर नीलू हे जग सोडून जाणार? नीलूच्या बदल्यात आपलं निर्दोष सुटणं आपल्याला हवंय का? कल्पनासमोर एक एक नवनवं प्रश्नचिन्ह तयार होत होतं. स्वतःनं स्वतःच्या घेतलेल्या ह्या उलटतपासणीत ती सारखी फसत होती.

¤

अजूनही निर्णय होत नव्हता: शपथ पाळून कोर्टात खरं सांगून टाकायचं, पाठोपाठ फाशी पत्करायची आणि कुटुंबाचा निरोप घ्यायचा--की--शपथ झिडकारून कोर्टापासून सत्यपरिस्थिती लपवायची आणि निर्दोष सुटायचं? शिवाय बढेआजीचं म्हणणं खोटं निघालं तर नीलू वाचण्याची शक्यताही होतीच. मग ह्या दोन्हीपैकी कोणतं धाडस निवडायचं? कल्पना पुन्हा पुन्हा सारे तपशील तपासून पहात होती. खोलात शिरून विचार करीत होती.

¤

निकालाचा दिवस जवळ येत होता निकालपत्र टाइप होत होतं. दिवसा-तासाचे आठवडे निकालपत्राची पान वाढवत होते. दुसरीकडे कल्पनाचे विचार भिरभिरत चालले होते शपथप्रकरणातून मार्ग काढण्याची तिची धडपड चालूच होती. तिसरीकडे विचार करकरून तिचं मन सतत पोखरलं जात होतं. नाही म्हटलं तरी श्यामकातानं घातलेली ती शपथ तिच्या चागलीच जिव्हारी बसलेली होती. लोकांना उत्सुकता होती कोर्टाचा निकाल काय लागतो याची आणि कल्पनाला चिंता होती काय निकाल लावायचा याची !

¤

निकालाचा दिवस उजाडला. न्यायालयाच्या इमारतीवरची न्यायदेवता हातात तराजू घेऊन सज्ज होती. त्याची दोन्ही पारडी जमिनीशी समांतर आणि एकमेकांशी समान होती. न्यायमूर्तींच्या निकालानं त्यातलं कुठलं तरी एक पारड खाली जाणार होतं कुठलं पारडं खाली आणायचं हे तसं पाहता कल्पनाच्याच हातात होत ! दोन्ही पारडी बिचारी केविलवाण्या नजरेनं कल्पनाकडे पहात होती. कल्पनाचाही निश्चय झालेला होता. तिला आज न्यायमूर्तींना काही तरी सांगायचं होतं. आज निकालापूर्वीच ती ते कोर्टापुढं अचानकपणे सांगणार होती. असं काही होणार याचा मागमूस कुणालाच नव्हता. कल्पनाच्या वकिलांनाही ते माहीत नव्हतं !......

सारं काही शिरस्त्याप्रमाणं घडलं. न्यायमूर्ती स्थानापन्न झाले. कोर्टातल्या गर्दीची खेचाखेच वाढली. बाहेर वार्ताहर कान टवकारून बसले. तिकडे छपाईची यंत्रं ह्या बातमीसाठी उचकी लागल्यागत थांबून राहिली. न्यायमूर्ती कामकाज सुरू करणार तेवढ्यात कल्पनाचा भरदार आवाज गर्दीगर्दीमधून प्रत्येकाला कापत गेला. निकालापूर्वी तिला कोर्टाला काही तरी माहिती द्यायची होती. तिच्या म्हणण्याप्रमाणे तिला काही तरी महत्त्वाचं सांगायचं होतं.

भर कोर्टात हे काही तरी नवलविशेष घडलेलं होतं. जो तो अवाक् झालेला होता, गोंधळला होता. कोर्टानं निकालाची प्रत बाजूस सारली. कल्पनाला तिचं निकालपूर्व निवेदन देण्याची परवानगी मिळाली. कोर्टात सर्वत्र फक्त शांतता पसरली. गर्दीतून उगवलेली शांतता तेथे भयंकर खुनशी वाटत होती. सर्वजण वाट पहात होते-- कोर्टापुढं काय महत्त्वाचं निवेदन आता कल्पनाकडून येणार आहे याची !

एक मिनिट मागं पडलं. दुसरं मिनिट मागं पडलं. शांततेचाही संयम सुटण्याची वेळ आली. कल्पनाची मान खालीच होती. ओठ उघडले गेले नव्हते. न्यायमूर्तींनी कल्पनाला आठवण केली, 'बाई, काय सांगायचंय ते लवकर सांगा, कोर्टाला विलंब होतोय!' हे शब्दही विरून गेले. पुन्हा एकदा शांतता पसरली. कल्पनाची मान वर झाली.

आवाज उंचावून तिनं सांगायला सुरुवात केली. 'मिलॉर्ड, सगळे म्हणतात तेच खरं आहे, अर्जुन गोळेंचा खून कल्पना देसाईंनीच केलाय! तो चाकूही कसला खोटाच होता आणि ती कुठली बरं प्रचिती......?' कल्पना थोडंसं थांबली आणि भसाड्या आवाजात हसत सुटली.

पिंजऱ्यातून सटकलेलं तिचं हास्य कोर्टभर घुमाकूळ घालू लागलं. भिंतीवरचं टिकऽटिकऽ घड्याळ मूक बनून वेळ घालवू लागलं. त्या घड्याळाला तो हर्षवायू ऐकवत नव्हता, तर जमलेल्या लोकांना ते हास्य पटत नव्हतं......पटत नव्हतं !

## स मा प्त


# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती**

**लेखिका : सुमती देवस्थळे**

**किंमत : ५५ रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

# संकेत मीलनाचा

**ज्याच्या प्रेमात पडावे, असा मीलनसंकेत**

'Same time, next year'-या मूळ अिंग्रजी नाटकावर आधारित सुरेश खरे यांनी लिहिलेले आणि कै. प्रवीण जोशी यानी दिग्दर्शित केलेले 'संकेत मीलनाचा' हे नाटक इंडियन नॅशनल थिअेटरतर्फे रंगभूमीवर आले.

अठरा ऑक्टोबर अेकोणीसशे अेक्कावन्नच्या रात्री अेका अत्यंत चमत्कारीक परिस्थितीत अेकत्र आलेले दोघेजण—सुधाकर (श्रीकांत मोघे) आणि मालविका (दया डोंगरे). खरे तर दोघेही विवाहित! सुधाकरला तीन आणि मालविकाला दोन मुले; पण तरीही शारीरिक आकर्षणापासून सुरू झालेले नाते दोघामध्ये अेक अनोखी भावनिक गुंतवणूक निर्माण करते आणि दोघेही दरवर्षी अठरा ऑक्टोबरलाच अेकमेकाना भेटण्याचे ठरवतात. यानंतर दर पाच वर्षांनी त्यांच्या भेटीमधून सुमारे पंचवीस वर्षांमध्ये घडणारी ही अनोखी प्रेमकथा आपल्यापुढे रंगमंचावर अुलगडली जाते.

स्त्रीपुरुषांच्या शारीरिक संबंधांनाच 'प्रेम' असे लेबल ठोकून ती फक्त पती—पत्नीच्या नात्याची मक्तेदारी मानणाऱ्या (आणि त्याला निष्ठा वगैरे भाववाचक नावे ठेवणाऱ्या) आपापल्या वैवाहिक जोडीदाराशी अेकनिष्ठ असूनही वर्षातून अेकच दिवस अशी दुहेरी निष्ठा ठेवण्याची कल्पना पचायलाच नव्हे तर तोंडात टाकायलाही जड जाते. खरे सांगायचे तर 'सकेत मीलनाचा' मध्ये मध्यंतरापर्यंतच्या तीन प्रवेशांपर्यंत मीही बऱ्यापैकी कंटाळायला लागलो होतो. सुरुवातीचा पहिला प्रवेश—सुधाकर आणि माला यांची भेट आणि वार्षिक भेटीचा करार. दुसरा प्रवेश—पाचवा मीलनदिन. दोघेजण भेटल्यावर थोड्याच वेळात सुधाकरच्या बायकोचा-मंजूचा फोन येतो-सुधाकरच्या मुलीने तिचा पडलेला दात गिळलाय. त्या फोनमुळे अस्वस्थ झालेला सुधाकर घरी जायला निघतो; पण त्यामुळे माला अत्यंत चिडली आहे, हे लक्षात आल्यावर ते रद्द करतो. प्रवेश तीन—मालाला भेटण्याच्या अतीव अुत्कंठेने आलेला सुधाकर. माला गरोदर असल्याने त्याचा झालेला विरस. अितकेच नव्हे तर मालाचे त्याला करावे लागलेले बाळंतपण. अशा अनुक्रमे घटना तीन प्रवेशांमध्ये घडतात. या तीन प्रवेशामध्ये दिलखुलास हसवणारे आणि चावटसुद्धा विनोद आहेत, श्रीकांत मोघे आणि दया डोंगरे यांचा अफलातून अभिनय आहे; तरीही मी कंटाळायला लागलो होतो. चावटपणा आणि विनोदीपणाही तोचतोचपणा व्हायला लागला की, कंटाळा आणतोच. या कंटाळ्यातच मध्यंतर अुलटले.

नाटक मध्यंतरानंतर सुरू झाले ते प्रौढ, कुठल्याशा स्वामीच्या संगतीने आध्यात्मिक बनलेल्या सुधाकरबरोबर. त्याला भेटायला आलेली माला मात्र अत्यंत 'मॉड' बनून आलेली. त्यांच्या चकमकीतून प्रवेशाच्या शेवटी प्रेक्षकांना कळते की, सुधाकरचा लाडका थोरला लेक—अनिकेत अेकोणीसशे पासष्टच्या भारत-पाक युद्धात आघाडीवर मारला गेला. त्या प्रसंगाची आठवण काढत केविलवाणा, असहाय्य आक्रोश करणाऱ्या सुधाकरला माला समजावताना, त्याचे सांत्वन करतानाच (बासरीच्या करुण सुरांमध्ये बुडत) तो प्रवेश संपतो. यानंतर क्रमाने पुढील प्रवेशात मालाच्या पतीचा—देवदत्तचा मृत्यू घडतो, तर त्याच्या पुढील प्रवेशाला सुधाकरच्या पत्नीच्या—मंजूच्या मृत्यूची पार्श्वभूमी लाभते. मध्यंतरानंतरच्या या तीन प्रवेशांमध्ये सुधाकर आणि माला याच्यातील शारीरिक संबंधांना आत्यंतिक गौण स्थान मिळते आणि त्यामुळेच सुरुवातीच्या तीन प्रवेशांमधील चावटपणा अधूनमधून डोकावत असतानाही त्याची जागा मुख्यत्वे दोघांमधील गाढ मैत्रीने, जिव्हाळ्याने, गुंतवणुकीने घेतलेली असते. त्यामुळेच सपूर्ण नाटकाला मध्यंतरानंतर अेक निराळीच उंची मिळते.

प्रयान करूनही मला मूळ 'Same time next year' मिळू शकले नाही; पण 'संकेत मीलनाचा'च्या परिणामाचा विचार करता सुरेश खऱ्यांनी या मूळच्या विदेशी बाळाचे देशी कपडे उत्तम बेतले आहेत. अपवाद फक्त चौथ्या प्रवेशातील मालविकाच्या 'मॉड' पणाचा. या प्रवेशात तिचे वय सुमारे चाळीस ते पंचेचाळीस वर्षे. देशभक्त, सर्वोदयी नवरा, स्वातंत्र्यचळवळ अशा गोष्टींची पार्श्वभूमी लाभलेली चाळिशीची भारतीय मालविका ही अचानक गुरुशर्ट, जीन अगावर चढवून, बॉब वगैरे करून एखाद्या अभिनव कला महाविद्यालयात दाखल होईल हे जरा नाही तर चांगलेच खटकते. या एकमेव प्रसगात (आणि अर्थातच नाटकाच्या प्रमुख मध्यवर्ती कल्पनेच्या बाबतीतही) या बाळाचे विदेशी बाळसे चांगलेच नजरेत भरते. संपूर्ण नाटकभर दोनच पात्रे आहेत. ही दोन पात्रे म्हणजे सुधाकर आणि मालविका यांच्या व्यक्तिरेखा तर नाटकाच्या संहितेतून आणि श्रीकांत मोघे आणि दया डोंगऱ्याच्या समर्थ अभिनयातून त्या दोघामधील नाजूक नात्यासकट उत्तम साकार झाल्या आहेतच; पण रंगमंचावर कधीही न येणाऱ्या देवदत्त (मालविकेचा पती), मंजू (सुधाकरची पत्नी) या दोन प्रमुख आणि अनिकेत (सुधाकरचा मुलगा) अशा तीन व्यक्तिरेखा संपूर्ण नाटकातून त्यांच्या सर्व स्वभाववैशिष्ट्यासकट प्रेक्षकापुढे आकार घेतात, हे या नाटकाचे सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणून सागता येईल. रंगमंचावर न येताही या व्यक्तिरेखानी नाटकात अतिशय सुदर कामे केली आहेत. (याचे श्रेय अर्थातच लेखकाप्रमाणे श्रीकांत मोघे आणि दया डोंगरे यानाही आहेच.)

मराठी रंगभूमीवर रंगमंचावर एकच व्यक्ती वावरत असलेले एकपात्री (वा पुलंच्या भाषेत बहुरूपी) प्रयोग बरेच झाले; पण पूर्ण लांबीचे एकाच व्यक्तिरेखेवर आधारलेले नाटक माझ्या माहितीत तरी नाही. दोनच व्यक्तिरेखा असलेली नाटकेही बरीच कमी आहेत. (वासनाकांड, आरोप, खेळिया ही अलीकडची काही ठळक उदाहरणे.) 'संकेत मीलनाचा' अशाच बऱ्याच कमी नाटकांपैकी एक सुरुवातीच्या अर्ध्या नाटकात आलेला बराच कंटाळा बराच कमी करण्याची मोठी जबाबदारी या दोन पात्रानी पार पाडली. याशिवाय श्रीकांत मोघे आणि दया डोंगऱ्याच्या समर्थ अभिनयाबद्दल मी या आधी जागोजागी उल्लेख केला आहेच. सुधाकर आणि मालविकेच्या आयुष्यातील पंचवीस वर्षे त्यांच्या तारुण्यापासून वृद्धत्वापर्यंत वेशरंगभूषा आणि अनेक लकबीसह दोघांनी मूर्तिमंत केली. श्रीकांत मोघ्यांच्या शेवटच्या दहा वर्षांमध्ये विशेषतः बोलण्यातून डॉ. लागू डोकावत असले तरी त्यामुळे त्यांच्या सपूर्ण कामाला कुठेही बाध आला नव्हता.

या नाटकाचे दिग्दर्शक कै. प्रवीण जोशी आणि सहाय्यक दिग्दर्शिका श्रीमती सरिता जोशी. हे नाटक पाहिल्यानंतर या प्रतिभावान तरुण दिग्दर्शकाच्या नावामागे इतक्या लौकर 'कै' लागावा, याची अपार खंत वाटते!

एखादी कलाकृती कधीकधी आपल्याला इतकी आवडते की, आपण तिच्या प्रेमातच पडतो. हा मीलनसकेतही ज्याच्या प्रेमात पडावेसे वाटेल असाच आहे!

—सदानंद बोरसे

# ठाणे लोकसभा निवडणूक

पृष्ठ ८ वरून

वस्तू आयात करीत होता. आता मात्र भारत गाढवेही आयात करणार आहे असे वाजपेयी म्हणताच सभेत खसखस पिकली. क्षणभर थाबून ते म्हणाले, 'मंत्रीमहोदयांना मी विचारले की, भारतात गाढवे काय कमी आहेत?' तेव्हा ते म्हणाले, 'गधे तो है लेकिन हायक्वालिटीके नही है!' (प्रचंड हशा).

### यापुढील संकल्प

या संपूर्ण दौऱ्याचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे रामभाऊंच्या पत्नी श्रीमती विजयाबाई म्हाळगी संपूर्ण दिवस अटलजींच्या समवेत होत्या. प्रत्येक सभेत त्यांनी सांगितलं की, घेतलेली कोणतीही जबाबदारी रामभाऊ अर्धवट टाकत नसत. त्यांना मुलांची काळजी नव्हती की बायकोची! पण ज्या मतदारानी आपणाला पाच वर्षांसाठी निवडून दिले त्यांची कामं अपुरी टाकून आपणाला जावं लागत आहे याचीच रामभाऊंना शेवटच्या क्षणी खंत होती! त्यांचं अपुरं स्वप्न पूर्ण करण्यासाठी जगन्नाथ पाटील याना निवडून द्या असं सांगण्यासाठी मी इथे आले आहे असे त्या म्हणाल्या. □

चित्रपट

# ब्ल्यू लगून

अलीकडे चित्रपटात चार–दोन नवीन तरुण चेहरे, भरपूर प्रणयप्रसंग, गाणी, डिस्को वगैरे प्रकार ठासून पण जराशा कुशलतेनं भरलेले असले की, तो चित्रपट यशस्वी होणं फारसं जड जात नाही. जुन्याच कथेवर या गोष्टीचा नवा मुलामा चढवण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे कथे–बिथेला फारसं महत्त्व नसतच. राजकपूरच्या 'बॉबी' च्या यशाने चित्रपटसृष्टीत हे लोण पसरलं. पण कोलंबिया पिक्चर्सचा 'ब्ल्यू लगून' हा प्रचंड जाहिरात झालेला चित्रपट या हिंदी सिनेमांच्याच धर्तीवरचा. मुक्त प्रणयाची कल्पना हा विषय त्यामुळे बराचसा सोयिस्कर. मुक्त निसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुक्त प्रणयाच्या नावाखाली भरपूर मालमसाला त्यात भरण्यात आला आहे. पण 'ब्ल्यू लगून' या चित्रपटाच्या नावाची यथार्थता पटवून देणाऱ्या फोटोग्राफीखेरीज या चित्रपटात कुठेच काही दम नाही.

सिनेमाची कथा घडते ती पॅसिफिकमधील एका बेटावर. रिचर्ड (ख्रिस्तोफर अॅटकिन्स) आणि एमिली (ब्रुक शील्डस्) ही दोघं समुद्रातून प्रवास करणाऱ्या एका जहाजात असतात. पण एक दिवस अचानक या जहाजाला आग लागते. तेव्हा या होडीवरचा एक खलाशी पॅडी, रिचर्ड आणि एमिलीला एका होडक्यात घालतो आणि जळणाऱ्या जहाजापासून दूर नेऊन वाचवतो. पण त्यात या मुलाची आणि आईवडिलांची ताटातूट होते. वरती आकाश आणि खाली पाणी अशा अवस्थेत काही दिवस काढल्यानंतर हे होडकं एका बेटाशी जाऊन धडकतं आणि या तिघांचा जगाशी असलेला संपर्कच तुटतो. आता आपल्याला इथच आयुष्य काढायचं आहे, हे कटु सत्य त्याना कळून चुकतं, तेव्हा पॅडी रिचर्ड आणि एमिलीला या बेटावरचं आयुष्य जगण्याचे धडे द्यायला लागतो. पहिल्यांदा शहरी संस्कृतीत वाढलेले रिचर्ड आणि एमिली या निर्जन बेटावरील जीवनाने अस्वस्थ होतात. पण लवकरच ते रुळतात, आणि निसर्गाच्या कुशीत सामावून जातात. दरम्यानच्या काळात पॅडीचा मृत्यू होतो आणि त्या निर्जन बेटावर उरतात फक्त रिचर्ड आणि एमिली. ते दोघं मोठे होत असताना एकमेकांमधील बदलाची त्यांना जाणीव व्हायला लागते आणि एकमेकांविषयी वाटणाऱ्या अनामिक ओढीतून मूलही जन्माला येतं. तोपर्यंत कंदमुळ, फळ खाणं, मासे पकडणे, मनमुराद पोहणं, रानातल्या वस्तूंनी घर सजवणं वगैरे गोष्टीत मग्न असताना दिवस कसे जातात कळत नाही. नव्या नव्या अनुभूतीमधून जाताना ते आपल्या बाळासह मजेत आयुष्य जगत असतात. या आयुष्याची त्यांना इतकी काही सवय झालेली असते की, आधी जहाजाच्या वाटेकडे डोळे लावून बसणारे रिचर्ड आणि एमिली खुद्द जहाज जेव्हा डोळ्यासमोर दिसतं तेव्हा क्षणभर बावचळतात गोंधळतात आणि त्यांच्याकडे पाठफिरवून चालायला लागतात. नंतर एकदा त्यांच्या होडक्याचं वल्ह पाण्यात पडतं आणि शार्क माशामुळे दूर जातं. त्यामुळे त्यांच्या होडक्याला कसला आधारच राहात नाही. शेवटी दैवावर हवाला ठेऊन ते दोघं मुलासह अफूच्या गोळ्या खातात आणि त्याच वेळेस त्यांना शोधणाऱ्या त्यांच्या वडिलांना त्यांचं होडकं दिसतं.

अशी ही थोडीशी काव्यात्मक टच असलेली कथा, पण सिनेमाचा बराचसा वेळ रिचर्ड आणि एमिली यांच्या कालनियमानुसार मोठं होण्याचं कौतुक करण्यात जातो आणि या कौतुकानं पार मूल होण्यापर्यंतची सीमा गाठली आहे पण हे कौतुक करताना मूळच्या कथाविषयाला जो (Treatment) दिली आहे, त्यावरून दिग्दर्शकाचा एक डोळा सतत बॉक्स ऑफिसवर होता, हे सहज लक्षात येतं आणि या हव्यासापायी त्या दोघांचं मोठेपण जाणवून देण्यासाठी दाखवलेले काही प्रसंग बटबटीत वाटायला लागतात. स्त्री पुरुष यांच्यातला भेद जाणवायला लागणं ही अतिशय नाजूक बाब आहे आणि ती अधिक कलात्मकतेनं हाताळली असती तर या सीन्सना जास्त उठाव आला असता असं वाटतं. पण निरागसतेच्या नावाखाली दिग्दर्शक क्लाईझर यानं ते नको तितक्या रोखठोक पद्धतीनं दाखवले आहेत. लहान असतात तोपर्यंत पॅडीही असतो व मध्येच त्याला मारुन टाकून Two is company, three is crowd मधला crowd दिग्दर्शकाने सोयीस्करपणे काढून टाकला. तसच ते दोघही मोठे झाल्यापासून अंगावरील अगदी नाममात्र कपड्यांखेरीज काहीही वस्त्र नाही. कारण त्या रानावनात कुठे कपडे बिपडे मिळणार? ही आणखी एक सोय. त्या निर्जन बेटावरची एकुलती एक करमणूक म्हणजे समुद्रात मनसोक्त पोहणं आणि पोहण्याच्या निमित्ताने या नाममात्र वस्त्रानाही फाटा मिळतो बरं, दुसरी करमणूकच नाही म्हटल्यानंतर ते सार खेच पोहतात आणि त्यामुळे त्यांच्या करमणूकीबरोबर प्रेक्षकांचीही करमणूक होत असते. यातल्या अगदी बारीक-सारीक प्रसंगांचाही अत्यंत सोयीस्करपणे उपयोग केल्याचं

स्पष्टपणे जाणवतं. एवढच नाही तर सेन्सॉरच्या नजरेत खुपण्याजोगे अनेक प्रसंग यात असूनही सेन्सॉरने हा सिनेमा पास केला यावरून सेन्सॉरबोर्ड झोपलं तरी असलं पाहिजे किंवा सेन्सॉरनेही दिग्दर्शकाची 'सोय' महत्त्वाची मानून त्याकडे दुर्लक्ष केलं असावं असं वाटतं. साहजिकच त्यामुळे 'सगळं' पाहण्याची प्रेक्षकांचीही सोय झाली.

'ख्रिस्तोफर अँटकिन्स आणि ब्रुक शील्डस या दोघांनाही दाखवण्याजोगं इतर बरंच काही असल्यामुळं अर्थातच अभिनयास वाव नाही. त्यामुळे अभिनयदर्शनापेक्षा देहप्रदर्शनच जास्त होतं. तसच रिचर्ड आणि एमिली या व्यक्तिरेखांसाठी जी कोवळीक आवश्यक आहे, ती मात्र या दोघांजवळही नाही. त्यांचे चेहरे निरागस असले तरी ते ज्या पद्धतीनं प्रणयप्रसंग खुलवतात,रंगवतात त्यात मात्र ही निरागसता किंवा कोवळीक अजिबात जाणवत नाही आणि त्यामुळे अपेक्षाभंग होतो. या गोष्टीचा अतिरेक झाल्याने चित्रपटाला कुठे गतीच येत नाही. काही काही ठिकाणी तर हा सिनेमा अतिशय कटाळवाणा होतो.

या चित्रपटाची जमेची बाजू एकच आणि ती म्हणजे छायाचित्रण! 'ब्ल्यू लगून' नाव सार्थ करताना, निसर्गाचे विविध आविष्कार टिपताना, नेस्तोर आलेमेंदोस या छायाचित्रकाराचा कॅमेरा पूर्णपणे यशस्वी झाला झाला आहे. हिरवीगार दाट वनराई, निळशार पाणी, क्षितीजापर्यंत पसरलला समुद्र, धूसर सूर्यास्त, आदिवासीचं नृत्य, चांदण्या रात्री असे अनेक क्षण टिपले आहेत. विशेषत: रिचर्ड आणि एमिली यांची पाण्याखालची पोहतानाची दृश्ये टिपताना तर कॅमेऱ्यानं कमाल केली आहे. संपूर्ण कथेचा काव्यात्मकटच फक्त छायाचित्रणातच जाणवतो. ¤

कथा : हेन्री डी.
पटकथा : डग्लस स्टुअर्ट.
दिग्दर्शन : क्लाईझर.

# चित्रपटाबाहेर

शक्तिकपूर आणि रमा विज यांचं प्रेमप्रकरण ते दोघं इन्स्टिटयूटमध्ये शिकत होते, तेव्हापासूनचं जुनं. पण शक्तिकपूरला आपल्या पत्नीनं सिनेमात काम करणं पसंत नव्हतं, त्यामुळं शक्तिकपूरनं रमा विजला सिनेसृष्टी कटाक्षानं दूर ठेवलं. वास्तविक रमा विज ही एक गुणी अभिनेत्री; पण शक्तिकपूरवरील प्रेमामुळं तिला आपले अभिनयगुण दाखविण्याची संधीच मिळाली नाही. पण जसजसा शक्तिकपूरचा सिनेसृष्टीतला भाव वधारला तसतसा त्याला आपल्या प्रेमप्रकरणाचा, रमा विजला दिलेल्या वचनांचा आणि घातलेल्या अटीचा विसर पडत चालला आहे. इतके दिवस तो एकीकडे रमा विजला सिनेमात काम करायची परवानगी देत नव्हता आणि दुसरीकडे आपल्या प्रेमप्रकरणाचा उघड उघड इन्कार करत होता. असं म्हणतात की नुकतच त्याने लग्न करण्याची इच्छा नसल्याचं रमाला स्पष्टपणे सांगितलं आहे. त्यामुळं हताश झालेल्या रमा विजनं इतकी वर्ष फिल्म इंडस्ट्रीपासून दूर राहिल्यानंतर आता निर्माता-दिग्दर्शकांकडे खेटे घालायला सुरुवात केली आहे आणि त्याप्रमाणे सध्या तिच्या हातात दोन–तीन चित्रपट आहेत.
¤

फिल्म इंडस्ट्रीतला सध्याचा प्रचलित समज म्हणजे दोन कपूरव्यक्ती एकत्र आल्या की तो सिनेमा पडतो आजपर्यंत दोन कपूर व्यक्ती एकत्र आलेल्या सिनेमांचं बॉक्स ऑफिस रेकॉर्ड बघता हा निष्कर्ष सगळ्यांनी काढला आहे. राजकपूर-रणधीरकपूर (कल आज और कल), शम्मीकपूर-रणधीरकपूर (मामा भाजा, हीरालाल पन्नालाल), शशी कपूर-ऋषीकपूर (दूसरा आदमी) असे अनेक सिनेमे वानगीदाखल देता येतील. पण दरम्यानच्या काळात शशीकपूर-ऋषीकपूर यांना घेऊन काढलेला 'कभी कभी' हिट झाला आणि त्यामुळे निर्माता जवाहर कपूर यांनी मोठ्या उत्साहाने राजकपूर आणि शशिकपूर यांना घेऊन 'वकिलबाबू'ची निर्मिती केली पण राज आणि शशी असे दोन मोठे 'स्टार' एकत्र येऊनही 'वकिलबाबू'ची थेटरवरची हालत इतकी वाईट होती की, कित्येक थेटरची भाडीही पूर्ण होऊ शकली नाहीत. दोन कपूर व्यक्तीना एकत्र आणण्याचा त्यामुळे निर्मात्यांनी इतका काही धसका घेतला आहे की भविष्यात तरी पुन्हा कोणी कपूर फॅमिलीपैकी कुणालाही एकत्र घेईल की नाही, शंकाच आहे.
¤

कलावंतांकडून शूटींगच्या डेटस्चा होणारा गोंधळ ही गोष्ट कुणाला नवीन नाही. मग कलावंतांनं मध्येच दांडी मारणं, आयत्या वेळेस निर्मात्याला येत नसल्याचा निरोप पाठवणं, वगैरे प्रकारांनी निर्माता-दिग्दर्शक सतत वैतागलेले असतात. पण अमिताभ बच्चन मात्र डेटस्च्या बाबतीत कधीही गोंधळ करीत नाही. याचं मुख्य कारण म्हणजे त्याचा स्वत:चा सेक्रेटरी असला तरी डेटस् देण्याची बाब तो स्वत:च हाताळतो. त्यामुळं केव्हा आणि कुठे शूटींगला जायचं आहे, हे त्याला पक्कं माहित असतं व त्याचा कुठल्याही शूटींगमध्ये घोटाळा होत नाही स्वत:च शूटिंग डेटस् निश्चित करणं किती फायद्याचं आहे, हे आता इतरही कलाकारांच्या चांगलच ध्यानात यायला लागलं आहे. त्यामुळे अमिताभच्या पावलावर पाऊल टाकून राज बब्बरही स्वत:च सगळं बघतो. राजकिरणनं आपला सेक्रेटरी रमेश याला तर सिम्पल कपाडियाने सेक्रेटरी ज्योति हिला कायमची रजा दिली आहे. मध्यंतरी 'बाजी'साठी डेटस् देऊनही सात दिवस या चित्रपटाच्या शूटिंगला रेखा गेलीच नाही! कारण तिला शूटिंग असल्याची कल्पनाच नव्हती. याचा परिणाम अर्थातच रेखाचा सेक्रेटरी गणेशन याची नोकरी जाण्यात झाला!

– शुभदा रानडे